# शिरोळकर भक्ताची मानहानी टाळली

श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची किर्ती सर्वत्र पसरली होती. पूर्वी शिरोळच्या यमाताईस अकल्पितपणे आशिर्वाद श्रीफळ देताच तिला सुंदर सुपुत्रप्राप्ती झाल्याने त्या परिसरातील भाविकांमध्ये श्रीस्वामींच्याविषयी प्रेमळ ओढ निर्माण झाली होती. शिरोळमधील श्री. बाबाजी पाटील हे पण श्रीस्वामी चरणी सश्रद्ध होते. त्यांचे मेहुणे श्री. पाटील खुटवाडगांवी असताना त्यांचेवर विनाकारण दोषारोपण होऊन त्यांना कारागृही बंदीवासात नेऊन चौकशी सुरु झाली. त्यांची पत्नी दुःखाने तळमळत आपल्या बंधुकडे श्री. बाबाजींकडे येवून सर्व वृत्तांत सांगू लागली. श्री. बाबाजींना मेहुण्यावरील हे संकट ऐकून फारच वाईट वाटले. या कठीण प्रसंगातून कुंभारगल्लीचे श्रीस्वामीच आपणास मार्ग दाखवतील या विश्वासाने श्री. बाबजी कोल्हापुरात आले. वैराग्यमठीत जाऊन श्रीस्वामी चरणी दंडवत घालून दुःखाने रडू लागले. आपल्या मेहुण्यास या खोट्या बदनामीपासून वाचविण्याची त्यांनी तळमळीने विनंती केली. सत्यवादी राहून चोख काम करुनही काही कपटी लोकांनी त्यांच्या मेहुण्यावर निष्कारण खोटे आरोप करुन त्यांची बदनामी चालविली होती. त्यामुळेच श्री. बाबाजी पाटील अत्यंत व्यथित झाले होते. त्यांनी आपला मेहुणा निर्दोष सुटल्यास शंभर रुपये खर्च करुन त्याप्रीत्यर्थ अन्नदान करण्याचा नवस श्री स्वामी पायी कबूल केला. त्यांनी ताबडतोब त्यासाठी शंभर रुपये स्वतंत्रपणे बाजूसही काढून ठेवले. पुढे सरकार दरबारी काम सुरु असताना त्याकामी पैसे खर्च करताना त्यांनी हे बाजूस ठेवलेले शंभर रुपयेही त्यामध्ये खर्च करुन टाकले. न्यायाधिशांनी त्यावेळी निकाल दिला की, श्री. खुटवाडकर पाटील मोठे दोषी असून त्यांना पाच वर्षे कारागृहात बंदी ठेवावे. निकाल ऐकून अत्यंत दुःखाने श्री. बाबाजी पाटील मठीत येऊन श्रीस्वामीं चरणी ओक्साबोक्सी रडू लागले. त्यावेळी स्वामी म्हणाले, “आम्हांस कबूल केलेले पैसे सरकारी कामी का खर्च केले? आता आधी नवस फेडा व मग आम्ही त्यास सोडवितो. ” श्री. बाबाजींनी त्वरीतच शंभर रुपये खर्चून श्रीस्वामींच्या मठीत अन्नदान केले. त्यानंतर श्रीस्वामीं आज्ञेने दुसरे वकील नेमून पुनरपि कामची पाहाणी केली गेली तेव्हा सत्य बाहेर पडून त्यांचे मेहुणे निर्दोष ठरले. अत्यंत आनंदाने मेहुण्यासह श्री. बाबाजी श्रीस्वामींच्या दर्शनास आले. आपले फार मोठे संकट टाळून वृथा बदनामीतून आपणांस वाचविल्याबद्दल ते परत परत श्रीस्वामींचे उपकार वर्णन करु लागले. श्रीस्वामींचे आज्ञेने घरी परतले.

# ‘श्रीनृसिंह सरस्वती व श्रीकृष्ण सरस्वती स्वामी’ एकच

श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचे एक ब्राम्हण काही कामानिमित्त्य कोल्हापूरात आले कामामुळे तेथेच रहावे लागले. त्यांचा नित्यनेम होता की, दररोज कृष्णेचे स्नान करुन श्रीप्रभू दत्तात्रेयांच्या पादुकांची पूजा केल्यावरच अन्नग्रहण करायचे. पण कोल्हापूरातील कामामुळे त्यात खंड पडला. त्यामुळे त्यांनी उपोषण केले. दुस-या दिवशी वाडीक्षेत्री जाऊन प्रथम नियमाप्रमाणे श्रीचरणींची पूजा केल्यावर मगच भोजन करायचे ठरवून ते उपाशी पोटीच राहिले होते. त्यावेळी त्यांना दृष्टांतामध्ये श्रीकृष्ण सरस्वती स्वामी म्हणाले, श्रीकृष्ण सरस्वती नांवे वास्तव्य करीत आहे, तू येथेच दर्शनास येऊन तुझी नित्यपूजा पूर्ण करुन घे.” या दृष्टांतानुसार तो ब्राहमण कुंभारगल्लीत वैराग्यमठीत आला. श्रीस्वामींचे दर्शन घेऊ लागताच त्यांनी आपले दोन्ही चरण त्यांच्यापुढे करुन नित्यनेमाची पाद्यपूजा करुन घ्यावी म्हणून संकेत दिला. त्यानेही अत्यंत प्रेमाने हे चरण श्रीस्वामी नृसिंहसरस्वतीचेच समजून वाडीच्या नित्यपूजेप्रमाणे यथासांग पूजा समर्पण केली. श्रीस्वामीकृपेने त्याचे उपोषण सुटून त्याला महाप्रसादही घेता आला. असे आहेत श्रीस्वामींचे दत्तगुरुचरण.

# सज्जनभक्ताचे शत्रूपासून रक्षण

श्रीस्वामींचा एक ‘सदू’ नांवाचा भक्त होता. तो नेहमी भक्तीभावाने श्रीस्वामींची सेवा करीत असे. संसारी व्यापात सर्वांना सांभाळताना कोणी शत्रू-कोणी मित्र आपोआपच निर्माण होत असतात. त्याप्रमाणेच या ‘सदू’ चा जवळचाच नातेवाईक काही कारणाने त्याचा शत्रू बनून गेला. त्याने या सूदचा काटा काढायच्या उद्देशाने एका अघोरी वाममार्गी तांत्रिकाचा उपयोग करायचा ठरविले. त्या मांत्रिकाने ‘सदू’ ऐवजी चुकून ‘म्हादू’ ऐकून मूठ मारण्याचा अघोरी प्रकार केला. दैवदुर्बिलासामुळे ‘सदू’ ऐवजी त्याचा मुलगा ‘म्हादू’ मृत्यु पावला. सर्वत्र दुःखामुळे हलकल्लोळ झाळा. ‘सदू’ ही बातमी ऐकून मनांत काहीच न ठेवता नातेवाईकांच्या मुलाचा अपमृत्यु ऐकून त्याचे दारी गेला. त्यावेळी आंतमध्ये त्याम्हादूचा बाप दुःखाने होरपळून खरी घटना काही जनांना सांगत होता. योगायोगाने सदूच्या कांनी हे पडताच तो तात्काळ माघारी फिरला. अत्यंत श्रद्धाभक्तीने तो सदू तारासदनी वैराग्यमठीत येऊन सर्वांना श्रीस्वामी कृपेचा हा अनुभव सांगू लागला. “श्रीस्वामी पायी सेवाभक्ती केल्यामुळेच आपण मरणातून वाचलो आणि ध्यानीमनी नसताना शत्रूत्व करणा-यालाच पुत्रशोकाचे दारुन दुःख भोगावे लागले.” असे तो म्हणू लागला. श्रीस्वामींची अशी कर्तुं अकर्तुं शक्ती पाहून सर्वच सज्जनांना फार मोठा आधार लाभल्याने समाधान झाले.

# जानकाबाईच्या मुलीचे लग्न जुळविले

भल्यामोठ्या परमार्थाचा अत्युच्च विचार पटवून देणारे श्रीस्वामी प्रसंगी आपल्या भक्तांच्या संसारातील छोट्या-मोठ्या अडचणी अगदी सहतेने सोडवून टाकून त्यांना सुखी करत असत. जानकाबाई नांवाच्या श्रीस्वामींच्या एख भक्त आपल्या उपवर सुंदर मुलीच्या लग्नाच्या काळजीने चिंताग्रस्त होत्या विशेषसे धन गांठी नसलेने आपल्या या मुलीचा विवाह कसा पार पडेल ? तिला कसे स्थळ मिळेल? या विवंचनेतच त्या नेहमी राहू लागल्या. एकदा त्या आपल्या मुलीसह जानकाबाई वैराग्यमठीत श्रीस्वामींच्या दर्शनाला आल्या होत्या त्यांनी मनोभावे श्रीस्वामींचे दर्शन केले आणि त्या बाजूला उभ्या राहिल्या. त्याचसमयी दुसर्या एक चांगल्या सधन घरच्या भक्तबाई श्रीस्वामींच्या दर्शनास आल्या. त्यांनी दर्शन घेताच श्रीस्वामींनी त्या जानकाबाईच्या मुलीस हाती धरुन त्या धनिक भक्तीणीला ऐकून जरा लाजल्याच. त्यांना हे कसेतरी वाटले. आपण एकदम गरीब व ही धनिक हे नाते कसु जुळणार? हुंड्याचे काय? असे विचार क्षणभरातच तिच्या मनी आले. परंतु त्या श्रीमंत भक्तीणीने आपल्या मनाची श्रीमंतीही जानकाबाईला दाखवून दिली. तिने आपल्या घरी त्याविषयी सांगताच सर्व सुंदर योग आपोआपच जुळू आले. मोठ्या समारंभाने हा विवाह पार पडला. जानकाबाईची गुणी मुलगी योग्य स्थळी सुखाने नांदू लागली. श्रीस्वामींच्या सेवेतच भजन पूजनामध्ये रमून गेल्या.

# काळे, कबूरकर, रायबागकर, महेकर यांना अनुभव

श्री हरिपंत कांळे यांची संतती जन्मल्यावर काही काळामध्येच मृत्युमुखी पडत असे. त्यामुळे घरी सर्व सुबत्ता असूनही ते नेहमी काळजीत असत, त्यांच्या पत्नीने कुंभारगल्लीत श्रीस्वामींना शरण होऊन प्रार्थना करताच श्रीस्वामींना दया आली. त्यांच्या आशिर्वादाने पुढे त्यांच्यापोटी जन्मलेली मुले-मुली जगू लागल्या. यादरी केदारी कबूरकर नांवाचा एक वयस्कर गृहस्थ श्रीस्वामींना संततीबद्दल विनवू लागला. श्रीस्वामी म्हणाल, “दुसरे झाडास फळे येतील” त्यांचा आशय लक्षात घेऊन त्यांनी दुसरे लग्न केल्यावर साठीच्या वयांत त्यांना मुलेबाळे झाली. श्री. महादेवराव रायबागकर यांना बरेच वर्षे श्वासाचा विकार होता. त्या दम्याच्या दुखण्यावर त्यांनी अनेक इलाज केले पण गुण नव्हता. कंटाळून त्यांनी श्रीक्षेत्री वाडीस्थानी सहा महिने दत्तसेवा केली. तेथे त्यांना कुभारगल्लीमध्ये श्री स्वामींकडे जाण्याचा संकेत मिळाला. त्याप्रमाणे येऊन ते श्रीस्वामी सेवेत जसेतसे रमू लागले तसे तसे त्यांची व्याधी कमी कमी होत पूर्ण नाहिशी झाली. श्रीस्वामी आज्ञेने मग ते घरी परतले. महेकर नांवाचे गृहस्थ स्वजनांची नेहमी निंदानालस्ती करीत असत. एकदा ताराबाईंने त्यांना त्याबाबत समजावून निंदानालस्ती करीत असत. एकदा ताराबाईने त्यांना त्याबाबत समजावून सांगून अशी निंदा करु नये म्हणून सांगितले. महेकरना त्याचा राग येऊन त्यांनी ताराबाईलाच नांवे ठेवणयास सुरुवात केली. तिला नको ते शब्द वापरले आणि रागानेच मठीतून बाहेर पडले. तोच त्यांच्या जाण्याच्या मार्गावर एक सर्प आडवा पडलेला त्यांना दिसला. ते घाबरून परत फिरले. मठीत येताच श्रीस्वामी त्यांना म्हणाले, “आता का भीती धरतोस? मघाशी खोटे बोलताना भीती नाही वाटली. मग भोग ना प्रायश्चित!” श्रीस्वामींचे हे उपदेशपर बोलणे ऐकून त्याला मनस्वी पश्चाताप झाला. त्याने यापुढे ही हे उपदेशपर बोलणे ऐकूण त्याला मनस्वी पश्चाताप झाला. त्याने यापुढे ही वृत्ती सोडून देण्याची कबुली देऊन क्षमा प्रार्थना केली. श्रीस्वामींनी त्यांस आशिर्वाद दिले.

# 'विठ्ठल' - 'शिव'- 'दत्त' हे सारे एकच

परगांवीचा एक सज्जन श्रीस्वामींकडे आला. त्यांनी त्याला श्रीविठ्ठल नामाचा जप करण्यास सांगितले. त्यांची श्रीस्वामींवर पूर्ण भक्ती होती. श्रीस्वामींच्या नामाऐवजी श्रीविठ्ठलनाम घेणे त्याला रुचेना. श्रीस्वामींसमोर तो बसला असतानाच क्षणभर त्याचे डोळे लागून त्याला श्रीस्वामींच्या सिंहासनावर श्रीविठ्ठल उभे राहून भक्तांशी संवाद करताना दिसले. त्यापूर्वी त्याच्या स्वप्नांत येवून श्रीस्वामी म्हणाले होते, "एकात एक भरुन राहिला आहे तर भिन्नता कोठे आहे?" त्याच्या मनातील शंका पूर्ण निरसन होऊन विठ्ठल व स्वामी एकच' हे त्याला समजले. कोणी एक भक्त 'शिवदत्त' नामाचा जप करी. त्याला श्रीस्वामींचा दृष्टांत झाला की, "अरे दत्तामध्येच शिव आहे." त्याने फक्त 'दत्त' नामाचा जप सुरु केला पण शिवाच्या विषयी मनात द्वैत भाव धरुन तो शिवलिंगाचा द्वेष करु लागला. त्याचवेळी त्याच्या स्वप्नांत घंटांचा निनाद ऐकू येऊन 'शिव-शिव' ध्वनी कानांवर पडू लागला. त्यामुळे त्याची निद्रा भंग पावली आणि त्याच्या मनातील द्वैतभावना नाहिशी झाली. सर्व देवता समान दृष्टीने तो पाहू लागला. 'दत्त' नामाने त्याला अशी ज्ञानदृष्टी श्रीस्वामींनी प्राप्त करुन दिली. श्रीस्वामींचा बोध मनोभावे ऐकून घेणा-यास अशी सुखशांती व ज्ञानदृष्टी सहजच लाभत असत.

# वाडीचा ब्राह्मण व मयूर भक्ताचा सांभाळ

श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचा एक ब्राह्मण घरी चांगला सुखा-संपन्न असूनही संसार चक्रास कांटाळून उदासपणे घरचे सर्व ऐश्वर्य सुख त्यागून तीर्थयात्रा करीत हिंडत फिरत कोल्हापुरी आला. कुंभारगल्लीत श्रीस्वामींच्या दर्शनास तो आला. श्रीस्वामी त्यास म्हणाले, “अरे बाबा, आता हिंडणे फार झाले. येथेच रहा..” ते ऐकून त्याला वाटले आता पावसाळा आला. चातुर्मास व्रत येथे कसे रहावे? कोठे सोय होईल? थंडीवा-यात आपले कसे काय निभेल ? असे अनेक प्रश्न त्याच्या चित्तात येऊ लागले. तो त्या विचारामध्ये श्रीअंबाबाईच्या देवळामध्ये बसला होता. थकून तेथेच झोपी गेला. त्याच्या स्वप्नी श्री. अंबाबाई एका सुवासिनीच्या रुपात येऊन सांगू लागली, “अरे असा चिंतातुर का? त्या श्रीकृष्ण सरस्वती स्वामींवर भाव ठेवून येथेच रहा. तुझी सर्व सोय होईल.” त्याने हा दृष्टांत पाहून त्यास समाधान झाले. श्रीस्वामींचे बोलणे व जगन्मातेचा आदेश यामुळे त्याचे मन शांत झाले. तो. वैराग्यमठीत येताच श्रीस्वामी म्हणाले, “साक्षात् आईनेच तुमचे समाधान केले. आता शंका धरु नका.” तो श्रीस्वामींच्या आज्ञेने पुनरपि श्री अंबाबाई मंदिरामध्ये येऊन निवांत बसला. त्याचवेळी एका सदगृहस्थाने त्याची चौकशी केली. चातुर्मास समयी श्रीगुरुचरित्र वाचनाचा त्याचा नियम जाणून तो गृहस्थ म्हणाला, “मी आपणास एक दत्त मंदिर दाखवितो. तेथेच शांतपणे श्रीगुरुचरित्र वाचन करा. तुम्हांस हवी असलेली पोथी-आसन वगैरे सर्व सुविधा मी देईन. तुम्ही आता या वृद्धापकाळात इतरत्र हिंडू नका.” त्या ब्राह्मणाने सर्व व्यवस्था झालेली पाहून त्या दत्त मंदिरामध्ये शांतपणे आपला निमय सुरु केला. श्रीगुरुचरित्राचे वाचन संपवून दुपारी तो पोथी गुंडाळून ठेवीत असतानाच एक ‘मयूर’ नांवाचा श्रीस्वामींचा भक्ता त्यांच्याकडे आला. त्याने सांगितले, “श्रीस्वामींची मला आज्ञा आहे की, त्या दत्त मंदिरातील ब्राह्मणास दररोज पोथीवाचनानंतर चार महिने तू जेऊ घाल. त्यामुळे तुझे दारिद्र्य नाहीसे होईल.’’ त्या ब्राह्मणाने ते ऐकून त्याची माहिती विचारताच त्याने सांगितले, “मी फार गरीब असून कसेबसे घरी पत्नी व मुला बाळांसह कष्ट सोसून जगत आहे. परंतु श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने मला जे शक्य होईल ते मी तुम्हास नित्य देईन. तुम्ही माझा अव्हेर करु नका.” त्याची परिस्थिती पाहून तो ब्राह्मण त्याचे घरी जाण्यास का-कूं करुन लागला. परंतु त्याने आग्रहाने सांगितले की, “श्रीस्वामींचा मला तसा स्पष्ट दृष्टांत असल्यानेच मी तुमचेकडे आलो आहे. त्यामुळे तुम्ही नाही म्हणू नका.” त्या ब्राह्मणास वाईट वाटले. तो मनोमन दत्तप्रभूंना त्या ‘मयूर’ विषयी प्रार्थना करु लागला. श्रीस्वामी आज्ञेप्रमाणे तो ब्राह्मण त्याच्या घरी गेला व प्रेमाने त्याचे भोजन स्विकारले. दत्तमंदिरामध्ये त्या ब्राह्मणाची पोथी ऐकण्यास लोक जमू लागले. पोथी ऐकून ते श्रद्धेने तांदूळ, धान्य, शिधा, फळे, पैसे त्यासमोर ठेवू लागले. तो ब्राह्मण ते सर्व ‘मयूर’ ला बोलोवून त्याचेकडे घेऊन जाण्यास सांगत असे. अशा प्रकारे आनंदात चातुर्मास पार पडला. चातुर्मास समाप्ती प्रसंगी शंभर रुपये जमले. ते त्याने प्रेमाने ‘मयूर’ ला दिले. श्रीस्वामींनी त्या वाडीकर ब्राह्मणास सांगितले, “आता तुम्ही घरी जाऊन स्वस्थपणे भगवद् भजन करीत रहा.” त्या आज्ञेनुसार तो ब्राह्मण प्रसन्न चित्ताने घरी राहून आपले उर्वरीत आयुष्य भगवद् भजना मध्ये सार्थकी लावू लागला.

# भोळ्या भक्तांसाठी मठीतच ऊस आणविला

श्रीस्वामींच्या सेवेमध्ये असाच एक भोळा सदभक्त रहात होता. तो विनम्रपणे सेवा करुन श्रीगुरु ध्यानामध्ये आपला सर्व काळ शांतपणे घालवित असे. कोणाकडेही कोणती अपेक्षा ठेवून मागणी न करता जे मिळेल ते स्विकारुन अयाचित वृत्तीने तो सर्वदा मौन पाळून रहात असे. एकाद सहजच त्याच्या मनात ऊस खाण्याची फार इच्छा झाली. त्याचवेळी एक कुणबी त्याच्या मनाप्रमाणे फायदा झाल्यामुळे बोललेल्या नवसाप्रमाणे श्रीस्वामींच्या पायी ऊस अर्पण करण्यासाठी घेऊन आला. श्रीस्वामींनी त्यातील ऊस उचलून स्वहस्तेच त्या विनम्र साधकास प्रेमाने खावयास दिला. श्रीस्वामी निष्ठावान भक्तांचे मनोरथ पूर्ण करुन त्यांना नेहमीच असे गोड अनुभव देत असत.

# शिवा-शिव भेद टाळून शिऊबाईंची महती पटविली.

साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त विजयादशमी दसरा सण मोठ्या उत्साहाने सर्वत्र साजरा होत होता. करवीरनगरी साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्णपीठ. करवीर निवासींनी श्रीअंबाबाईचे प्रमुख नवरात्र नुकतेच संपन्न झाले होते. आज विजयादशमी दसरानिमित्त्य सर्वजण सीमोल्लंघन करुन दस-याचे सोने लुटण्यासाठी घराबाहेर पडत होते. श्रीस्वामींनी पण आज मौजेने आपले भक्तमंडळ सोबत घेऊन फिरायला जायचे ठरविले. आपली परमभक्त श्री. शिऊबाई हिला त्यांनी सोबत येण्याची आज्ञा केली. श्रीगुरुआज्ञेनुसार ती ही श्रीस्वामीं सोबत चालू लागली. परंतु काही अल्पमतीच्या लोकांना वाटले आजचा हा सोन्याचा दिवस मोठा सण, पर्वकाल असताना श्रीस्वामींसोबत श्री शिऊबाई सारख्या विधवा स्त्रीने पुढे पुढे जाणे बरे नव्हे. ते कुटाळ लोक तिला नांवे ठेवून तिची निंदा करु लागले. त्यावेळी श्रीवेणीमाधवा सारख्या सूज्ञ भक्तांनी त्या लोकांस समजावून दिले की, “श्री शिऊबाई ही काही आपल्या मनाने श्रीस्वामींसोबत पुढे चालली नाही तर तिला समक्ष श्रीस्वामींनीच आज्ञा केली म्हणूनच ती चालली आहे. भर तारुण्यामध्ये वैधव्य येऊनही तिने संसारिक दुःख बाजूस सारुन आजपर्यंत श्रीस्वामींच्या चरणी शरण येऊन त्यांच्या आज्ञेनुसार सारे जीवन चालविले आहे. पंचगंगेतीरी स्मशान एकांती तिने तपश्चर्या केली आहे. श्रीस्वामींसोबत मठीत रहातानाही ती पडेल ती सर्व कामे विनम्रतेने करीत असते. मठीत श्रीचरणी अर्पण झालेल्या फळपळावळ, मेवामिठाई, मिष्टान्नावर ती नजरही टाकीत नाही. श्रीस्वामी आज्ञेप्रमाणेच अयाचितवृत्तीने केवळ भिजली डाळ खाऊनच आपला नित्यक्रम चालवित असते. तिचे नामस्मरण, ध्यानचिंतन नित्य सुरु असते. आपण मात्र एकमेकांचे दोष, चुका शोधून त्याचेच चर्वितचर्वण करीत वृथा वेळ वाया घालवितो आणि पापाचे धनी होतो. आजच्या या शुभदिनी श्रीस्वामींनीच आपल्याला हा बोध घडविण्यासाठी तिला विजयादशमी दिवशी आपल्या सोबत पुढे पुढे चालविले असावे आधीच तिच नांव ‘शिऊ’ म्हणजे ‘शिव’ त्यातच ती श्रीस्वामींना प्रिय आहे. मग कसले आले आहे सधवा व विधवापण वा शिवाशिव. खरोखरीच तिच मोठी भाग्यशाली, पवित्र, पुण्यदायी आहे.” कधी कधी असे सहज लीलेतून श्रीस्वामींचे आपल्या भक्तांना आपसूचक बोध घडविण्याचे कार्य सुरु असे.

# वेणीमाधवांवर पूर्ण कृपा करुन निर्भय केले

श्रीवेणीमाधव यांच्यावरही श्रीस्वामींची अपार कृपा होती. मातापित्यांनी श्रीज्योतिबाचरणी अर्पण केल्यावर हा बालक श्रीस्वामींनीच पदरी घेतला. श्री ज्योतिबांच्या आदेशानुसार त्याने श्रीस्वामींना गुरुस्थानी मानून आपले जीवन चालविले. लिहीण्या वाचनापुरते सामान्य ज्ञान असणार्या श्रीवेणीमाधवांवर श्रीस्वामींनी कृपा करताच त्याला पंचांग पाहून मार्गदर्शन करणे जमू लागले. त्यांच्या वाणीला सिध्दी प्राप्त झाली. त्यांच्या मुखातून निघालेले शब्दू सत्य ठरु लागले. पूर्वी माधुकरी मागून त्याला खावे लागे, आता या पंचांगज्ञानाच्या शकुन, मुहूर्त सांगण्यामुळे त्याच्यासमोर आपोआपच उदरनिर्वाहासाठीचे धनधान्यवस्त्रादिक सहज येऊन पडू लागले. परंतु प्राथमिक काळात त्याने बरेच कष्ट भोगले. अन्नपाणी, पैसा, अडका, नसताना केवळ भगवत्चिंतन करीत जे मिळेल ते गोड मानून दुःख सहन केले होते. त्याची ती तपश्चर्याच आता श्रीस्वामीकृपेने फळास आली होती. श्रीक्षेत्र ज्योतिबाहून ते नेहमीच श्रीस्वामीसेवेसाठी, सहवासासाठी कोल्हापुरी जात असत. ब्रह्मचर्यव्रत पाळू संयमी, विवेकी, वैराग्यशील जीवन जगताना कोणताही गर्व, अहंकार त्यांनी केला नाही. सदा विनम्र भावनेने श्रीस्वामी चरणी त्यांनी सेवा साधली. पंचांगज्ञान ज्योतिषशास्त्राबद्दल ते म्हणत, “मला कोणतेही विशेष ज्योतिषज्ञन नव्हते, गृहनक्षत्रांचा, गुणदोषांचा अभ्यास नव्हता. केवळ श्रीस्वामीच माझ्या वाणीतून जे घडणार ते आधीच वदवीत. होऊन गेलेले व सध्या चालू असलेले भूत-वर्तमान श्रीस्वामींकृपेनेच मला समजत असे. त्यामुळेच अनेकानेक लोक माझ्याकडे येऊन मार्गदर्शन घेत असत. माझे सारे जीवन हेच मुळी श्रीस्वामींच्या कृपेचा चालता बोलता दाखला आहे.” त्यांची बरेच वर्षाची श्रीस्वामीसेवा व अनुभव ऐकण्यासाठी आसुसलेल्या सदभक्तांना त्यांनी आपले जीवनातील एक मोलाचा अनुभवही स्पष्टपणे सांगितला. श्रीवेणीमाधव बालपणा पासून श्रीप्रभू सेवेतच ब्रह्मचर्यव्रत सांभाळून अगदी मनःपूर्वक जीवन जगत होते. त्यांच्या जीवनामध्ये आजपर्यंत कोणताच गालबोट लावण्यासारखा प्रकार घडला नव्हता. परंतु एक वेळ अचानक पणेच त्यांच्या मनात आपणांस आजपर्यंत विवाहाचा किंचितसाही विचार चित्तास शिवला नसताना एकदमच हा अविचार कसा काय प्रगट झाल? हेच त्यांना समजेना, इतकी वर्षे सुंदरतेने जीवन जगून प्रौढावस्थाही पार पडल्यावर वृद्धतेकडे झुकताना अशी अविचारांची जोराची वावटळ सुटल्यामुळे श्रीवेणीमाधव मनोमन अत्यंत शोकाकुल झाले. या वयात असे दुर्विचार येणार होते तर प्रभूने याआधीच संसारी विवाह बंधनात टाकले असते तरी काही बिघडले नसते. परंतु आता असा अविचार आपल्या चारित्र्यावर निष्कारण अपकिर्तीचा डाग लावेल, या भीतीने त्यांची स्थिती अगदी दुःखाने व्याकुळ होऊन गेली. कोणासही हे दुःख सांगणेही मोठे दुष्कर होते. मग एकदम त्यांना प्रेरणा झाली, यांतून आता फक्त आपणांस श्रीस्वामींच सोडवू शकतील. त्यांनी मनोभावे श्रीज्योतिबारायांचे दर्शन घेऊन प्रार्थना केली व थेट करवीरनगरीतील कुंभारगल्लीची वाट धरली. श्रीस्वामींच्या नामचिंतनामध्ये विचार-अविचारांचे थैमान सुरु असतानाच वैराग्यमठीत जवळ येऊ लागताच त्यांचे मन एकदम शांत-निवांत होऊन पूर्ववत् निश्चल गुरुभक्तीमध्ये स्थिर झाले. श्रीस्वामींचे मनःपूर्वक नामस्मरण करीतच त्यांनी मठीत पाऊल ठेवले समोर सिंहासनी विराजमान असलेले समर्थ सदगुरु श्रीस्वामी प्रसन्नतेने हसत मुखाने पहात श्रीवेणीमाधवांना विचारु लागले, “अहो विणकरभटजी, वादळ शांत झाले का नाही?” श्रीस्वामीकृपेने सदगदीत झालेल्या श्रीवेणीमाधवांनी आपल्या दयेने मार्गातच मन शांत झाल्याचे सांगत त्यांच्या चरणावर मस्तक ठेवले. श्रीस्वामीनी त्यांस प्रेमाने शुभाशिर्वाद देऊन निर्भय केले.

# गुरुबंधूचा गैरसमज काढून प्रेमादर वाढविला

श्रीस्वामींचे आपल्या सदभक्तांवर अलोट प्रेम होते. तसेच सदभक्तांचेही एकमेकांवर बंधुवत् प्रेम निर्माण झाले होते. एकमेकांचे सुख-दुःख ऐकून एकमेक जिव्हाळ्याने चौकशी करीत असत. एकदा असाच एक प्रसंग घडून गुरुबंधूचे एकमेकावरील निर्मळ प्रेम आधिकच वृद्धिंगत झाले. सदभक्त श्रीनामदेवाचे आपल्या गुरुबंधू श्रीवेणीमाधवांवर मनापासून प्रेम होते. दोघांचीही श्रीस्वामींवर अपार निष्ठा होती. श्रीवेणीमाधव गृहस्थाश्रमी न होता ब्रह्मचारीच राहिले तर श्रीनामदेव गृहस्थाश्रमी असूनही विरक्त जीवन जगत होते. श्रीनामदेवांची पत्नी दोन मुले होऊन गेल्यावर त्यांनी स्वतःच मुलांचे संगोपन करुन आपली गुरुसेवा दृढ ठेवली. त्यांनी घरातच श्रीस्वामींची गादी स्थापून मनःपूर्वक पूजा-उपासना सुरु ठेवली होती. अशाप्रकारे दोघांचीही जीवने निर्मळपणे श्रीस्वामी भक्तीसेवेत व्यतीत होत होती. मध्यंतरी श्रीवेणीमाधवाचे मानसिक विचाराचे वादळ उठून गेले होते. त्याने स्वच्छमनाने आपला हा अनुभव काही भक्तांजवळ बोलून दाखविला होता. त्याची ही घटना कर्णोपकर्णी एखा कुटील भक्तांस कळल्यावर त्याने ही गोष्ट थोडे तिखटमीठ लावून विपरीत शब्दांत श्रीनामदेवांजवळ जाऊन सांगितले त्याने सांगितलेली गोष्ट ऐकून त्यांना ती खरी वाटेना. तरीपण आपल्या गुरुबंधूविषयी विपरीत गोष्ट ऐकून त्यांना मनःस्वी वाईट वाटले. त्यांचे मन बैचेन होऊन गेले. त्यांनी मनोमन ठरविले की, आपण त्वरीत श्री ज्योतिबा डोंगरावर जाऊन श्रीवेणीमाधवांना भेटून खरे जाणून घ्यावे. त्यांची काही चुकत असले तर त्यांना वेळीच सावध करुन मार्गावर आणावे. असा विचार करीत श्रीनामदेव थेट श्रीज्योतिबावर येऊन श्रीदेवांचे दर्शन घेऊन श्रीवेणीमाधवांचा पत्ता शोधू लागले. श्रीवेणीमाधवांकडे येताच त्यांना आपले गुरुबंधू आल्याचे पाहून आनंद झाला. त्यांनी प्रेमाने श्री नामदेवांचे स्वागत केले व कुशल विचारले. परंतु श्रीनामदेवांच्या मनी ऐकलेल्या गोष्टीचे काहून सुरु असल्याने त्यांनी अगदी स्पष्टपणेच आपण जे ऐकले ते सांगू ते विचारू लागले, “अरे वेणीमाधवा, तुझे पाऊल वांकडे तर पडले नाही ना? मी संसारी असूनही पत्नी गेल्यावरही परस्त्रीकडे वाईट नजरेने कधीच पाहिले नाही. तू तर एक वेदपाठी ब्रह्माचारी साधक शिष्य आहेस. तुझे वर्तन फारच निर्मळ असायला हवे.” श्रीनामदेवांचे बोलणे ऐकून श्रीवेणीमाधवाने अगदी मोकळ्यामनाने सर्व काही सत्य गोष्ट त्यांचे कानी घातली श्रीस्वामीकृपेनेच अविचाराचे प्रासंगिक वादळ पूर्वीच नामशेष होऊन गेल्याचे सांगितले. स्वच्छ व स्पष्ट शब्दांत आंतबाहेर काही न लपविता श्रीवेणीमाधवाने सर्व सविस्तर सांगितल्यावर श्रीनामदेवांना फारच समाधान झाले. त्यांनी श्रीवेणीमाधवाचे कौतुक करीत, आपण व्यर्थ गैरसमज करुन येथे आल्याचे त्यांनी बोलून दाखविले. श्रीवेणीमाधवाने प्रेमपूर्वक स्वहस्ते स्वयंपाक करुन आदाराने श्रीनामदेवास जेऊ घातले.

# नामदेवांना कळली विरक्त वेणीमाधवांची सदभक्ती

श्रीवेणीमाधवाने आपले अंथरुन पसरुन श्रीनामदेवांना विश्रांती घेण्यास सांगितले. परंतु त्या अंथरुणावर झोपताना पुनःश्च श्रीनामदेवांच्या मनांत शंकाकुशंकाचे जाळे निर्माण झाले. आपण यांच्या भ्रष्ट अंथरुणावर तर झोपत नाही ना ? असा विचार क्षणभर त्यांच्या मनात येऊन गेला. पण श्रीवेणीमाधवांसमोर एवढे स्वच्छ बोलणे झाल्यावर त्यांचे मन दुखविणे बरे दिसणार नाही. म्हणून श्रीनामदेव त्या अंथरुणावर विश्रांतसाठी पडले. थोड्याच वेळात झोप लागून त्यांच्यासमोर वैराग्यमठीत श्रीस्वामी प्रसन्नतेने हसत सिंहासनावर बसलेले दिसू लागले. यामुळे ते आवाज देत उठले तेव्हा श्रीवेणीमाधवाने त्यांना “काही त्रास होतो का? झोप लागत नाही का ? ” असे विचारले. “चालून थकल्यामुळे झोपमोड होत असेल.” असे सांगून त्यांना स्वस्थ निजवले. श्रीनामदेव परत झोपी जाताच त्यांच्या डोळ्यांसमोर पुनःश्च तेच श्रीस्वामींचे हसरे ध्यान प्रगट होऊ लागले. “अरे वेणीमाधवा तुझे हे अंथरुण फारच पवित्र आहे. त्यावर पडताच आपल्या श्रीसदगुरुमाऊली स्वामींच्या प्रसन्न दर्शनाचा अवीट लाभ मला घटतो आहे. कृपा करुन मला लवकर उठण्याची घाई करु नकोस.” श्रीस्वामींच्या दर्शन सुखाचा लाभ घेत श्रीनामदेव त्यादिवशी बराच वेळ निजून राहिले. मन तृप्त मनाने झोपेतून जागे होताच श्रीवेणीमाधवांना म्हणू लागले, “अरे वेणीमाधवा, खरोखरच तू थोर गुरुभक्त आहेस. मी उगीचच शंका घेऊन तुझी परिक्षा पाहण्यास आलो. श्रीस्वामींची तुझ्यावर पूर्णकृपा आहे. हे मात्र मला त्यामुळेच समजून आले. मी तुला बोध करण्याचा खोटा अहंकार बाळगला होता तो तर नष्ट झालाच पण तुझ्यामुळे मलाच सुयोग्य बोध लाभला. माझ्या बोलण्याने तुला काही त्रास झाल असेल तर मला मनापासून माफ कर. खरेच माझ्याकडून भलतीच शंका घेऊन मोठी चूक झाली आहे.” त्यांचे हे विचार ऐकून श्रीवेणीमाधवाने मोठ्या प्रेमाने त्यास हृदयी धरुन समजाविले की, “अहो नामदेवा, तुमचे माझ्यावर खरे शुद्ध प्रेम असल्यामुळेच हे सर्व घडले ना? खरोखर ही सुद्धा श्रीस्वामींचीच एक लीला आहे.” त्यांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन श्रीनामदेव कोल्हापूरी आले. कुंभारगल्लीत जाऊन श्रीस्वामींच्या पायावर डोके ठेवल्यावर ते म्हणू लागले, “नामदेव, व्यर्थ शंका घेऊन दुस-यांना दुःखी करु नये. शांत बसावे. या आता.” श्रीस्वामींचा बोध आपल्या चित्तामध्ये साठवित श्रीनामदेव शांत मनाने घरी परतले. त्यांचे गुरुबंधूवरील प्रेम अधिकच वृद्धींगत झाले.

# सर्व अवतारी पुरुष एकसमानच

श्रीस्वामी महाराज एकदा काही भक्तमंडळीना सोबत घेऊन कोल्हापूरातील मिराबाग उद्यानाकडे सहज फिरत चालले. रस्त्याने भाविक लोक श्रीस्वामींना पाहून आदराने वंदन करीत तर काही शंकेखोर कुटाळ लोक त्यांना पाहून चेष्टा करीत. वाटेतच एक जण श्रीस्वामींच्या पाया पडू लागला. त्याच्याकडे पहात श्रीस्वामी म्हणाले, “काहो, कुंभारस्वामींचा क्रम सहावाच ना?” त्या व्यक्तीला आश्चर्यच वाटले. वाडीक्षेत्री काहीजन मिळून चर्चा करीत होते की, श्रीगुरुदेव दत्त अत्री अनुसया सुपुत्रांपासून दुसरादिप लागला तर त्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविणे योग्य आहे का? त्यावर त्या व्यक्तीने कुंभारस्वामींचा क्रम सहावा ठरविले होते. त्या वाडीक्षेत्री झालेल्या चर्चेसंबंधातच श्रीस्वामींनी त्यांना सूचक शब्दांत जाण दिली. त्याव्यक्तीने सोबतच्या भक्तमंडळींना हे सर्व कथन केले. श्रीस्वामींसोबत नेहमीच अशा लीला पहायला मिळत असत. ते सर्व असेच प्रेमभक्तीने गप्पागोष्टी करीत पुढे चालले असताना ती व्यकीत म्हणाली, “आता समजले सर्व अवतार समानच योग्यतेचे, अधिकाराचे आहेत. त्यामध्ये कमी-अधिक ठरविणे म्हणजे मुर्खपणाच होता. माझी चूक श्रीस्वामींनी क्षणातच ओळखून मला आपल्या पायी उदार अंतःकरणाने ठावही दिला. मी धन्य झालो.”

# परमहंस 'स्वामी' पायी 'जतारत' योगीपुरुषाचे वंदन

श्रीस्वामी भक्तमंडळीसह मौजेने मिराबाग उद्यानाकडे जाताना रस्त्यातच एक उंच भव्य दिव्य 'जतारत' नावाच्या योगीपुरुषाने श्रीस्वामींच्या पायी मस्तक ठेवले व आशिर्वाद मागू लागला. हे 'जतारत' नांवाचे योगीपुरुष अंगावर लंगोटीपण वापरत नसत. ते पूर्णतः दिगंबरपणेच वावरत, कोल्हापूरातील महाकालीच्या बाजूस ते काही दिवस वास्तव्यास होते. गांजा ओढण्याची त्यांची अजबच पद्धती होती. कोणी कितीही दिला तरी त्यांना त्याची बाधा नसे. तसेच कित्येक दिवस न मिळाला तरी त्याची त्यांना फिकीर नसे. कोणी घरी भोजनास बोलविण्यास ते म्हणत, "हमको ये नही होना । इधर आसनपर कोई देगा तो खाना । वो ही प्यारसे देगा तो।" त्यांची अशी पक्कडवृत्ती होती. गंमत म्हणजे ते एखाद्यास भूक नाही म्हणत तर दुस-यास "बहोत भूक लगी रे, भैया" असे म्हणत त्यांना प्रेमाने कोणी 'दूध-साखर' दिली तर प्रसन्नपणे म्हणत असत, "अच्छ बेटा ।।" त्यांची ही अलमस्त रहाणी व मोहक वाणी, तशीच भव्यदिव्य कांतीमान शरीरयष्टी पाहून अनेकजन त्यांच्याकडे सहज ओढले जात अनेक भाविक भक्त त्यांच्या आजूबाजूसा नेहमीच बसून रहात. श्रीस्वामी आपल्या भक्तांसोबत मिराबाग उद्यानाकडे जात असताना महाकाली मंदिराच्याबाजूने गल्लीतून शिरुन जाऊ लागताच ते 'जतारत' योगीमहाराज अचानक आपल्या आसनावरुन उठून म्हणू लागले, "चलो रे भाई चलो, परमहंस को वंदन करो।" त्यांचे बोलणे ऐकून सोबतचे भाविक जनही त्यांच्यामागून बाहेर आले. समोरच श्रीकृष्णसरस्वती स्वामी महाराज आपल्या भक्तमंडळींसह उभे असलेले दिसले. 'जतारत' योगी महाराजांच्या सोबत आलेल्यापैकी अनेकांनी पूर्वीच श्रीस्वामींना बघितले होते. परंतु त्यांच्या ऐकीवामध्ये असे होते की, "ताराबाईने या 'वेड्याला' घरी आणून ठेवले असून कित्येक भोळेभाबडे लोक त्यांना 'देव' मानतात." त्या ऐकीव गोष्टीमुळे त्यांचेपैकी अनेकजण श्रीस्वामींकडे एक वेडा म्हणूनच पहात असत. परंतु त्यांची ज्यांच्यावर श्रद्धा होती ते 'जतारत' योगीमहारज स्वतःच आसनावरुन उठून त्यांचे दर्शनास आल्याचे पाहून ते लोक स्तिमितच झाले. श्रीस्वामींचे चरणी वंदन करुन 'जतारत' योगी महाराज प्रेमपूर्वक म्हणू लागले, "महाराजजी क्यों ऐसी दिवानी वृत्ती लिये घूम रहे हो?' हमें मालूम है आप श्रद्धालु भाविकोंपर कृपा बरसाते है ।" श्रीस्वामीपण त्यांस सांगू लागले, "आपने सही रस्ता पकडा है । दिल साफ रखके ऐसा ही चलते जाना । छोडना नहीं ।" श्रीस्वामींचे प्रेमाचे शब्द ऐकून 'जतारत' योगी महाराजांनी साष्टांग दंडवत प्रणाम करीत ते 'जतारत' योगी महाराजांनी श्रीस्वामींच्या गळ्याला मिठी मारली आणि त्यांना उचलून घेऊन प्रेमपूर्वक चुंबू लागले. मग परत आदराने श्रीस्वामींना खाली ठेवून त्यांच्यासमोर साष्टांग दंडवत प्रणाम करीत ते 'जतारत' योगी महाराज विनम्रतेने म्हणू लागले, "महाराजजी, मै तो आपका बंदा हूं । लेकीन योग की आगे की सिद्धी के लिए जरा बताना, आशिष करना-गुरुमूर्तीजी ।" त्यांची विनम्र प्रार्थना ऐकुन श्रीस्वामींनी हातांच्या खुणांनी त्यांना काही सांगत मोजक्या शब्दांत समजावून दिले. त्यावेळी अत्यंत समाधानाने ते 'जतारत' योगी महाराज आपल्या स्थानी परत जाऊ लागले. त्यावेळी त्यांच्यासोबतचे भाविकजन अगदी दिगमूढच होऊन गेले. त्यांनी त्याबाबत स्पष्टपणेच विचारल्यावर ते 'जतारत' योगी महाराज म्हणाले, "अरे भाई, ये तो महान योगीपुरष है । वे अपनी विदेहावस्था में घूमते रहते है । तुम लोगोंने इनको अभी तक पहचांना नाहीं.। आगे ध्यान रखना कभी भी इनके बारे में गलत सोचना नहीं । आपकी भूलचूक केल लिये क्षमा मॉगना । पॉव पकड कर श्रद्धासे इनके आशिष लेना । हम पर श्रद्धा विश्वास रखते हो तो जरुर ऐसो करो । नहीं तो क्या अपना अपना भाग्य ।" त्यांचे असे सुस्पष्ट बोलणे ऐकून सोबतचे भाविक पळत पळत श्रीस्वामींकडे येऊन

त्यांचे चरण वंदू लागले. तेव्हा हसत हसत त्यांच्याकडे बघत श्रीस्वामी म्हणू लागले, “त्याने प्रकाश पाडला म्हणू आलात होय? बरे झाले. पश्चाताप केला की दोष निघून जातात. काळजी नको. पण त्यां ‘सखारामा’ला संतोष द्या. सेवा करा,” ‘जतारत’ योगीमहाराजांचे मूळ नांव ‘सखाराम’ होते हे पुढे सर्वांना समजून आले. त्यावेळी कोणालाच त्यांची माहीती नव्हती.

# ‘अरेरे, बाळ पडले रे पडले’ - ‘निघाले रे निघाले’

फिरत फिरत श्रीस्वामी भक्तगणांसोबत मिराबाग उद्‌यानामध्ये येऊन बसले. तेथील सुंदर पुष्पे श्रीस्वामींना अर्पू लागले. थोडेसे मुखी लावून प्रसाद देण्यातच श्रीस्वामींना जास्त समाधान वाटे. सोबतचा अल्पोपहार करुन सर्वजण विश्रांती घेऊ लागले. तोच अचानक श्रीस्वामी उठून चालू लागले ते पाहून एका भक्ताने इतरांना आवाज देताच सर्वजण श्रीस्वामींच्या पाठीमागून चालू लागले. जवळच एक पाण्याचे पुष्करणी कुंड होते. त्यामध्ये पाण्यातत डोकावून पहात श्रीस्वामी म्हणू लागले, “अरे, पडले, बाळ पडले. पडले रे पडले. निघाले रे निघाले” श्रीस्वामींचे हे बोलणे ऐकून सर्वजन त्याच्या विचार करुन लागले. पण काहींच उलगडा होईना. श्रीस्वामींसोबत तसेच श्रीस्वामींचे दर्शन घेतलेले काही लोक येऊन परत श्रीस्वामींचे चरण श्रद्धेने धरीत सांगू लागले, “काल श्रीस्वामी जे बोलले ते आज प्रत्ययास आले. पुष्करणी कुंडात पडले. त्याच्या रडण्या-ओरडण्याचा आवाज ऐकून एकाने त्याला बाहेर काढले. श्रीस्वामी कालच बोलल्याप्रमाणेच ते बाळ पडले. आणि निघालेसुध्दा. खरोखरीच श्रीस्वामींचे ज्ञान अगाध आहे. त्यांचे सामर्थ्य मोठे आहे. त्यांच्या कृपेनेच ते बाळ वाचले” मिराबाई उद्‌यानातील माळी लोकांचेकडून ही घटना सर्वांपर्यंत पोहोचली.

# हिमालयातील यतीपुरुषाशी संस्कृत संभाषण

बाहेर फिरावयास गेलेल्या श्रीस्वामींनी सोबतच्या भक्तांना गडबड करुन परत वैराग्यमठीत चालविले. त्यांचे चित्र चित्त कोणासाठी तरी आतुर झाल्याचे दिसत होते. तसे सांकेतिक भाषणही चालले होते. सर्व भक्तांसह वैराग्यमठीत येऊन श्रीस्वामी आपल्या नित्य सिंहासनावर विराजमान झाले. अल्पावधीतच कोणी एक महान यती पुरुष हाती दंड कमंडलू-मृगाजिन घेऊन वैराग्यमठीत आले. श्रीस्वामींची व त्यांची परस्पर नजरानजर झाली. श्रीस्वामींनी संस्कृतमध्ये संभाषण सुरु करीत त्यांना म्हटेल, "जानासि त्वमेवाहमस्मि।" (मी आपणाला जाणतो.) त्यांनी पण म्हंटले, "पदाब्ज नमामि" (आपल्या चरणी वंदन असो.) प्रथमतः ते प्रेमादरपूर्वक दोघेही एकमेकांशी केवळ नजरेतून तटस्थपणे मूकसंभाषण करीत होते. किंचित कालावधीनंतर दोघोचे असे मार्मिक बोलणे सुरु झाले. श्रीस्वामी म्हणाले, "सध्या केवळ पोपटपंची वेदान्त सांगणारे खूप झालेत. स्वकर्म करणारे शुद्धाचरणी भाविकजन कमी झाले. त्यामुळेच आम्ही बाह्म वेडेपण धारण करुन संचार करतो." त्यांचे बोलणे ऐकूण ते यतीमहाराज म्हणाले, "खरे आहे आपले म्हणणे. आजकाल अनुभवाचे अद्वैत ज्ञान कोणीच मिळवू इच्छित नाही. वरवरचे शाब्दिक ज्ञान मिळवून अहंपणामध्ये वेळ घालवतात. म्हणूनच आम्हीपण मौनवृत्ती स्विकाली. आपल्यासारख्या विभूतींच्या दर्शनाने धन्यता लाभते. आपणास दत्तांश म्हणतात परंतु आपण केवळ अंशावतारी नव्हे तर पूर्णंतः दत्तात्रेयस्वरुपच आहात. पूर्वी अक्कलकोटी आपलेच वास्तव्य होते आणि सध्या आपण येथे लीलासंचार करीत आहात." त्या दोघांचे असे परस्पर हितगुज होताच. यतीमहाराजांनी परवानगी घेतली व ते मठीबाहेर पडले. श्रीस्वामी आपल्या भक्तांना सांगू लागले, "अरे बाबांनो, अशा तपस्वी यतीपुरुष लाखांमध्ये एखादाच असू शकतो. तुम्ही तर त्यांना आसन देऊन ना बसविले ना प्रसाद दिला." श्रीस्वामींचे हे बोलणे ऐकताच मठीतील भक्तमंडळी भराभर बाहेर येऊन सर्व बाजूस त्यांच्या शोध करु लागली. चहूकडे पाहूनही त्यांचा थांग लागेना. भक्तजन म्हणू लागले, "आत्ता इतक्या क्षणार्धात हे यतीमहाराज कुठे गुप्त झाले? या यतीमहारांजनी आभाळात उडी मारील की थेट समुद्राचा तळ गांठला म्हणावे? काहींच समजेना. स्वामी महाराज, केवळ तुम्हीच या अदभूत पुरुषांची कला जाणू शकता." अशाप्रकारे बोलत सर्व भक्तजन तळमळत पुनःश्च मठीत परतले.

# यतीपुरुषाचे वैराग्यमठीत पुनरपि दर्शन

हे यती महाराज हिमालयामध्ये राहून तपश्चर्या करीत होते. श्रीप्रेरणेनुसार करवीरनगरीत श्रीमहालक्ष्मी मातेच्या दर्शनासाठी आले होते. ते कोणाशीही काही न बोलता मौनवृत्तीनेच रहात होते. श्रीदेवीचे दर्शन घेऊन ते मंदिरी बसल्यावर त्यांच्या तेजस्वी मुद्रेमुळे अनेकजन त्यांच्याकडे आकर्षित झाले. लोक त्यांना नाना प्रश्न विचारु लागले पण ते शांत राहिले, अखेरीस त्यांनी न बोलता एका पाटीवर लिहून कळविले की, “माझे मौन आहे.” त्यांची पूर्ण अयाचितवृत्ती होती. ते कोणास काहीही मागत नसत. त्यांच्यापुढे ठेवलेल्या फळे-वस्त्रे वगैरे गोष्टी ते तत्काळ लहान मुलांना, गरीबांना वाटून टाकीत. केवळ थोडेसे दूध प्राशन करुन अन्य सर्व पदार्थ प्रसाद म्हणून परत देत असत. अनेकांनी त्यांची परिक्षा पाहिली पण कोठेही त्यांचा लोभ-अपेक्षा दिसली नाही. केवळ भगवती श्रीअंबाबाईचे दर्शन करुन ते शांतपणे ध्यान-नामस्मरणामध्येच गढून गेलेले दिसत असत. त्यादिवशी त्यांना मिळालेल्या अंतरिक संदेशामुळेच ते स्वतः वैराग्यमठीत श्रीस्वामींच्या भेटीस आले होते. ते मठीतून निघून गेल्यावर श्रीस्वामींच्या मुखातून त्यांची महती ऐकून सर्वजनांस परत एकवेळ तरी त्यांचे दर्शन घडावे, अशी तीव्र तळमळ लागून राहिली. श्रीस्वामींना सर्वांनी तशी प्रार्थना केली. श्रीदेवीच्या मंदिरातील पुजारीपण इतके दिवस दिसलेले ते यतीराज परत न दिसल्याचे सांगू लागले. त्यावेळी श्रीस्वामी म्हणाले, “अरे असे श्रीस्वामींचे हे बोलणे पूर्ण होता क्षणीच ते यतीमहाराज मठी सर्वांसमोर पुन्हा प्रगट झाले. श्रीस्वामींना म्हणू लागले, “बोलावणे झाले म्हणून पुनश्च आपल्या चरणी वंदन करण्यास आलो. भक्तांना पण संतोष दिला. आता येतो आम्ही.” असे बोलत बोलत काही क्षणात पुन्हा ते यतीमहाराज गुप्त झाले. सर्वजन आश्चर्यांने अगदी मुग्धच झाले. सद्भक्त त्यांच्या पुनर्दर्शनामुळे आनंदित झाले. पण त्यांचे श्रीस्वामींशी घडलेले बोलणे ऐकुन श्रीदेवीच्या मंदिरातील काहीजण म्हणू लागले, “अरे इतके दिवस तर हे ‘मौनी’ म्हणून न बोलता बसले व इथे तर चक्क बोलून गेले. त्यांच्या व्रतभंग झाला की ते ढोंगी असावेत?” हा दुर्जन लोकांचा संशय तर्कवितर्क ऐकून श्रीस्वामी सांगू लागले, “अरे पूर्वपुण्याईने आपण श्रीअंबाबाईच्या सेवेत असताना ज्ञान-पांडित्य आपणच सांभाळावे. आपण विद्वान ब्राह्मण म्हणू खोटा गर्व धरु नये. त्याप्रमाणे शुद्ध आचार-विचार पाळावा तरच खरे सार्थक होईल. निंदा-स्तुतीपेक्षा आपली स्वतःची करणी तपासावी. जावा आता. सांभाळून रहा. काळ मोठा कठीण आहे.” श्रीस्वामींचे अशा आशयाचे सांकेतिक संदर्भाचे बोलणे ऐकून सर्वजण विचार करु लागले. अभक्तांना चपराक मिळाली व त्यांचे डोळे उघडले गेले. भाविक भक्त श्रीस्वामींच्या सेवेत धन्यता मानू लागले.

# कर्नाटकातून आलेल्या बसाप्पावर अनुग्रह

श्रीक्षेत्र गाणगापुरी असताना सदभक्त श्री. विष्णू व दत्ता हे दोघे बंधु श्रीबसप्पा नामक एका सदगृहस्थाकडे अधूनमधून त्यांच्या श्रीगुरुंच्या पूजाआसतीस जात असत. त्या श्रीबसाप्पाचे सदगुरु होते श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज. श्रीक्षेत्र गाणगापुरी श्रीगुरु आज्ञेनेच त्यांची प्रतिमा स्थापून तो सपत्निक त्यांची नित्य त्रिकाळ पूजा-अर्चा सेवाभक्ती करुन राहिला होता. त्याच्या त्या स्थानातील काही अनुभवामुळे तेथील आरतीसमयी बरेचसे भाविकही येत असत. श्रीबसाप्पा हे मूळचे कर्नाटकमधील रहाणारे होते. त्यांचे काका परम शिवभक्त होते. त्या काकांचे चित्त बालपणापासूनचे परमार्थाकडे असल्याने त्यांनी लग्न न करता श्रीशिवभक्तीजन आयुष्य व्यत्तीत करण्याचे ठरविले होते. त्यानुसार गांवातील घराशेजारच्या जागी एक दिव्य शिवमंदिर उभारुन तिथेच ते नित्य पूजा अर्चा करुन संन्यस्तवृत्तीने राहात होते. श्री. बसाप्पा हे पण बालपणापासून धार्मिक वृत्तीचे असल्याने ते ही नेहमीच त्यांच्या या काकांच्या सहवासात रमत असते. श्रीबसाप्पाचे लग्न झाले होते तरीही त्यांची संसारी आसक्ती नव्हती. ते नेमीच आपल्या काकांसोबतच श्री शिवपूजनात-धार्मिक गोष्टीत जास्त रंगून गेलेले असत. परमार्थात श्रीसदगुरुशिवाय प्रगती नाही हे त्यांना माहिती असल्याने ते आपल्या श्रीकाकांनाच गुरुप्रमाणे मानत होते. त्यांचे काकाही शुद्ध आचारविचाराचे एक संतच होते. श्रीभगवान् शिवशंकराशिवाय त्यांना इतर काहीच प्रिय नसे. श्री. बसाप्पा नित्य काकांची वस्त्रे धुणे पाणी भरणे वगैरे त्यांना आवश्यक ती सर्वसेवा मनोभावे करीत असते. बरीच वर्षे अशी सेवा केल्यावर त्यांचे काका त्यांना म्हणाले, “अरे बसाप्पा, या मार्गात श्रीसमर्थ सदगुरुंचे कृपेशिवाय तरणोपाय नाही. तू माझी गुरु समजून आजवर सेवा केलीस त्यामुळे मी प्रसन्न आहे. परंतु मोक्षदाते श्रीसमर्थ सदगुरु कोल्हापूर कुंभारगल्लीतमध्ये वैराग्यमठीत श्रीकृष्णसरस्वती स्वामी नामाने वास्तव्य करीत आहेत. कोल्हापूर-करवीरनगरी ही ‘दक्षिण काशी’ च आहे व ‘श्रीस्वामी’ हे साक्षात् काशीविश्वेश्वरच होत. तू आता लवकरच त्यांचे चरणी जाऊन, त्यांची सेवा करुन त्यांचा कृपा अनुग्रह प्राप्त करुन घे.” इतकी वर्षे श्रीकाकांना गुरुस्थानी मानून त्यांची सेवा करीतच श्री. बसाप्पा जाणे त्यांना रुचले नसते. पण श्री. कांकांचीच आज्ञा असल्यामुळे ते तयार झाले. घरातील मातापित्यांना वंदन करुन आपल्या पत्नीला सर्व समजावून सांगून, श्रीकांकांची सेवा करण्याची तिला प्रेमळ सूचना देऊन श्री. बसाप्पा करवीरनगरीत जाण्यासाठी निघाले. श्रीकाकांना साष्टांग प्रणाम करुन त्यांचे मनःपूर्वक शुभ आशिर्वाद घेऊन ते करवीर नगरीमध्ये श्रीस्वामींच्या चरणी आले. कुंभारगल्लीतल्या वैराग्यमठीमध्ये श्रीस्वामींचे प्रथमच प्रसन्न तेजस्वी दर्शन घडताच श्रीबसाप्पांनी त्यांचे चरणी साष्टांग नमस्कार केला. श्रीस्वामी चरणी विनम्रतेने प्रार्थना केली की, “हे समर्था, मी आपल्या चरणी शरण आलो आहे. कृपा करुन योग्य सेवा करवून घ्या. पूर्ण कृपा-अनुग्रह करा.” त्यांची तळमळीची प्रार्थना ऐकून श्रीस्वामी म्हणाले, “पाहूया, पाहूया, रान तयार आहे. पण अजून छान मशागत केल्यास मनोरथ पूर्ण होतील. येथे राहून सेवा करा.”

# बसाप्पाच्या धर्मपत्नीवरही कृपा

# श्रीस्वामींच्या आज्ञेनुसार श्रीबसाप्पा दिनरात

नामस्मरणपूर्वक श्रीस्वामींची यथायोग्य सेवा करु लागला. मठीतील कोणतीही सेवा तत्परतेने व विनम्रतेने ते करीत असत. त्यांना घराची-पत्नीची आठवणसुद्धा नव्हती. त्यांनी इकडून तसे घरी काहीच पत्र-निरोपही पाठविला नव्हता. तिकडे त्यांची एकनिष्ठा पत्नी ते इकडे आल्यापासून केळव त्यांच्याच स्मरणामध्ये संसारकाम सांभाळीत होती. पतीच्या वचनानुसार आपल्या चुतत्यांची सासरे म्हणून नव्हे तर गुरुप्रमाणेच सेवा करीत होती. तिची मनस्वी तळमळ जाणून ते तिला धीर देत. तिला असा गुरुसेवी पती मिळाला याची नित्य जाणीव करुन देत. ते तिचेही सेवाभावी वर्तन पाहून कौतुक करीत असत. परंतु बरेच दिवस होऊनही काहीच निरोप नसल्याने ती चिंतातुर होई. तिला निश्चिंत राहण्यास सांगून ते करवीरी साक्षात् शिवस्वरुपी श्रीस्वामींच्या सेवेत गेले आहेत तरी काळजी नसावी हे पटवून दिले. ते सर्व समजून तिचे मनात असे येऊ लागले की, ‘आपणही पतीसोबत करवीरी श्रीस्वामींच्या सेवेत रहावे.’ तिने मनोमन त्याकरिंता श्रीस्वामींना नित्य प्रार्थना करणे सुरु केले. तिची तळमळ जाणून एके दिवशी इकडे श्रीस्वामींनी बसाप्पास आज्ञा केली, “अरे तुझ्या धर्मपत्नीसही लवकर इकडेच सेवेसाठी घेऊन ये.”

# परम शिभक्त काकांवर स्वामी कृपा व शिवमंदिर स्थापना

श्रीस्वामींच्या आज्ञेनुसार श्री.बसाप्पा कर्नाटकामध्ये गांवी परत गेला. प्रथमतः श्री शिवमंदिरी श्रीकाकांना सादर साष्टांग प्रणाम करुन त्यांचेशी कुशल वार्तालाप करुन त्यांच्या निरोपानुसार मगच घरी गेला. श्री बसाप्पांना पाहून माता-पिता व पत्नी एकदम सुखी झाले. श्रीस्वामींच्या मठीतील वृत्तांत सांगत श्रीबसाप्पाने आपल्याला श्रीस्वामींनी केलेली आज्ञा सांगितली. ते ऐकून पत्नीचे डोळे आनंदाने भरुन गेले. आपली प्रार्थना श्रीस्वामींनी ऐकली, याचे तिला मनस्वी समाधान झाले. थोड्या अवधीत मातापित्यांना वंदन करुन श्री. बसाप्पा आपल्या पत्नीसह विनम्रतेने यथायोग्य गुरुसेवेकरितां काकांना आशिर्वाद मागू लागले. श्री काका म्हणाले, “अरे बसाप्पा तू व पत्नी खरोखरीच अत्यंत भाग्यवान आहांत. श्रीस्वामींची तुम्हांवर निश्चितच पूर्णकृपा नजर आहे. म्हणूनच त्यांनी तुम्हा दोघांस त्यांचे चरणी आपले सार्थक करुन घ्या. आता आपली ही शेवटचीच भेट असेल म्हणून तुम्हांस माझी कथा सांगतो. मी लहानपणा पासूनच श्रीकृपेने शिवभक्तीमध्येच रंगून जाई. इतर खेळ, मित्र मला आवडत नसत. नेहमी मंदिरी जाणे खताकिर्तन ऐकणे मला आवडे. तरुणपणांतही व्यर्थ गप्पा, वादविवाद, संसारी गोष्टी मला कधीच रुचत नसत. आपल्याला भाग्याने मिळालेल नरदेह सार्थकी लागावा या तळमळीने मी ब्रह्मचारी राहून श्रीसमर्थ सदगुरुंच्या शोधासाठी प्रयत्न करु लागलो. श्री भगावान् शिवशंकराची त्याकरितां नित्य प्रार्थना करु लागलो. एके दिवशी स्वप्नामध्ये एक तेजस्वी दिगंबर सत्पुरुष सिंहासनी बसलेला दिसला. त्यांनी आदेश दिला, ‘मी कोल्हापुरी कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत आहे. तू तिथे येऊन भेट.’ त्याप्रमाणे मी कोल्हापुरी जाऊन वैराग्यमठीत शोधली. तिथे जाताच अगदी स्वप्नांतील दृष्टांताप्रमाणेच श्रीस्वामींचे सिंहासनी बसलेले प्रसन्न दर्शन झाले. मी मनःपूर्वक साष्टांग दंडवत प्रणाम करुन त्यांचे चरणी उभा रहाताच ते म्हणाले, “कैलासनाथांनी कृपा केली म्हणून इथे आलात. आता तुमचे जन्ममरण चुकेल असे निश्चित समजा. सेवा करा.” श्रीस्वामींचे असे आशिर्वाद मिळताच मी धन्य झालो. नित्य नामस्मरणपूर्वक साक्षात शिवस्वरुपी श्रीस्वामी महाराजांची जी जी शक्य असेल ती ती सेवा करु लागलो. विशेषतः श्रीस्वामींच्या सेवेमध्ये असणार्या त्यांच्या शिष्यभक्तजनांची सेवा विनम्रतेने करण्याची मला आवड होती. माझे वर्तन बघून सदशिष्य श्रीवेणीमाधव म्हणत, ‘तुम्ही फक्त श्रीस्वामींची सेवा करा, आम्ही भक्तांची नको, ते बरोबर वाटत नाही.’ त्यांचे बोलणे ऐकून मी त्यांना सांगे, ‘तो अधिकार आपला आहे. आपल्या सारख्यांची सेवा करण्याची संधी मला मिळते, हेच माझे भाग्य आहे.’ आमचा संवाद चालू असताना श्रीस्वामीच तिथे येऊन म्हणाले, “तुम्ही योग्य सेवा केलीत. आता आपल्या गांवी जाऊन श्री शिवमंदिरी सेवा करीत रहा. आम्ही तुमच्या सोबत तिथेही आहोत. काळजी करु नका. विश्वास ठेवा.” श्रीस्वामींच्या आज्ञेप्रमाणे गांवी परतलो. आपण जन्मतःच वीरशैव लिंगायत असल्याने आनंदाने श्रीशिवमंदिर बांधून त्यामध्ये एकांतात श्रीशिवोपासना करु लागलो. परंतु मनाचे समाधान होईना. श्रीस्वामी म्हटल्याप्रमाणे त्यांचे इथे समक्ष वास्तव्य जाणवेना. त्यामुळे विरहाने दुःखी झालो. अन्नपाणी वर्ज्य करुन उपोषणास बसलो. त्यावेळी दृष्टांतामध्ये येऊन स्वामींनी प्रसन्न दर्शन दिले व म्हणू लागले, “अरे, मी तर तुझ्यासोबतच गांवी आलो आहे. मला फार भूक लागली आहे, जे काही तयार असेल ते अन्न आधी मला वाढ.” तो दृष्टांत पाहून मी देहभानावर येऊन पाहू लागलो तो समोरच्या शिवलिंगाची गुलाब, मोगरा, जाईजुई

वगैरे गावात न मिळणार्या फुलांनी पूजा केलेली दिसली. श्री शिवलिंगावर मी कधीच कुंकुम वहात नसतानाही त्या पिंडीवर सुंदर सुशोभित कुंकुमतिलक रेखलेला दिसला. एकंदरीत वैराग्यमठीत श्रीस्वामींना आम्ही जसे पूजन करीत असू अगदी तसेच इथे पूजन झालेले लक्षात आले. मग श्रीस्वामी व शिवशंकर एकत्रच वास करीत असल्याचे पक्के ध्यानी आले. मी गडबडीने जो शक्य तो स्वयंपाक करुन श्रीस्वामींना नैवेद्य समर्पण केला. त्यानंतर वेळोवेळी मला या शिवमंदिरी श्रीस्वामींचे दर्शन घडू लागले. आजपर्यंत मी याची व्याचता केली नाही. पण आता तुमची गुरुनिष्ठा पाहून व ही आपली शेवटचीच भेट म्हणून सर्व कथन केले. आता तुम्ही आनंदाने श्रीस्वामी चरणांनी यथार्थ सेवा करुन त्यांच्या आज्ञेने आयुष्यक्रम चालवून कृतार्थ व्हा. माझा तुम्हांस पूर्ण आशिर्वाद आहे.” श्री. काकांना प्रेमळ निरोप घेऊन ते दोघेजन कोल्हापुरी आले.

# सदभक्त बसाप्पा हस्ते गाणगापुरी मठी स्थापना

श्रीबसाप्पा श्रीस्वामी आज्ञेनुसार आपल्या पत्नीसह वैराग्यमठीत येऊन पोहोचले. श्रीस्वामी चरणी उभयतांनी विनम्रतेने नमस्कार केला. त्यांची सेवा करीत इथेच राहू अशी दोघांची मनस्वी इच्छा होती. परंतु श्री स्वामींनी त्यांना आज्ञा केली, “तुम्ही दोघे आमची प्रतिम स्थापून गाणगापूरी रहा. तिथे आमच्या पादुका स्थापन करुन मठीत उभारा. आम्ही तेथे वास्तव्यास येऊ. नित्य पूजा आरती सेवा करीत रहा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोतच.” श्रीस्वामींची आज्ञा प्रमाण मानून दोघेही पती पत्नी त्वरीत क्षेत्र श्री गाणगापूरी आले. तिथे मठी निर्माण करुन त्यामध्ये आपले श्रीसर्मथ सदगुरु साक्षात् शिवशंकर स्वरुपी श्रीस्वामी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची सुंदर प्रतिमा व पादुका स्थापन करुन आनंदाने मनोभावे नित्य पूजा-अर्चा सेवाभक्ती करीत राहू लागले. त्यांची मठीतील दिनचर्या पाहून अनेक भाविक तेथे दर्शनासाठी येऊ लागले. काहीजन पूजा-आरतीमध्ये सहभागी होऊ लागले. श्रीबसाप्पा गुरुआज्ञेनुसार हे सर्व मनोभावे करीत असले. तरीही त्यांच्या मनी असे वाटी की, आपल्या काकांप्रमाणेच श्रीस्वामींच्या येथील वास्तव्याची आपणास समक्ष प्रचिती मिळावी. अशी तळमळ असतानाच त्यांच्या पत्नीच्या स्वप्नी श्रीस्वामींनी दर्शन दिले. श्रीस्वामी आपले सिंहासन सोडून तिच्याजवळ येऊन प्रेमाने तिला लहान बालकाप्रमाणे कुरवाळीत सांगू लागले की, ‘त्या बसाप्पाला सांग की, आम्ही तुम्हासोबत नित्य गाणगापुरीच वास करीत आहोत.’ पत्नीने हा दृष्टांत सांगताच श्री. बसाप्पा समाधानी झाले. ते या मठीत शुध्द वैराग्याने, भक्तीभावनेने रहात असत. इतरांशी काय पत्नीशीदेखील त्यांचे संभाषण कचितच घडे. ती ही पूर्ण वैराग्यशाली व सदभक्तीयुक्त अंतःकरणाने सेवाभक्ती करीत असे. त्यामुळे तिच्या स्वप्नी येऊन तिच्या अंगावरून प्रेमळ हस्त फिरवून श्रीस्वामींनी तिला आशिर्वाद दिला, हे ऐकून श्रीबसाप्पांना फारच धन्यता वाटली. त्यानंतर त्यांनाही वेळोवेळी श्रीस्वामींचे प्रसन्न मुखदर्शन तिथे मठीत घडू लागले. ते अत्यंत आनंदात श्रीस्वामी सेवा करीत रमून गेले. काही काळाने त्यांची पत्नी निवर्तली. त्यांचे मनात थोडी उदासीनता आली. श्री शिव-कृष्णगुरुंच्या सेवेतच पुढे यथासमय त्यांचेही देहावसान झाले. श्री बसाप्पा श्रीकृष्ण सरस्वती स्वामीरुपी शिवलिंगाशी लिंगैक्य पावले.

# कारखानीसांचा दैवभोग स्वामीकृपेने संपला

कोल्हापूरमध्यचे श्री. कारखानीस नांवाची एक व्यक्ती राजदरबारी नोकरी करुन रहात होती. घरी पत्नी-मुले मिळेल त्यामध्ये समाधान मानून सुखानं रहात होती. श्री. कारखानीस विशेष धार्मिक नव्हते. कधीमधी कोणासोबत श्रीअंबाबाईच्या दर्शनासाठी त्यांचे जाणे घडे इतकेच. बाकी आले काम व प्रपंच यामध्ये त्यांचे जीवन चालले होते. एकदा त्यांच्या कामावर काही चूक घडली. त्यामध्ये श्री कारखानीसांची काही फार मोठी जबाबादीर नसूनही त्यांचेवरच ठपका ठेवून त्यांचे काम बद झाले. त्यांच्यावरील या संकटामुळे घरातील सर्वांचे होऊ लागले. कारण, त्यांच्या पगारावरच सर्वकाही अवलंबून होते. आपल्यावरील संकट निरसानाकरितां त्यांनी विविध व्यवहारिक उपाय केले. काही लोकांच्या सांगण्यानुसार परिस्थितीवश होऊन धार्मिक उपायही अवलंबिले. कोणीतरी त्यांना सांगितले. ‘कुंभारगल्लीमध्ये एक महान सत्पुरुष आहेत. त्यांच्या कृपेने अनेकांची संकटे दुर झाली आहेत.’ त्यामुळे श्री. कारखानीस कुंभारगल्लीमध्ये आले. श्रीस्वामींचे दर्शन घेऊन मनातून आपली भावना सागू लागले. इकडे येण्यापूर्वीच त्यांच्या मनाला आतूनच असे वाटू लागले होते की, आपण ज्या सत्पुरुषांकडे जात आहोत त्यांच्या कृपेनेच आपले भले होणार आहे. आपण आता इतरत्र भटकण्यापेक्षा यांचेकडेच नित्य दर्शनासाठी जाऊ. नाहिरती आजवर इतके दिवस दुःखात काढले आहेतच. आता यापुढे निदान या सत्पुरुषांच्या दर्शनाने थोडे मनास समाधान शांती तरी मिळेल. असे विचार करीतच ते तेथे बसले असताना श्रीस्वामी म्हणाले, “दैवाचे भोग म्हणूनच हे दुःख तू भोसलेस. आता ती जनन्माता अंबाबाईचे तुला अन्नपाणी देईल. तू काळजी करु नकोस. पूर्ण विश्वासाने तिच्या दर्शनास जा तुझे कल्याण होईल.” आतापर्यंतचे बिकट परिस्थितीतील दिवस आठवून त्यांचे डोळे पाणावले व परत-परत या संकटातून वाचविण्यासाठी ते श्रीस्वामींचे पाय धरु लागले. श्रीस्वामींनी त्यांना धीर देऊन सांगितले, “आता तुझे दिवस पालटले आहेत. काहीच चिंता करु नकोस. देव तुझ्या पाठीशी आहे.” श्रीस्वामींचे असे स्पष्ट शब्द ऐकून श्री. कारखानीस तेथून श्रीअंबाबाईच्या देवळामध्ये आले. त्यांनी मनःपूर्वक श्री मातेचे दर्शन घेऊन प्रार्थना केली. हात जोडून नामस्मरण करीत ते श्रीमातेची प्रदक्षिणा करु लागले. प्रदक्षिणामार्गावर अंधारामध्ये त्यांच्या पायास काहीसे लागले. त्यांनी स्पर्श करुन उजेडामध्ये आणून पाहिले. तर एक कपड्यामध्ये तीन लाडू बांधलेले दिसले. कोणाचा तरी प्रसाद पडला असेल तो आपण घेऊ नये म्हणू तो परत त्याजागी ठेवू लागले. तेव्हा त्यांच्या सोबतच्या मित्राने सांगितले, “अरे इथे प्रसाद टाकून कोणी जाईल काय? तुझ्या करितांच श्रीअंबाबाईंने हा प्रसाद ठेवला आहे. त्याचा स्विकार कर.” मित्राचे ते बोलणे त्यांना पटले. तीन वर्षे भोगलेले दुःख नाहिसे करण्यासाठीच हे तीन लाडू प्रसादरुपाने श्रीमातेने आपणांस दिले असावेत, अशी त्यांची भावना झाली. त्यांनी तो प्रसाद श्रद्धेने घेतला. पुढे जेव्हा परत मठीत श्रीस्वामींकडे ते आले तेव्हा श्रीस्वामी त्यांस म्हणाले, “अरे शंका कसली घेतोस ते तुझ्यासाठीच होते. वाईट दिवस आता सरले असेच समज. सुखाने घरी जा” श्रीस्वामीचा प्रेमळ आशिर्वाद घेऊन ते घरी परतले. पुढे दोन-तीन दिवसांमध्येच त्यांचे घरी राजदरबारातून परत कामावर येण्यासाठी पत्र आले. ते आनंदाने हजर झाले. त्यांना चौकशी करुन इतके दिवसांचा तीन वर्षांचा पगार तर मिळालाच पण वेळेनुसार बढतीही जाहीर झाली. श्री. कारखानीस अत्यंत कृतज्ञतेने मठीत श्रीस्वामींकडे येऊन त्यांचे उपकार वर्णन करुन साष्टांग वंदन करु लागले, श्रीस्वामी म्हणाल, “ज्याचे त्यास मिळाले. आता आनंदाने रहा.” श्री. कारखानीस मनांत म्हणू लागले, “श्रीस्वामी आपण थोर आहात. कवेळ आपल्या कृपेनेच माझे दिवस पालटले. तरी पण आपण स्वतःकडे मोठेपणा न घेता असे लपून रहाता हे खरोखरीच आपले महानपण

आहे. आम्ही अज्ञानी लोक कसे ओळखू शकणार. आपला थोर अधिकार, दयाळूपणा व कृपेचा वर्षाव! केवळ आपल्या इच्छेनेच हे सर्व घडले." श्री. कारखानीस प्रपंचाबरोबर श्री स्वामीभक्तीत रंगून जाऊन आपले कामकाज जबाबदारीने पार पाडू लागले.

# वृद्ध गुरुभक्त स्त्रीला अंबाबाईने वाचविले

संसारतापाने पोळूनही क्वचितच एखादा भाग्यवान जीव अगदी तनमनधन पूर्वक श्रीप्रभुसेवेत, गुरुभक्तीमध्ये तल्लीन होत असतो. अशीच एक वयस्कर स्त्री, पोटी संतान नाही व पतीचे निधन झाले त्यामुळे कुंभारगल्लीतल्या श्रीस्वामींच्या चरणी मोठ्या श्रद्धेने येऊ लागली. ससारातील व्याप तिला उरला नव्हता. ती एकटीच होती व तिची वृत्तीही प्रपंचासक्तीतून मुक्त झाली होती. तिने ठरविले होते की, केवळ श्रीस्वामींच्या सेवेतच आपले यापुढील आयुष्य खर्च करायचे. श्रीस्वामींच्यादर्शनास गेल्यावर तिच्या मनातील ही सदभावना  ओळखूनच श्रीस्वामीपण फार प्रसन् झाले व तिला म्हणाले, “फार चांगले, फार चांगले. मठीतील निर्माल्य विसर्जन करायची सेवा करीत जा.” तिन हे श्रीस्वामींचे बोल लक्षात घेऊन ती दिवसभर यथाशक्य सेवा करी. घरी जाऊन जेवण करी व रात्री मठीत मुक्काम करुन भल्या पहाटे पंचगंगेवर जाऊन मठीतील निर्माल्य विसर्जन करीत असे. दर एकादशी, पौर्णिमा वगैरे पर्वकाली पंचगंगेचे स्नान करण्याचा नियमही तिने केला होता. एकदा याप्रमाणेच ती मठीतून  अंधार्यारात्रीच नेहमीच्या सवयीने निर्माल्य घेऊन पंचगंगेवर गेली. त्यावेळी पहाटेस बरीच वेळी बाकी असताना तिला वाटले नेहमीचीच वेळ झाली व ती मध्यरात्रीच तिथे गेली. पंचगंगेच्या घाटावर एक स्त्री दिसली. तिने हिला म्हटले, “अग इतक्या मध्यरात्रीच इथे कशाल आलीस? स्नानाला अजून काही वेळाने परत ये. ही स्नानाची वेळ नाही.” तिचे बोलणे ऐकून ही म्हणू लागली, “आपण तरी या मध्यरात्री कशा आल्या?” ती स्त्री म्हणाली, “ही तुझ्या गुरुंची कृपाच समज. मी नित्य येथे स्नानाला येते. आज मी पण जरा घाईनेच चुकून लवकर आले. थांब आता मी तुला चौकीपर्यंत सोडते.” ह्या भक्त स्त्रीने आपली कहाणी सांगत तिच्या बरोबर मठीच्या रस्त्याला चालणे सुरु केले. आता सरळ जवळचा रस्ता येताच ती स्त्री म्हणाली, “आता तू सुखरूप मठीत जा. येते मी.” इतके बोलून ती स्त्री एकदम दिसेनाशी झाली. ह्या भक्त स्त्रीच्या पायाजवळ पाण्याच्या लाटांचा स्पर्श जाणवला. अंधार्या रात्री धो-धो पावसांमध्ये पंचगंगेला पूर आला होता फार दूर पर्यंत पाणी पसरले होते. आपण मग नेहमीच्या नदीपात्रावरील घाटापर्यंत कसे जाऊन आलो? ती स्त्री कोण असावी? या विचारामध्येच ही भक्त स्त्री मठीत घाईघाईने भीतच परतली. श्रीस्वामी तेव्हा तिला म्हणू लागले. “अग साक्षात् अंबाबाईनेच येवून तुला दर्शन दिले. इतक्या मोठ्या पुरातून वाचविले काही चिंता करु नकोस.” श्रीस्वामींचे हे बोलणे ऐकून त्या भक्त स्त्रीला पश्चाताप झाला की, ‘प्रत्यक्ष श्रीअंबाबाई सामन्य स्त्री रुपात आल्याने आपण तिला ओळखले नाही. तिचे साधे दर्शनही केले नाही. आपल्याला कशी काय इतकी भूल पडली असावी? हे सर्व घडले श्री स्वामींच्या कृपेनेच. आता त्यांची सेवा मरे पर्यंत घडत राहो हीच प्रार्थना’ श्रीस्वामी सेवेतच उर्वरीत जीवन कंठून तिने आपले सोने करुन घेतले.

# स्वामींनी ताप वस्त्रात बांधून टाकला

श्रीसमर्थ सदगुरु श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज एकदा ज्वर तापाने फारच आजारी झाले. त्यांचे शरीर तापाने अगदी फणफणत होते. नित्याचे हिंडणे-फिरणे एकदम बंद झाले. त्यांची अशी अवस्था पाहून सदभक्त ताराबाई काळजीने कासावीस झाली. तिनेही श्रीस्वामींसाठी खाणेपिणे सोडून ती नित्य त्यांच्या आसनाशेजारी बसून राहू लागली. अनेकानेक वैद्य, डॉक्टरांचे विविध औषधोपचार केले. ताराबाईने तर कुलस्वमी श्रीखंडोबा देवास प्रार्थना करुन ‘जर कुळधर्म चुकला असेल तर मी पूर्ण करते.’ असे वचन दिले. प्रेमाने वेडी बनलेली ताराबाई चक्क श्रीस्वामींच्या कपाळी दत्तावधूतांचा अंगारा लावून ‘त्याच्याच या अवताराला बरे करा’ म्हणू लागली. तिची सर्व तगमग पाहून अखेरीस श्रीस्वामींना दया आली. दुस-या दिवशी सकाळीच श्रीस्वामींनी आपला आजार जणू काही शरीरातून काढून कौपिनीच्या वस्त्रात सांठवित, ती कौपिन स्वतःच पलंगाच्या पायास कच्च बांधून म्हणाले, “आता थोड्या वेळा करिंता हिला दूर ठेव व परत गम स्विकारू.” असे म्हणतच श्रीस्वामींनी आजूबाजूच्या भक्तांस उठवून पंचगंगेतीरी फिरण्यासाठी जाण्यास गडबड करु लागले. ताराबाई भक्तांची घाई बघून तिथे आली तर श्रीस्वामींच्या अंगात कोणताही ताप दिसेना. त्यांचा चेहरा पूर्ववत् प्रसन्न पाहून तीही आनंदाने चकित झाली. श्रीसमर्थ रामदास स्वामींनी आपला ताप असाच एके प्रसंगी श्री छत्रपती शिवरायांच्या भेटीसमयी आपल्या छाटीमध्ये काढून ठेवल्याची कथा या समयी सर्व भक्तांना प्रचीतीस आली. श्री. गुरुसेवा-संगतीचे महात्म्य व सदगुरुंची अगाध शक्ती सर्वांच्या ध्यानी यावी. याकरितांच श्रीस्वामींची ही लीला घडली होती, असे वाटते.

# विष्णुपंताचा गर्व नाहिसा करुन भक्ती दृढ केली

नित्याच्या सोबती भक्तमंडळीसह श्रीस्वामी पंचगंगानदी तीरावर फिरत आले. त्यावेळी पंचगंगेस मोठा पाऊस झाल्याने पूर्ण भोवतालच्या भागात पाणीच पाणी झाले होते. श्री. स्वामींनी आपल्या सोबतच्या सदभक्त श्री. विष्णुपंतांना सांगितले, “आत्ताच या पाण्यात उडी टाक, जर परतीरावर जाऊन पोहोचाल तर मुक्ती निश्चित मिळेल. वेळ गेल्यास परत संधी दुर्मिळ.” हे ऐकताच श्री. विष्णुपंत म्हणाल, “श्रीस्वामी, आपली वाणी हेच आमचे जीवन. मुक्तीपेक्षा तुमची संगतीच मला महत्वाची वाटते. या इतक्याशा पाण्यातून पलीकडे जाण्याची काही विशेष बाब नाही. मी दोन वेळा सुद्धा जाऊन येऊ शकेन.” श्री विष्णुपंतांना चांगले पोहता येत असल्याने त्यांना थोडा गर्व होता. परंतु त्यांनी पाण्यात उडी टाकून ते परतीराकडे जाऊ लागताच त्यांची दमछाक होऊ लागली. नेहमीप्रमाणे पोहणेही त्यांना कठीण झाले. पुढे जावे की मागे परतावे या मनःस्थितीत त्यांनी परत फिरुन नदीतीर गांठला. श्रीस्वामींच्या पायास स्पर्श करुन क्षमा मागत आपल्याला पैलतीर गांठता आला नाही म्हणून कबुली देत नमस्कार करु लागले. श्रीस्वामी म्हणाले, “कपिलाषष्ठीचा योग गेला.” श्री विष्णुपंत आपल्या गर्वाबद्दल दुःखी झाले. श्रीस्वामींच्या सेवेत-आज्ञेत आपण अजून पूर्णतः पात्र होण्यासाठी विनम्रतेने भक्ती करण्याची प्रेरणा त्यांना या प्रसंगातून लाभली. त्यांची पश्चातापबुद्धी पाहून श्रीस्वामी म्हणाले, “काम झाले. काम झाले.”

# बंधूचा मृत्यु सांगितला व घर पडण्यापूर्वीच सावध केले

पंचगंगा नदीतीरावरुन मठीत परत येताना श्रीस्वामी त्यांच्या लहरीप्रमाणे कधीतरी शुक्रवार पेठेतल्या एका बंधूद्वयाकडे येत असत. त्यावेळीही सोबतच्या भक्तांसह श्रीस्वामी अचानकच त्या दोघा बंधूच्या घरी आले. त्यांना अत्यंत आनंद झाला. ते दोघे एकत्रच रहात असत. त्यांची देवधर्मावर निष्ठा होती. श्रीस्वामींच्या पायी त्यांची भक्ती होती. वाडवडिलांचा पूर्वीचा रीती-रिवाज, कुलधर्म, कुळाचार ते नेहमीच पद्धतशीरपणे सांभाळीत असत. श्रीस्वामींच्या आगमनामुळे त्यांना फारच बरे वाटले. साक्षात् दत्तप्रभू करवीरी भिक्षेस नित्य फेरी करतात. त्याप्रमाणे आज श्रीस्वामीरुपात आपल्या घरी दत्तप्रभूच आलेत, अशी त्यांची सदभावना होती. त्यांनी प्रेमाने पूजन करुन थोडे भोजन करण्याची श्रीस्वामींना विनंती केली. श्रीस्वामी म्हणाले, “मी तर नुकताच आजारातुन उठलो, मला काही नको. पण या सोबत्यांना जेऊ घाल.” सोबतचे भक्त म्हणाले, “श्रीस्वामी थोडेसे घेतील तर आम्ही प्रसाद स्विकार करु.” श्रीस्वामींनी होकार देताच अल्पावधीतच भोजनाची पंगत वाढली गेली. श्रीस्वामींनी अल्पसे दूध स्विकारुन इतरांस प्रसाद घेण्याची आज्ञा केली. त्या दोघा बंधूकडे पहात श्रीस्वामी म्हणू लागले, “आत्मा अमर आहे पण देह नश्वर आहे. येणारा प्रत्येकजण जाणारच आहे. तुम्हापैकी एकांस जावे लागेल.” त्यांचे गूढ सांकेतिक भाषण कोणास समजेना. श्रीस्वामी थोड्या वेळामध्ये मठीत परत आले. त्यानंतर थोड्याच कालावधीत त्यापैकी थोरला बंधू स्वर्गवासी झाला. तेव्हा सर्वांना श्रीस्वामींच्या त्या संकेताच अर्थ उमजला. काळानुसार दुःखाचा आवेग कमी झाला. त्यानंतर अचानकपणे श्रीस्वामी पुन्हा त्या घरी गेले. तेथील बंधूला सांगू लागले, “अरे बाबा, ताबडतोब हे घर सोडून द्या.” श्रीस्वामी शब्दानुसार त्वरीतच दुसरी जागा पाहून घरातील सर्व साहित्यासह आपला सर्व कुटुंबपरिवार दुसर्या जागी हलविला. आश्चर्य म्हणज त्यानंतर काही वेळातच त्यांचे पहिले घर धडाधड पूर्णपणे कोसळून पडले ते पाहून श्रीस्वामींच्या कृपेनेच घरातील सर्वजण सुरक्षित वाचल्याचे वृत्त चोहोबाजूस पसरले. आपल्या भक्तांचे संकट निरसन करण्यासाठी श्रीस्वामींची अशी दिनरात लीला सुरुच असे.

# ब्राह्मणांचा संशय फेडून 'शिवत्व' पटविले

श्रीस्वामींच्या कृपेने एका भक्ताचे मनोरथ पूर्ण झाल्याने त्या भक्ताने साक्षात् श्रीशिवशंकर, रुद्रस्वरुपी, श्रीस्वामींनाच समक्ष रुद्राभिषेक घालण्याची तयारी केली. आकरा ब्राह्मण बोलावून वैराग्यमठीत सर्व यथासांग सामग्री श्रद्धेने आणली. श्रीस्वामीही त्याची मनोभावना जाणून व इतरांसही बोध देण्याकरितांच बाहेर फिरावयास गेलेले असतांनाही अगदी तत्परतेने त्यावेळी मठीत परत आले. जमलेल्या ब्रह्मवृंदामध्ये चर्चा सुरु होती की, "मंदिर सोडून याठिकाणी एका मानवास रुद्रभिषेक करणे बरोबर वाटत नाही. पैशासाठी हल्ली कलीयुगामुळे काहीही करणे भाग पडत आहे." त्यांना श्रीस्वामींविषयी व सदभक्त ताराबाईविषयी कोणतीही थोरवी माहिति नव्हती अहंकार-अज्ञानामुळे ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवून त्याचंी मने दूषित झाली होती. पण पैशाचा लोभ असल्याने त्यांनी श्रीस्वामींना यथासमय रुद्राभिषेक सुरु केला. त्यावेळी त्यांच्यापेक्षाही सुस्पष्ट वाणीमध्ये श्रीस्वामींनी रुद्रसंहिता पठण केली. त्या ब्रह्मवृंदांची विद्वता काय होती तर त्यांना पुरुषसूक्तवगैरेही धड म्हणता येत नसे. श्रीस्वामींनी त्यांचे शंकानिरसन करुन त्यांस सांगितले, "ही ताराबाई सामान्य नव्हे. तिच्या कर्जामुळे तो पंढरीचा विठूराय ऋणी आहे. त्याकरितांच तो येथे या रुपाने येऊन कर्ज फेडीत आहे. हे साधेसुधे घर नव्हे आमची पवित्र मठी आहे. आज तुमचा रुद्राभिषेक त्याविठोबाने मस्तकी धारण केलेल्या साक्षात् शिवलिंगावरच झाला आहे. अशी पक्की खात्री बाळगा." श्रीस्वामींचे बोलणे व घडलेल्या समक्ष सहवासाने त्या ब्राह्मणांचे चित्त परिवर्तन झाले. काही भाग्यवान ब्राह्मण त्या दिवसापासून श्रीस्वामींचे चांगलेच भक्त बनून गेले.

# सदभक्त श्री. अनंत अळतेकरांना अद्वैतदर्शन

श्रीस्वामींच्या सदभक्त मंडळीमध्ये अनेकानेक सदगुणी साधक गुरुभक्त होते. त्यापैकीच श्री. अनंत अळतेकर नांवाचे थोर सेवाभावी, निगर्वी, सदभक्त होऊन गेले. ते राजदरबारी धान्याच्या कोठीवर कामकाज पहात. त्यांचे संसाराकडे मन नव्हते. जेवढे आवश्यक तेवढे संसारकाम पाहून ते मिळतेल तितका अधिकाधिक वेळ श्रीस्वामींच्या सेवेत-सहवासात घालवित असत. राज्य दरबारी धान्य कोठीवर असताना तेथे येणार्या कोणाही साधू-संन्याशी, फकिर व गरजूंना ते मूक्त हस्ताने धान्यशिधा देत. त्यांची वृत्ती काही जनांना पसंत नसल्याने त्या लोकांनी खोटीच तक्रार राजदरबारी केली. त्यानुसार त्यांची चौकशी होऊन त्यांच्या कामाची पहाणी व त्यांच्या जबाबदारीतील धान्याची मोजणी केली गेली. त्यावेळस कुठलीही त्रुटी चुकी अधिकारी वर्गास दिसली नाही. त्यांचे सर्व कामकाज पाहून त्यांनी उत्तम शेरा दिला. खास राजांच्या कानी त्यांची उत्तम कामगिरी पोहोचली होती. श्री. अळतेकर नेहमीप्रमाणे एकदा वैराग्यमठीत सायंकाळच्या वेळी आले होते. सिंहासंनावर श्रीस्वामी विराजमान झाले होते. इतर कोणीच त्यासमयी आजूबाजूस नव्हते. श्रीस्वामींनी त्यांना आलिंगन देऊन उचलू लागताच साक्षात् हनुमंताप्रमाणेच त्यांचे स्वरुप श्री. आळतेकरांना वाटले होते. त्यांना काहीच समजेना. समोर पाहातात तर आपलीच आकृती हात जोडून उभी आहे व आपण साक्षात् श्रीस्वामीच आहोत. क्षणातच् त्यांनी डोळे झाकले तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, “अरे भिऊ नकोस. भाग्याने एखाद्याला असे दर्शन घडते.” त्यांनी डोळे उघडताच त्यांना सर्वत्र श्रीस्वामीच दिसू लागले. कुठेही श्रीस्वामींशिवाय काहीच दिसेना. ते चकितच झाले. त्यांना हे दर्शनमुख नकोसे झाले. त्यांनी श्रीस्वामींना प्रार्थना केली की, “स्वामी, तुमचे हे अद्वैत मला नको. तुम्ही स्वामी व मी सेवक हे सिंहासनावर बसण्यापेक्षा मला अधिक प्रिय आहे. स्वामी आपले प्रेम अनंत आहे.” श्रीस्वामींना बळेच बाजूला करीत श्री. अनंत अळतेकर त्या सिंहासनावरुन खाली उतरून श्रीस्वामींच्या पायी लोटांगण घालू लागले. त्यांची ही कहाणी त्यांनीच निर्मळ चित्ताने श्रीगुरुंच्या अगाध प्रेमाची लीला सर्वांना समजावी म्हणून सांगितली. सदभक्त ताराबाई श्रीस्वामींना म्हणू लागल्या, “इतक्या भक्तांमध्ये श्रीस्वामी तुम्ही फक्त अनंतरावांनाच आपल्या जागी बसविले ते कसे काय?” तेव्हा श्रीस्वामी म्हणाले. “अनंताने आपणा स्वतःस अगदी तृणवत् मानून सेवा केली. कोणताही गर्व केला नाही. मोठेपणा मिरवणे त्याला जमले नाही. त्याचा अभिमान व वारसा नाहीशा झाल्या आहेत. त्यामुळेच तर त्याला मी आपल्या जागी बळेच उचलून ठेवले.” श्री अनंतराव अळतेकर श्रीस्वामींच्या भक्तमालिकेमधील असे एक सदभक्त रत्न होते.

# श्री गोपाळराव आठल्ये यांना शुभाशिष

श्री. गोपाळराव आठल्ये हे एक सात्विक गृहस्थ धनार्जनासाठी आपले मूळ जन्मगांव सोडून कोल्हापूर आले. त्यांचे लग्न होऊन त्यांना चांगली धर्मशील पत्नी लाभली होती. परंतु लग्नास काही वर्षे होऊनही त्यांना मूलबाळ नव्हते. त्याकरितां पतीपत्नीने अनेक व्रतवैकल्ये-धार्मिक उपाय केले. त्यादरम्यानच कोल्हापुरी श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या अनेक लीला जनमानसामध्ये प्रसिद्ध पावून अनेकानेक भाग्यवान जीव त्यांचे चरणी श्रद्धेने येऊ लागले होते. सौ. आठल्येबाईंना काहीजनांकडून त्यांची माहिती कळली. त्यांचे चित्त तेव्हापासूनच श्रीस्वामींच्या दर्शनासाठी व्याकुळ झाले. त्यांना मनोमन असे वाटू लागले की, या सत्पुरुषांच्या दर्शनाने आपले भाग्य निश्चित फुलणार-फळणार. त्यानी आपल्या पतीच्या कानी ही गोष्ट घालून तिथे दर्शनासाठी जाण्याची इच्छा व्यक्त केली. श्री. आठल्ये यांनी ते ऐकून जरुर आपण दोघे तिथे जाऊन दर्शन घेऊ असे सांगितले. परंतु कामाच्या व्यापामध्ये त्यांचे जाणे घडेना. एक-दोन महिने उलटून गेले . सौ. आठल्येबाईंची तळमळ फारच वाढली. परंतु पतीच्या कामधामामुळे त्यांना काहीच बोलता येईना. एके दिवशी श्री. आठल्ये कामावर गेले असताना अगदी अचानक श्रीस्वामी काही भक्तांसोबत त्यांचे घरी गेले. सौ. आठल्येबाईंना श्रीस्वामींच्या दर्शनाने मनःपूर्वक समाधान झाले. आपली तळमळ जाणून स्वतः श्रीस्वामीच घरी आलेले पाहून त्यांचे ह्रदय आनंदाने भरुन गेले. त्यांना हा निश्चितच शुभसंकेत वाटला. त्यांनी गडबडीने पाट मांडून श्रीस्वामींना आदराने बसविले. यथाशक्य पूजन करुन थोडेसे भोजन पाणी करण्याची नम्र प्रार्थना केली. श्रीस्वामींनी सांगितले, “लवकर जे आहे ते दे. मग आम्ही तुला देऊ.” तिन समयानुसार जे होते ते श्रीस्वामीसमोर अर्पण केले. त्यातील थोडेसे मुखी भरविताच ग्रहण करीत श्रीस्वामी बोलले, “बरेच तप केले पूर्वजन्मी त्याने, तोच पोटी येईल, संसारी.” एक-दोन घास गोडधोडाचे सौ. आठल्येबाईंच्याकडून सिवकारुन श्रीस्वामी त्वरीत मठीत गेले. सायंकाळी श्री. आठल्ये कामावरुन परत येताच त्यांना सर्व वृत्तांत कळला. त्यांना मनोमन वाईट वाटले. आपण आज-उद्या करीत टाळले पणी श्रीस्वामीच स्वतःघरी येऊन गेले. त्यांनी लगेचच सौ. पत्नीसह मठी गांठली व श्रीस्वामींचे चरणी वंदन केले. त्यांचेकडे पाहून श्रीस्वामी म्हणाले, “दिले. दिले.” आशिर्वाद घेऊन ते दोघे घरी परतले, त्यानंतर यथासमय सौ. आठल्येबाई गरोदर झाल्या. त्यांना त्याकाळी डोहाळे विचारताच त्या सांगत, “काहीच नको. फक्ती श्रीहरींचे स्मरण करीत रहावे वाटते. खाण्यापिण्याची कोणतीच वासना नाही. श्रीस्वामींचे दर्शन मनोमनी घ्यावे वाटते.” सुयोग्यवेळी प्रसूती सुखरुपपणे होऊन पुत्ररत्न जन्मले. त्यांचे नांव ठेवले गेले ‘काशिनाथ’

# स्वामी कृपांकित श्री. काशिनाथ आठल्ये बुवांचे दिव्य चरित्र

बाळ काशिनाथ तीन महिन्यांचा झाल्यावर माता-पिता त्यांस घेऊन श्रीस्वामींकडे आली. त्यावेळी श्रीस्वामींनी मोठ्या हर्षाने त्या बाळ काशिनाथला आईकडून हाती घेतले. त्याचे लाड करीत गौरवाचे सूचक बोल बोलू लागले. मग एकदम शांतपणे त्या बाळाचे कानी काही गुप्तपणे सांगून त्याकडे पाहू लागताच त्या बाळानेही हुंकार दिला. तेव्हा फार आनंदाने श्रीस्वामी म्हणाले, “झाले. झाले.” असे म्हणतच त्यांनी ते बाळ मातेकडे परत देऊन घरी जाण्यास परवानगी दिली. श्रीस्वामीकृपेने पुढे ते बालक काशिनाथ यथायोग्य शिक्षण घेऊन मोठे होऊ लागले. नेहमीच खेळ सवंगडी यामध्ये त्यांचे लक्ष नसे. केवळ श्रीप्रभू भजनाची गोडी त्यांना विशेष असे. यथावकाश श्री. आठल्ये यांना अजून दोन मुले झाली. साधारण पंधरा वर्षे पूर्ण होताच चि. काशिनाथने श्रीक्षेत्र गाणगापुरी जाण्यासाठी आज्ञा मागितली सौ. आठल्ये आई त्यामुळे कष्टी झाल्या परंतु श्री. आठल्ये यांनी सर्व भवितव्य ध्यानी धरुन निर्धाराने त्यांना प्रेमळ निरोप दिला. श्रीगुरु कृष्णसरस्वती स्वामींच्या भजन पूजनामध्येच पूज्य श्री. काशिनाथ महाराज आठल्ये यांनी आपले जीवन सार्थकी लावले त्यांनी अनेक सदभक्तांना सन्मार्ग दर्शन केले. त्यांचेमुळे अनेक सामान्यजन श्रीस्वामीभक्तीने कुतार्थ झाले. ‘आपले श्रीसदगुरु स्वामी श्री कृष्ण सरस्वती दत्त महाराज यांचे ध्यान करुन सुखी व्हा,’ हाच त्यांचा सर्वांना नेहमी प्रेमळ सल्ला असे. कोणी एका सदभक्त भगीनीने त्यांचे स्वतंत्र चरित्र लेखनाची सेवा केली आहे असे ऐकिवात आहे. धन्य श्रीस्वामी व धन्य श्री आठल्येबुवा. श्री आठल्ये महाराज म्हणत, “श्रीस्वामींच्या कृपेने व पूर्वजन्मीच्या तपामुळे मला संसारातून मुक्तीचा मार्ग मिळाला. श्रीगुरुंचे पाय हेच फक्त तारक आहेत. बाकी सर्व संसारजंजाळात गुंतविणारेच आहे. त्याश्रीगुरुकृष्ण सरस्वतींचे ध्यान हृदयी नित्य धरा.”

# नाना खंडोबा व सुपुत्र बाळंभटावर स्वामीकृपा

नाना खंडोबा नावाचे एक ब्राह्मण अगदी निर्धन, गरीब होते. कसेबसे वडिलार्जित श्रीखंडोबा देवळाचे पूजे अर्चेतून मिळणार्या उत्पन्नातून त्यांचे जीवन चालू होते. परिस्थिती फार नाजूक होती कारण, अर्थप्राप्ती विशेष काहीच नसे. पोटापुरते अन्न, वस्त्र मिळाले म्हणजे भागले अशी स्थिती होती. त्यामुळे ज्योतिषी, देवदेव खूप फिरून झाले. श्रीस्वामींच्या दर्शनासही येत असत. पण पूर्वकर्मानुसार दैवभोग भोगल्याशिवाय सुटका नव्हती. या दुःखाबरोबरच आणखी एक विचित्र दुखणे त्यांचे मागे लागले होते. त्यांच्या तरुण मुलगा बाळंभट पिशाच्च बाधेने त्रासला होता. बाळंभटाअंगी त्या पिशाच्चाचा संचार होताच ते म्हणे, “मी एक स्त्री आहे. याने मला पूर्वी फारच गांजले आहे. मी त्याच्या बदला घेण्यासाठीच याला त्रास देत आहे.” शिव्या देई व काही केल्या तिकडे येण्यास तयार होत नसे. बरेच प्रयत्न केले. शेवटी श्री खंडोबा नाना अगदी जीव देण्याच्या पायरीपर्यंत जाऊन पोहोचले. काहीच मार्ग दिसेना व दुःखाचा त्रास सहन करवेना. एकदा ते असेच पूर्ण निराशेने श्रीस्वामींच्या मठीत आले. श्रीस्वामी एकटेच शेजघरी पलंगावर निजून होते. जवळच्या सदभक्तांनी त्यांना ही संधी साधून एकांतामध्ये मनमोकळे बोलण्यास सांगितले. श्री नाना डोळ्यात आसवे आणून श्रीस्वामींच्या पायी आपली कर्मकहाणी सांगू लागले. श्रीस्वामींना त्यांची दया आली वत श्रीस्वामी म्हणाले, “आपणहूनच तो येथ येईल. काळजी करु नको. आता थोडेच भोगणे राहिले. तो मुक्त होईल जा.” त्यानंतर काही दिवसांमध्येच श्री. बाळंभट स्वतःच मठीमध्ये आले. त्यांच्या अंगातील पिशाच्चाने श्रीस्वामी पायी लोळून मुक्ती प्राप्त केली. श्री. बाळंभटही त्या बाधेतून मुक्त झाला. श्रीस्वामी त्यांस म्हणाले, “श्री मल्लारीमार्तंड हा आमचाही कुळस्वामी आहे. त्याची षोडशोपचारे पूजा कर. श्रीरुद्राभिषेक कर. त्यांचे महात्म्य पठन करीत जा. तुमचे नित्य परंपरागत कर्म न चुकता करा. आता तुमचे सर्व दुःख हळूहळू नाहिसे होईल. पण जर तुम्ही यामध्ये कुचराई केली तर पुन्हा दुःख भोगावे लागेल. साधना सेवा करीत रहा. सुखी व्हाल. जा, आता. तुमचे कल्याण होवो.” श्रीस्वामींच्या वचनानुसार श्रद्धापूर्वक श्री. बाळंभटाने व नानांनी तीन वर्षे विशेष तपपूर्वक सेवा केली. त्यांची पूर्वकर्माची पापे नाश पावली. पुढे नित्य श्रीस्वामींचे नामस्मरण चिंतन, सेवा व आपली घरातील श्रीखंडोबारायाची नित्य पूजाअर्चा करुन श्री. खंडोबा नानांचा परिवार सुखी-संपन्न झाला.

# कोडोलीच्या परम दतभक्त श्री. पेंडसेशास्त्रींची स्वामीभक्ती

कोल्हापूर जवळच्या 'कोडोली' गांवी. वेदशास्त्रसंपन्न श्री. पुरुषोत्तम पेंडसे शास्त्री रहात होते. ते एक महान साधन संत पुरुष होते. ते कोडोलीमधील गावाजवळच्या जलाशयानजिक श्री गुरुदेव दत्त मंदिरी एकांतामध्ये स्नान संध्या जप तपादि साधनेत रंगून गेले होते. बहुतेक मौन धरुनच रहात. क्वचितच कोणी तळमळीने आल्यास त्यांस मार्गदर्शनाचे चार शब्द सांगून निस्पृहपणे रहात परंतु चंदनाचा सुगंध लपत नाही तद्वतच संत महात्म्याची किर्ती लपू शकत नाही. साक्षात् श्रीदत्तप्रभूंनी त्यांचेकडे येऊन दर्शन दिल्याची घटना कार्नोकानी पसरली होती. ते स्वतः नित्य सहस्त्रनामावली, गीता, भागवत वैगेरे धर्मग्रंथांचे पारायणात पूर्णवेळ घालवित. प्रातःकाली शीतल जलानेच स्नान करीत. त्यांचे सर्व वागणे, बोलणे फारच नियमित सात्विक होते. ते दररोज स्वहस्ते नैवेद्य तयार करुन श्रीदत्तात्रेयास अर्पूव वैश्वदेवादिक आन्हिक पार पाडत असत. त्यांच्या दिनचर्येत कोणतीही उणीव कधी पडत नसे. एकांती ध्यान मग्न श्री. पेंडसेशास्त्रीनां पाहून पूर्वीच्या समाधिस्त श्रषिमुनींचीच आठवण येत असे. एकदा त्यांच्या एका भक्ताघरी ते कोल्हापुरी येऊन राहिले. येथेही त्यांच्या नित्यनियम यथाक्रम सुरुच असे. त्यांची माहिती होताच अनेकजन त्यांचेकडे दर्शन-मार्गदर्शनासाठी येत असत. श्री. गोविंदराव पाटील हे मूळचे चांगले धनिक गृहस्थ असूनही दैवयोगाने त्यांची स्थिती पालटली. गांवच्या सावकाराने खोटेपणाने त्यांना कर्जाऊ ठरवून त्यांची शेतीवाडी बळकावली. त्यांची कौटुंबिक स्थिती मोठी हालाखीची झाली. त्यांना काहीच सुचेना. पूर्वसुकृतामुळे त्यांना कोडोलीच्याच श्री. पेंडसेशास्त्रींची आठवण झाली. ते त्यांचे दर्शनास येऊन तळमळीने सर्व परिस्थिती सांगून मार्ग विचारु लागले. कारण, त्याआधी त्यांनी काही ज्योतिषांना पत्रिका दाखवून मार्ग विचारला. तेव्हा काहींनी सांगितले, "अहो, तुम्ही श्री. पेंडसेशास्त्रींना शरण जा. त्यांच्या सेवेनेच तुमचे काम होऊन जाईल" त्यामुळेच मोठ्या विश्वासाने ते त्यांचे चरणी आले होते. प्रभूकृपेने श्री. पेंडसेशास्त्रींनीही त्यांना काही सेवा करण्याची संधी दिली. नाहीतर बहुधा ते कोणासच जास्त जवळीक करु देत नसत. काही दिवसांनी श्री. पेंडसेशास्त्रींनी श्री गोविंदरावांना जवळ बोलवून सांगितले, "आता तुमचे दिवस लवकरच बदलले म्हणून समजा. अहो या कोल्हापूरातच कुंभारगल्लीमध्ये साक्षात् श्रीदत्तप्रभूंचे श्रीकृष्ण सरस्वती नांवाने वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या केवळ दर्शनानेच कित्येकांची संकटे नाहीशई झालीत. तुम्ही आमच्या बोलण्यावर विश्वास ठेवा व लवकरच त्यांचे पार धरा." श्री. पेंडसेशास्त्रींचे हे बोलणे ऐकून श्री. गोविंदराव जरा नाराज झाले. त्यांची श्री. पेंडसेशास्त्रीजींच्या चरणी एकनिष्ठा होती. त्यामुळेच ते आता आपणांस इतरत्र पाठवित आहेत त्यांचे त्यांना वाईट वाटले. त्यांनी तसे बोलून दाखविताच श्री. पेंडसेशास्त्री त्यांना सांगू लागले, "अहो, तुमची आमच्यावर निष्ठा आहे म्हणूनच तर आम्ही तुम्हास तुमच्या संकाटतून तत्काळ बाहेर काढणारा हा मार्ग दिला. तुम्ही बिलकुल शंकीत न होतां त्या श्रीस्वामींचे लवकरात लवकर जाऊन दर्शन घ्या व संकटमुक्त व्हा." त्याप्रमाणेच श्री. गोविंदराव कुंभारगल्लीमध्ये श्रीस्वामींच्या दर्शनासाठई आले. त्यांनी श्री पेंडसेशास्त्रीजींच्या आज्ञेनुसार विनम्रतेने श्रीस्वामींचे दर्शन घेतले. श्रीस्वमींनी कृपादृष्टीने त्यांचेकडे पाहीले व म्हणाले, "त्यांची सेवा आम्हाला पावली. एकनिष्ठाच असावी. तुमची वाईट वेळ संपली. जा आता. पालखीची वेळ झाली आहे, नेहमीची पूजा चुकवू नका. त्यांचीच सेवा करीत रहा" त्यांचे हे बोलणे ऐकून श्री गोविंदराव आश्चर्य करु लागले. श्रीस्वामींचे अंतर्ज्ञान तसेच दयाळू, कृपाळूपणा पाहून आपण पूर्वी व्यर्थ शंका घेतली याचे त्यांना दुःख झाले. ते श्रद्धेने दर्शन घेऊन त्यांच्या आज्ञेनुसार परत श्री. पेंडसेशास्त्रीजींकडे परतले. तेथील वृत्तांत सांगून ते कृतज्ञतेने त्यांचे चरणी नतमस्तक झाले.

भावभक्तीने त्यांची सेवा सुरुच ठेवली. दोन महिन्यांनी अचानक अन्याय करणारा सावकार श्री. गोविंदरावांचे घरी स्वतः आला. त्याने आपली चूक कबूल करुन त्यांना बरोबर घेऊन गेला. पूर्वीची खोटी कागदपत्रे फाडून मुळमुद्दालाचे कर्जवसूलीनंतरचे सर्व धन व जमीन शेतीवाडी त्यांना पश्चाताप-बुद्धिने परत केली. श्री. गोविंदराव यांना तर ही घटना स्वप्नवतूच वाटू लागली. त्यांनी मनोभावे श्री. पेंडसेशास्त्रींजींचे चरणी माथा ठेवून अल्पशी दक्षिणा सेवेसाठी अर्पण केली. तसेच त्यांना सांगून ते थेट कोल्हापूरात श्रीस्वामींकडे आले. श्रीस्वामीचरणी नमस्कार करुन त्यांची स्तुती गाऊ लागले. श्रीस्वामींचे प्रसन्न दर्शन व स्वानुभवामुळे त्यांना वाटू लागले की, संसार सोडून आता यांची सेवा करीत येथेच रहावे. त्यांच्या मनातील भावना ओळखून श्रीस्वामी म्हणाले, “अहो, तुम्ही परत गांवी जाऊन उरलेला संसार पूरा करा. जवळच रहातात त्या श्री. पेंडसेशास्त्रींना विसरु नका. त्यांचीच सेवा करा. मी व ते एकच आहेत.” श्रीस्वामी आज्ञेने श्री. गोविंदराव पटाली श्री पेंडसेशास्त्रीजींच्या सेवेत राहून उरलेला संसारपूरा करु लागले. हे सर्व पाहून त्या सावकारास घोर पश्चाताप झाला. त्याने इतर सर्व कर्जदारांचे देणे-घेणेच खोटे व्यवहार फाडून सर्वांना मुक्त केले. घरच्यांना त्यांचे हे वागणे पसंत पडेना. तेव्हा त्या सावकराने कोल्हापूरच्या त्या श्रीकृष्णसरस्वती स्वामींचे मनोमन स्मरण करीत गांव सोडून कुठे अन्यत्र जाणे केले. श्री. पेंडसेशास्त्रीजी गृहस्थाश्रमी असूनही त्यागी विरागी होते. त्यांची पत्नीही त्यांची किर्ती गात असे. श्रीस्वामींच्या ठायी त्यांचा पूर्णभाव होता. ते म्हणत, “श्रीकृष्ण सरस्वती स्वामी हे प्रत्यक्ष पुराणपुरुष परमात्माच आहेत. कार्यासाठी त्यांनी अवतार धारण केला आङे. त्यांचे सर्वांनी दिवस रात्र स्मरण ठेवून स्वतःचे कल्याण साधावे.” पूज्यश्री पेंडेसेशास्त्रींजी आपल्या प्रवचनाच्या सुरुवातीस व अखेरीस मनःपूर्वक परमपूज्य श्रीस्वामींचे नामस्मरण करीत असत. ‘संतांचा महिमा संतानीच जाणावा’ हेच खरे.

# रत्नागिरीचे देवधर बनले स्वामी कृपांकित ‘आदर्श संन्यासी’

रत्नागिरी प्रांतातील एक देवधर अडनांवाचे परम भाग्यवान बालपणीच गंगेकाठी श्रीक्षेत्र वाराणसी काशी गेले. तेथे नित्य गंगास्नान करुन भोलेबाब काशीविश्वनाथ महादेवाचे दर्शन पूजन करुन वेद शास्त्राध्ययन करु लागले. यथावश्यक ज्ञान संपादन करुन तेथील गुरुजनांचे आशिर्वाद घेऊन त्यांनी हिमालयाकडे प्रयाण केले. बदरीनाथ, केदारनाथ, गंगोत्री जमनोत्री वगैरे तीर्थयात्रा केल्या. तेथील तपस्वी संतविभूर्तीचे दर्शन घेऊन आशिर्वाद मिळविले. पूर्वप्रारब्धानुसार काही काळ संसार करणे भाग पडले. पण लवकरच पत्नीचे निधन घडले. मूळचीच त्यागीवृत्ती त्यामुळे संसार त्यागून चतुर्थाश्रमी संन्यास धारण घडले. त्यांचा काही काळ कोल्हापुरात गेला तेव्हा ते निष्ठेने कुंभारगल्ली येथे जाऊन श्रीस्वामींचे दर्शन घेत असत. त्यांची विद्वत्ता-वेदांत ज्ञान व प्रत्यक्ष शुद्ध आचरण आदर्श होते. खोटे पंडित्य मिरवून, प्रवचने करुन पैसा-किर्ती मिळवणे त्यांना पसंत नसे. ते नेहमीच स्वच्छ, स्पष्ट, मधुर भाषेत आणि धर्माला योग्य तेच बोलत कोणाच्या वर्मी लागणारे कटू शब्द ते टाळीत. पण सत्य तेच प्रिय शब्दात मांडत, त्यांची किर्ती ऐकून त्यावेळचे कोल्हापूरच्या पंचगंगानदी तीरावरील श्रीस्वामी जगदगुरु शंकराचार्य पीठ, करवीर मठाचे अधिपती आपल्या काही परिचित व्यक्तींसह त्यांचेकडे मुद्दाम भेटी व स्वशंका समाधानासाठी येऊन धर्मचर्चा करुन गेले होते. त्यांचा आचार-विचार पाहून त्यांनीही मान डोलविली होती. विरक्तवृत्तीने यथोचित संन्यासाश्रम धर्माचे पालन करीत त्यांनी आठ वेळा बदरीकेदार सारख्या हिमालयीन यात्रा पायी-शारीरिक श्रम सोसून केल्या. वेद-धर्मशास्त्राच्या अध्ययनासाठी येणार्या जिज्ञासूंना त्यांनी प्रेमाने ज्ञानदान केले. परंतु कोरडे अनुभवहीन ज्ञान त्यांना रुचेना. ते संन्यासी झाले तरी परमपूज्य श्रीस्वामींच्या विदेही अवधूतरुपाची मनोभावे उपासना करीत असत. नित्य त्यांच्या दर्शनासाठी मठीत येऊन त्यांचे सिंहासना समोर विनम्र भावाने बसून रहात. परमपूज्य श्रीस्वामींच्या कृपादृष्टीनेच आपले हित होऊन जाईल, अशी त्यांची प्रांजळ श्रद्धा होती. अनेकांना त्यांची विद्वत्ता, आचार-विचार पाहून त्यांचे या स्वामींकडे जाणे येणे तितकेसे मान्य नव्हते. परंतु त्यांची निश्चल भक्त कोणीच बदलू शकले नाहीत. श्रीस्वामींच्या पायी श्रद्धेने त्यांची प्रार्थना चाले की, “स्वामीजी, आम्हासंही खरे ज्ञान, वैराग्य, भक्ती, द्यावी, केवळ लौकिक, मनसन्मान नको.” श्रीस्वामींच्या संकेता नुसारच त्यांनी तिखट, मीठ, गोड, आंबट पदार्थ वर्ज्य केले. काही काळ फक्त एक धान्याचाच आहार तर काही सर्वाचित प्रभूप्रेमभक्तीत मस्त व्हावे, हीच त्यांची नित्य तळमळ असे, ते सांगत, “श्रीकृष्ण सरस्वती स्वामी म्हणजे साक्षात दत्तात्रय भगवंतच आहेत. त्यांचेच नित्य स्मरणा मध्ये माझे आयुष्य सार्थक होवो. तेच माझे खरेखुरे ‘गुरु’ होत.” काही वेळेस लोकांना योग्य वा अयोग्य काही वाटो परंतु श्रीस्वामींची जी काही आज्ञा असेल त्याप्रमाणेच ते वागत असत. अर्थातच त्यांचे नित्य जीवन संन्यासी आश्रमातील धर्माप्रमाणेच काटेकोरपणे चालू असे. लोकांच्या निंदा-स्तुतीकडे त्यांचे लक्ष नसे. ‘श्रीस्वामींचे प्रेम हेच ज्ञान व भक्ती याशिवाय दुसरे मला काहीच नको.’ अशी त्यांची वृत्ती होती. श्रीस्वामींचेही त्यांचेवर प्रेम-कृपाृ-दृष्टी होती. नेहमीच योग्य सूचक बोलून ते त्यांना पुढे-पुढे मार्गस्थ करीत असत. एकेवेळी एका मुसलमान व्यक्तीने श्रीदेवीची सुरेख मूर्ती विक्रीसाठी आणली होती. ती मूर्ती त्यांनी खरेदी करुन स्विकारली. आपल्या नित्य उपासना व धर्मकार्यासाठी मठी बांधून त्यामध्ये या श्री त्रिपुरसुंदरी देवाची स्थापना त्यांनी केली होती. श्रीस्वामीकृपेने वयाची नव्वदी ओलांडल्या नंतरही त्यांची धर्मजीवनाची वाटचाल निस्पृहतेने शांततेने सुंदर प्रकारे व्यतीत होत होती. कृष्णेच्या काठी सांगलीमध्ये प्रवचन समयी देहास कोणतीही व्यथा न होता, पूर्ण निरोगी अवस्थेत हा थोर संन्यासी महात्मा ब्रह्मी लीन झाला.

परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती दत्तावधूतांच्या अशा थोर तपस्वी संन्यासी महात्मा श्रीदेवधर स्वामींजीं सारख्या इतरही काही कृपांकित सत्शिष्य - सदभक्त विभूतींचा पूर्णतः परिचय सार्या भक्तजनांना होणे आवश्यक वाटले तरीही अशा अज्ञात श्रेष्ठ सज्जनांची केवळ नामावलीही उपलब्ध नाही. खरोखरीच परमपूज्य श्रीस्वामींच्या अथांग जीवन चरित्रातील काही गोष्टी ऐकून वाचून आपण थक्क होऊन जातो. त्यांचे सांगोपांग संपूर्ण चरित्र कथन करुन कोणालाही शक्य होणार नाही. ते पूर्णतः अनंत, अपार, अगम्य व अतर्क्यचत रहाणार हेच खरे आहे.

# यवलूजच्या गणपतीचे जीवन स्वामीसेवेने धन्य

'यवलूज' या गांवी कोणी एक सज्जन ब्राह्मण रहात होता. त्याला 'गणपती' नांवाचा एक लहान मुलगा असतानाच त्याची पत्नी वारली. तो ब्राह्मण कोल्हापुरी येऊन राहिला. आपल्या बालक गणपतींचे प्रेमपूर्वक संगोपन करु लागला. त्यांस यथायोग्य शिक्षण देऊन त्याची सर्वतोपरी काळजी तो घेई. 'गणपती' फार हुशार व गुणी मुलगा होता. पिता मोठ्या श्रद्धेने आपल्या गणपतीसह नित्य कुंभारगल्लीमध्ये श्रीस्वामींच्या दर्शनासाठी येई. त्यांची यथायोग्य सेवा करुन दोघेही पितापत्र अत्यंत सालसपणे जीवन जगत होते. मुलाचे शिक्षण पूर्ण होऊन तो विवाह-योग्य झाल्यावर पित्याने परत येवलूज गावी आणले. तेथे त्या गणपतीचे लग्न करुन दिले. इतके दिवस पितापुत्र स्वहस्तेच करुन खात-पित होते. पण आता गणपतीची पत्नी घरी आल्यावर थोडे सुख झाले. वृद्धापकाळानुसार पित्याची तब्बेत नादुस्त रहात असे. अतिकष्टामुळे शरीर लवकर थकले होते. वयानुसार होणार्या यातना सहन होत नव्हत्या. श्रीस्वामींचे नामस्मरण पूर्वक जीवन कंठणे सुरु होते. गणपतीचे आपल्या पित्यावर फार प्रेम होते. त्याने औषधोपचार केले. सेवा केली. पण सुयोग्य समयी पित्याची प्राणज्योत मालवली. गणपतीस फार दुःख झाले. गणपती पल्या पत्नीसह कोल्हापरी श्रीस्वामींच्याकडे दर्शनास आला. त्यांच्याकडे पहात श्रीस्वामी बोलले, "हा योगही थोडाच दिसतो. कर्माचा हिशोब द्यावाच लागेल," त्यांचे बोलण्याचा विचार करीतच गणपती नित्य दर्शनास येई. लवकरच त्याचाय पत्नीस दिवस गेले. आपले उदरनिर्वाहापूरते शेत सांभाळून गणपती साधेपणाने रहात होता. प्रसुतीसमयी अचानक पत्नीस मरणप्राय दुखणे ओढवून तिचेही निधन झाले. श्रीस्वामींच्या बोलण्याचा उलगडा तेव्हा झाला. दुःखी गणपती श्रीस्वामी दर्शनासाठी येवून, "यापुढे संसाच चक्रातून सोडवा. पुनःपुन्हा त्यात अडकवू नका. आपली अविचल भक्ती द्या." अशी प्रार्थना करु लागला त्याची स्थिती पाहून काहीचा आग्रह त्याने पुन्हा लग्न करुन संसारी व्हावे, हाच होता. परंतु गणपतीने श्रीस्वामीकृपेने मनाचा बळकट निश्चय करुन त्या मोहातून स्वतःस तारले. आपली शेती पिकवून दानधर्म करीत नामस्मरण-भजनामध्ये त्याने श्रीस्वामीकृपेने आपले पुढील आयुष्य व्यतीत करण्याचे ठरविले. त्यानुसारच त्यांचे जीवन यापन सुरु होते. एके समयी गांवामध्ये शे-दोनशे वारकरी दिंडीने आले. त्यांच्या भोजनाची व्यवस्था करणे आवश्यक होते. गांवातील पाटील व इतरांनी समसमान वर्गणी काढण्याचे ठरविले. काही कुटाळ लोकांनी सांगितले, "अहो, त्या गणपतीस कोणीट सरले पुरले नाही. तो एकटाच आहे घरी, तोच यांची व्यवस्था करेल. आम्हांस मुले-बाळे, खर्च-पाणी भरपूर आहे." गणपतीच्या कांनी ही बातमी येताच तो ही आनंदाने तयार झाला. "श्रीस्वामीकृष्णगरुंच्या कृपेने सर्व व्यवस्था माझ्याद्वारे होईल. तुम्ही काही काळजी करु नका." असे त्याने ग्रामस्थांना सांगितले. कोल्हापुरातील एक व्यापारी स्नेही तुकाराम यांना विनंती करुन गणपतीने सर्वांच्या जेवणाची यथायोग्य शिधासामग्री जमविली. त्यांचा स्नेही तुकाराम श्रीस्वामींचा भक्च होता. पण त्याचाही व्यवसाय, नफा-तोटा पाहूनच तो मदत करी. त्याने या मदतीकरितां सव्वापट व्याज कबुली करुन घेऊनच व्यवस्था केली. गणपतीने श्रीस्वामींचे स्मरण करुन ते मान्य केले. त्याप्रसंगी दोनशे वारक-यांची सुग्रास पोटभर भोजनाची सेवा त्याने केलीच परंतु त्यामध्येच गावातील सर्व लहानथोर हजारो लोकांनाही अन्नदान केले गेले. फक्त दोनशे लोकांच्या भोजनसामुग्रीतून गणपतीवर हे धर्मकार्य लादले त्यांची फजिती झाली. लोक त्यांनाच नावे ठेवू लागले. कित्येक सज्जन यासेवेत आपण सहभागी झालो नाही. म्हणून कष्टी झाले आणि गणपतीकडे वर्गणी-धान्य देऊ लागले. गणपतीने नम्रतेने त्यांना नको म्हणून सांगितले. त्यांचा व्यापारी स्नेही तुकाराम यालाही या घटनेने पश्चाताप झाला

व त्याने सव्वापट व्याज  घेताच मुळ मुद्दल इतकेच देणे परत देण्यास सांगून क्षमा मागितली. गणपतीने यथाक्रम त्यांचे देणे चुकविले. श्रीस्वामींची ही कृपा पाहून गणपतीचे मन भक्तीभावनेने अधिकच फुलू लागले. केवळ श्रीस्वामी महाराजांचे नामसंकीर्तन करीत बाह्य जगताशी कमीत कमी संपक्र ठेवूनच ते आपल्या ठिकाणीच ध्यानचिंतनात मग्न राहू लागले. इतरत्र फिरणे सोडून ते एकांतीस रमले, काही थोड्याच काळामध्ये या श्रेष्ठ सदभक्त श्री. गणपती यांचे जीवन श्रीस्वामीनामघोषातच श्रीस्वामी चरणी विलीन झाले.

# स्वकर्मनिष्ठेचा स्वामींचा बोध

कोल्हापुरात तेव्हा एक चांगला इंग्रजी विद्यासुसंस्कृत सदगृस्थ रहात होता. बालपणापासूनच त्याची बुद्धी तल्लख होती. आचार-विचार उत्तम होते. योग्य ते समयी विवाह होऊन मुलेबाळेही झाली. आपल्या शिक्षणानुसार एका शाळेत अध्यापनाची नोकरी करुन सुखाने संसार सुरु होता. परंतु खाणे-पिणे, सुख-दुःख भोगणे केवळ यासाठीच हा नरजन्म नाही. जन्मापूर्वीचे व मृत्युनंतरचे ज्ञान आपणांस नाही. मनाची समाधानी, शांती खर्या सत्याचा शोध लागणा-या थोर ऋषीमुनी, तत्त्वज्ञानी, साधुसंतांचेपाशीच दिसून येते हे त्यांना मनोमन पटले. त्याकरिता शाश्वत सुखशांतीचा मार्ग सांगणारी अनेक पुस्तके ग्रंथ असून त्यातून अनेकानेक मार्ग सांगितले आहेत. पण आपणांस योग्य तो मार्ग दाखविणारा एखादा सत्पुरुष मिळाल्याशिवाय भटकंती थांबत नाही. त्याचीही सुयोग्य वेळ आली व त्यांच्या कांनी कुंभारस्वामींची किर्ती गेली. त्यानेही वेळ न दवडतां त्वरीतच तो रस्ता पकडला. अत्यंत विनयपूर्वक श्रीस्वामींच्या चरणी माथा नमवून मनोभावे आपल्या उद्धाराचा मार्ग मिळावा, म्हणून प्रार्थना केली. त्याने कोणत्याही प्रकारे शब्दही न उच्चारता केवळ मनांतूनच ही भावना प्रगट केली असतानाही श्रीस्वामी त्याला सागूं लागले, “कोणत्याही फळाची अपेक्षा न करता आपले कर्तव्यकर्म यथोचितपणे करावे. नित्य स्नाना, संध्या, पूजा, जप वगैरे धार्मिक कृत्य श्रद्धेने न चुकता वेळचे वेळी करीत जावे. त्याकरिता मनःसंयमाने नियमाने एकेक पायरी चढत आध्यात्माच्या शिखरी पोहोचल्यास शाश्वत शांती सुख दूर नाही.” श्रीस्वामींनी आपण न बोलताच आपले मनांतील प्रार्थना जाणून सुंदर मार्ग कथन केल्यामुळे ते गृहस्थ आनंदित झाले. श्रीस्वामींचे वचनावर पूर्ण निष्ठा ठेवून त्यांनी वाटचाल सुरु केली अधून-मधून शक्य त्यावेळी समक्ष श्रीस्वामींच्या सेवेची सहवासाची संधी त्यांनी पदरी पाडून घेतली. हळूहळू मनःशांती प्राप्त होऊन त्यांचा संसार व परमार्थ सुकर होऊ लागला. श्रीस्वामी जशी व्यक्ती येईल त्यानुसार त्या सुयोग्य सन्मार्गावर आणून सोडत.

# निर्गुण निराकाराचे सगुण साकार रुप भक्तीनेच दिसले

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी हे निर्गुण निराकार परब्रम्हाचे साक्षात् सगुण साकार मनोहारी स्वरुपच होते. अनेक भाग्यवान जीव या चालत्या-बोलत्या परब्रह्माच्या सहवासाचे, सेवेचे सुख अतृप्त मनाने परत-परत दिनरात मनसोक्त लुटण्याचा प्रयत्न करीत होते. श्रीस्वामींचे हे सुंदर रुप चित्रांकित केल्यास ध्यानस्मरणासाठी व नित्य प्रतिमा पूजनार्थ सर्व भक्तांना उपयुक्त होईल असे सर्वांनाच वाटे. त्याकरितां श्रीस्वामींना ते भक्त प्रार्थना करुन असे एखादे चित्र तयार करण्याची परवानगी मागू लागले. प्रथमतः श्रीस्वामी त्यासाठी बिलकूल तयार नव्हते. श्रीस्वामी म्हणत असत, “अरे, असा कोणी अजूनी दिसत नाही. प्रथम सेवा करुन जो मला मनी-ध्यानी सांठवेल, त्याला काही तरी रेखता येईल. दोन दिवसांत स्वर्गाची प्राप्ती कशी होणार? त्याकरिता तप करायला हवे.” श्रीस्वामींचे बोलणे ध्यानी न घेताच काही चित्रकार बंधूनी आपली आता पर्यंतची कला व व्यावसायिक यश किर्ती डोक्यात सांठवून श्रीस्वामींचे चित्र तयार करण्याचा प्रयत्न केला. पण एकाही चित्रकारास हुबेहुब चित्र निर्मिती करता येईना. काहीजन तर अभिमानाने बोलून गेले व अपयश पदरी पडता मनोमन खाजिल झाले. तेव्हा दोन भाग्यवान कलाकार सद्हेतूने सेवा करु लागले. काही दिवसांनंतर त्यापैकी एकास श्रीस्वामी प्रसन्नतेने म्हणाले, “आता तुझी इच्छा पुरी करुन घे. मनांत विकल्प येऊ देऊ नकोस.” त्याला आनंदा वाटला, त्याचा सोबती कलाकार थोडा दुःखी झाला. तेव्हा तो म्हणाला, “अरे आपण दोघेही श्रद्धेने प्रयत्न करुया.” पण दुस-याने नम्रतेने सांगितले की, “अरे श्रीस्वामींची आज्ञा तुझ्याकरितांच झाली आहे. खरोखरीच तुझ्याइतकी माझी मनाची एकाग्रता होणार नाही. तुझी सेवा धन्य आहे. तूच हे चित्र काढ. त्याला तुला यशप्राप्ती निश्चित होईल.” हे ऐकुनही प्रथमचा कलाकार अजूनही पुढील काळाचा संकेत पहात थांबला.

# राजदरबारी बडोदेकर कलाकाराकडून स्वामींचे चित्र

त्याच दरम्यान कोल्हापूरच्या राजदरबारी बडोदा येथील कोणी सज्जन कलाकार योगायोगाने आला होता. त्याने विनंती करताच करवीर संस्थानचे अधिपती श्री शाहू महाराज यांनी त्याला परवानगी देऊनन राजवाड्यावर बोलाविले होते. त्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार योग्य जागी सुंदर नक्षीदार आसन सुशोभित करुन शेजारीच श्री छत्रपतींच्या मनाजोगत्या काही मोत्याच्या-रत्नाच्या माळा काढून ठेवल्या होत्या. तो भाग्यवान सज्जन चित्रकार आपले सर्व साहित्य घेऊन तयारीनिशी उभा होता. थोड्याच अवधीत श्रीछत्रपतीराजे तेथे येणार होते. त्याचसमयी इकडे कुंभारगल्लीमध्ये श्रीस्वामींनी काही भक्तांना सूचक संदेश देऊन त्वरेने चालू लागले. श्रीस्वामींच्या पाठीमागून भक्तलोक पळू लागले. ते केव्हा-कोठे जातील यांचा कधीच थांगपत्ता लागत नसे. त्यामुळे सोबतच्या भक्तांना फक्त त्यांच्या संकेतानुसार त्यांच्या मागे मागे धावावे लागत असे. श्रीस्वामींनी त्यावेळी चक्क राजदरबाराचा रस्ता पकडला. राजवाड्यामध्ये ज्याठिकाणी श्रीछत्रपतींचे चित्र काढण्याची तयारी केली गेली होती नेमके त्याच ठिकाणी श्रीस्वामींची स्वारी येऊन पोहोचली. गडबडीनेच त्यांनी अंगातील अंगरखा टोपी काढून बाजूस फेकली. एरवी स्नानासाठी लहान मुलाप्रमाणे बराच वेळ त्यांच्या मिनता केल्याशिवाय अंगातले मळकट वस्त्रही काढू देत नसणारे हे श्रीस्वामी महाराज येथे चक्क दिगंबर बनले व स्वतःच्या हस्तेच बाजूच्या मोत्यांच्या माळा मौजेने गळ्यात घालून त्या सुंदर सुशोभित आसनावर जाऊन विराजमान झाले. आजूबाजूच्या काही भक्तांची व राजसेकांची तारांबळ उडाली. कोणासच काय करावे, हेच सुचेना. भितीने यांना आसनावरुन उठविणे म्हणजे पाप आणि तसेच बघत बसले तरी श्रीछत्रपती राजेंची मर्जी काय करील कोणास ठाऊक, ही भीती धरुन एका सेवकाने हा सर्व प्रकार श्रीछत्रपतींच्या कानी घातला. त्यांनी हे ऐकून आनंदाने त्यांचेच चित्र काढण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे त्या बडोदेकर भाग्यवंताने यथाशक्ती परिश्रम घेऊन चित्र तयार केले. त्यांचे काम होता क्षणीच श्रीस्वामी त्या आसनावरुन उठले व गळ्यातील मोत्यांच्या माळा काढून तेथेच फेकल्या. भक्तांनी बळेच अंगरखा-टोपी घातली व श्रीस्वामी जलदगतीने परत जाऊ लागले. वाड्यामध्ये ही वार्ता जाताच श्रीछत्रपतींनी गाडी पाठवून परत श्रीस्वामींना वाड्यामध्ये आणून पूजा करण्याची इच्छा प्रदर्शित केली. गाडी पाढविली गेली पण श्रीस्वामी राजवाड्यामध्ये परत न येताच गाडीत बसून मठीमध्ये निघून गेले. ते पाहून श्रीछत्रपती शाहू महारांजांनी श्रीस्वामी बसलेले ते नक्षीदार आसन व त्या मोत्यांच्या माळा श्रीस्वामीसेवेत समर्पित केल्या. स्वतः मठीत येऊन एकवेळ श्रीस्वामींचे दर्शनही घेतले. त्या बडोदेकर सज्जनाने काढलेले चित्र सुंदर असले तरीही श्रीस्वामींच्या भक्तांना तीही चित्रकृती पसंत पडेना. मग पूर्वीच्या दोघा सेवक कलाकरांनी चर्चा करुन श्रीस्वामींच्या आज्ञेने प्रथम कलाकराने भीतभीतच प्रयत्न केला. त्याचे चित्रही आजपर्यंतच्या चित्रामध्ये खूपच छान निघाले तरीही पूर्णतः समाधानकारक झाले नाही. मग त्यावरच काही नामांकित - यशस्वी कलाकारांनी फेरबदल केला. अशी समयानुसार सर्वजनप्रिय चित्रकृती तयार झाली. यामध्ये श्रीस्वामींची भक्तांना विनम्रता ठेवून निरहंकारी बनविण्याची लाली घडली. तसेच तळमळीच्या प्रार्थनेनुसार श्रीस्वामींच्या प्रसन्नतेचा अनुभवही आला.

# बायजाबाई कदम परिवारांवर स्वामींची कृपा

कोल्हापुरातील पंचमुखी चावी शेजारी राहणार्या सदभक्त बायजाबाई कदम करवीर निवासीनी श्रीअंबाबाईच्या नित्यसेवा भक्तीबरोबरच कुंभारगल्लीतल्या श्रीस्वामींचीही अगदी मनोभावे भक्ती करीत होत्या. त्यांचा गणपती नांवाच मुलगा प्रथम एका सराफी दुकानी कामकाज पहात असे. त्याचे प्रामाणिक काम पाहून त्या सराफाने त्यांस स्वतंत्र उद्योग थाटून दिला. कष्ट तसे फळ लाभत गेल्याने त्यांनी छान भरभराट झाली. योग्यवेळी जाधव कुटुंबातील 'कमळा' नावांच्या मुलीबरोबर आपल्या मुलाच्या 'गणपतीचा' विवाह करावा अशी बायजाबाईंना इच्छा झाली. त्यांनी त्याबाबत श्रीस्वामींना विचारले. सोबतच नेलेल्या या 'कमळा' च्या मस्तकी श्रीस्वामींनी अक्षता उधळत्या आणि मोठ्या हर्षाने म्हणू लागले, "लक्ष्मीकांत-पुत्रकांत आम्ही यांचे लग्न केले. नवरीला पण निरखले आहे. गोकुळ नांदेल जा." हा शुभशकुन समजून बायजाईंनी विवाह समारंभा आनंदाने संपन्न केला. श्रीस्वामीभक्तीने त्या आता संसारापेक्षा पारमार्थिक मार्गावर अधिकाधिक लक्ष घालू लागल्या. एकदा आपल्या सुपुत्र गणपतीबरोबर त्या वाडीक्षेत्री गेल्या होत्या. त्यावेळी भर दुपारी उन्हाचा त्रास सोसून भक्तमंडळी दर्शनास उभी होती. ते पाहून बायजाबाईंच्या मनी त्याजागी मंडप घालून देण्याची इच्छा झाली. त्यांनी मुलाला सांगताच त्यानेही अत्यंत आनंदाने ती आईची इच्छा पुरविली. बायजाई दररोज नित्य नियमितपणे सायंआरती धुपारती समयी मठीत हजर राहून सेवा करीत. सदभक्त ताराबाई सोबतच रात्रीचा प्रसाद ग्रहण करुन उशीरा घरी परतत. श्रीस्वामींची त्यांचेवर चांगलीच कृपा होती. त्यामुळेच त्यांची व्यावहारिक तसेच पारमार्थिक उन्नती होत गेली. श्रीस्वामींना भजनाची आवड असल्याचे पाहून सदभक्त गणपतीने दर एकादशीस घरी भजन सुरु केले. घरीच श्रीस्वामींचे भक्ती मंदीर उभारुन सेवा सुरु ठेवली. अद्यापही त्यांचे नातू-पणतू ही सेवा करीत आहेत.

# गोकुळशिरगांवचे 'समाधीबाबा' व संत 'जत्रटकरबाबा'

करवीरनगरी जवळील 'गोकुळशिरगांव' यागांवी श्रीसमाधीबाबा नांवाचे एक महान साधक होऊन गेले. 'श्रीरघुनाथ' हेच आपले सदगुरु असे ते सर्वांना सांगत. जळीस्थळी सर्वत्र 'श्री रघुनाथ' सदगुरुरायाचे त्यांना दर्शन घडे. ते गृहस्थाश्रमी असूनही पूर्ण सदभक्तीमध्ये सदैव लीन असत. त्यांची नेहमीच समाधी लागलेली अवस्था दिसून येत असल्यानेच त्यांना लोक आदराने 'समाधीबाब' असे म्हणत असत. त्यांची वृत्ती नेहमीच स्थिर समाधीस्थ पुरुषाप्रमाणे सुख-दुःखप्रसंगी अविचल शांत गंभिर दिसून येई. प्रारब्धवत् त्यांना सतरा-अठरा मुले-मुली होऊन लगेचच मरण पावली. व एकुलती एक कन्याच जिवंत राहील. तरी त्याचे कोणतेही दुःख वा वैष्यम्य त्यांचे मनीमानसी बिलकुल नसे. आपल्या सदगुरु 'श्रीरघुनाथजी' वर त्यांचा पक्का भरवंसा होता. तो जे काही करतो तेच आपल्या हिताचे आहे, अशी त्यांची पूर्णनिष्ठा होती. श्रीसदगुरुप्रेरणेने आपली ही कन्या उपवर होताच तिचा त्यांनी विवाह केला. यथावकाश तिला गर्भधारणा झाली त्यावेळी त्यांना श्री रघुनाजींचा संकेत मिळाला की, "तुम्ही आता आपले घर सोडून कन्येकडेच रहावयास जा. तिच्यापोटी येणारा कुलदीपक तुमचे कुळाचा उद्धार करेल. त्याचा सांभाळ करुन रहा. तो सत्पुरुष बनेल." त्या संकेतानुरुप श्रीबाबा आपल्या कन्येकड़े येऊन राहिले. योग्य समयी कन्या प्रसुत होऊन कुलदीपक पुत्ररत्न जन्मले. श्री. बाबांनी जाणले की, 'हा पूर्वजन्मीचा योगभ्रष्ट जीव पूर्णतेसाठी आपल्या कन्येपोटी अवतरला आहे.' श्री बाबांनी अगदी बालपणापासून त्यांचे सर्व विधीवत् पालन पोषण केले. स्वतःचे नांव त्यास दिले. सुमुहूर्तावर त्यांचे मौजीबंधन केले. बघता बघता हा बालक मोठा होऊन चौदा वर्षाचा झाला. श्रीबाबाजींना वाटले आपल्या प्रमाणेच या नातवांसही श्रीसदगुरुंचा अनुग्रह व्हावा. त्यांची तळमळ पाहून श्रीरघुनाथजींनी त्यांना दृष्टांत देऊन सांगितले, "बाब, तुम्ही या कुमारास कोल्हापुरातील कुंभारगल्लीमध्ये पाठवा. तेथे वैराग्यमठीत श्रीकृष्णसरस्वती स्वामी अवधूतमूर्तीरुपाने वास करीत आहेत. खरे तर तुम्हीच त्याच्यासोबत जावे लागत होते. पण तुमच्या वयोमानामुळे तुमचे जाणे होणार नाही. तेव्हा तुम्ही त्याला एकट्यालाच तिथे पाठवा. मी व ते एकच आहोत." रघुनाथजींचा हा सुंदर दृष्टांत पाहून श्रीबाबा अत्यंत सुखी समाधानी झाले. त्यांची तळमळ शांत झाली. त्यांनी प्रेमाने कुमारास आपल्याजवळ घेऊन सर्व समजावून सांगितले, "आता यापुढे मला व आईस त्या श्रीस्वामी रुपातच पहात जा. तेच तुझे समर्थ सदगुरु असून फार झाले. तेव्हा आता मला निरोप दे." असे स्पष्ट शब्दांत सांगून श्रीबाबांनी आपल्या वयाच्या एकशेविसाव्या वर्षी दिर्घायु पूर्ण करुन आपली जीवनयात्रा संपविली. त्यांचे निधनानंतर कुमारास अत्यंत विरह झाला. त्यांचे तेजस्वी मुखमंडल, दीर्घ तपस्वी जीवन व आपल्यावरील अलोट प्रेम आठवून त्याचा कंठ भरुन येई. परंतु थोड्याच कालावधीत त्याने स्वतःस सावरले आणि त्यांच्या शेवटच्या आज्ञेनुसार कोल्हापूरी जाण्यास तयारी केली. श्रीसमर्थ सदगुरुंच्या दर्शनाच्या तीव्र ओढीने पायीच पण लगबगीने हो कुमार झपाझप पावले टाकीत कोल्हापूरी येऊ लागला. बारा-तेरा मैलावरील हा पदरस्ता चालताना त्याचे मनी श्रीसदगुरुंच्या रुपाविषयी-दर्शनाविषयी अनेक विचार येऊ लागले. आजपर्यंत आपले आजोबा श्री बाबांनी जे संस्कार, प्रेम दिले त्याचेही स्मरण त्यास होऊ लागले. कोल्हापुरातील हा आपला सदगुरुही श्रीबाबांप्रमाणेच दिसत असेल का? त्यांचेप्रमाणेच आपला सांभाळ करील का? वगैरे विचारतरंग त्याचे मनी तरंगू लागले. गावापासून पायी चालत इतके अंतर पार करण्यास त्याला रात्र होऊन गेली. कुंभारगल्लीत तो पोहोचला त्यावेळी मठीतील अखेरची शेजारती होऊन मठीत दरवाजा बंद झाला होता. सर्वत्र रात्रीमुळे सामसूम दिसू लागली. हा कुमार इतक्या तळमळीने परिश्रम करुन येथे पोहोचला परंतु उशीर झाल्यामुळे

श्रीस्वामींचे दर्शन घडले नाही. त्यामुळे तो अत्यंत दु:खी झाला. केव्हा एकदा श्रीस्वामींना डोळे भरुन पाहीन अशी व्याकुळता लागली होती. मठीचा बंद दरवाजा केव्हा उघडेल व आपण केव्हा श्रीस्वामींचे दर्शन घेऊ. या विचारामध्ये तो तळमळत तेथेच उंबरठ्याजवळ बसून राहिला. त्यावेळी कोणी सेवक दरवाजा उघडून बाहेर आला. त्या कुमाराने मोठ्या आशेने त्याला आपली दर्शनाची इच्छा सांगितली. तेव्हा तो सेवक म्हणू लागाल, "अरे, आत्ता शेजारती होऊन श्रीस्वामी विश्रांतीस्तव पहुडले आहेत. त्यांचे दर्शन तुला आता पहाटे काकडआरती समयीच होईल." त्यांचे हे बोलणे सुरु असतानाच अचानक श्रीस्वामीच तेथे येऊन उभे राहील. त्या कुमारास हाता पकडून स्वत-च त्याला आंतमध्ये नेत म्हणू लागले. "वाट चालताना रात्र झाली का? शेजारती झाली तरी काही आम्ही निजलो नाहीत. आम्ही सदैव जागेच असतो. " आंत आपल्या सिंहासनावर बसत श्रीस्वामींनी त्याला दर्शन दिले. प्रेमाने त्याला आशिर्वाद देत श्रीस्वामी म्हणाले, "का रे, तुझा आजा व मी वेगळे दिसतो काय?" त्या कुमारास श्रीस्वामींच्या ठिकाणी आपले आजोबा श्रीबाबांप्रमाणेच स्वरुप-प्रेम मिळाले. त्याचे मन आनंदून गेले. आता कायमचेच या समर्थ चरणांची सेवा करीत येथेच रहायचे, असे त्याने मनोमन ठरविले. पण त्याच समयी श्रीस्वामी बोलले, "बाळ, जरुर जरुर जन्मभर अंखड सेवा कर. पण येथे राहून नव्हे तर आपल्या गांवी राहूनच. माझा तुला पूर्ण आशिर्वाद आहे. आता उद्या सकाळीच तू घरी जा मी तुझ्यासोबत कायमचाच आहे." श्रीस्वामींनी त्या कुमारास प्रेमाने जवळ घेत अंलिंगन दिले. पूरेपूर प्रेमाचा वर्षाव करीत त्यास घरी पाठविले. तो कुमार हा मग नेहमीच गांवातून कोल्हापूर चालत येऊन श्रीस्वामींचे मनोभावे दर्शन-पूजन करीत असे. हा कुमारच पुढे 'संत जत्रटकरबाब' या नांवाने प्रसिध्दीस आला. श्रीस्वामीकृपेने त्यांची अध्यात्मिक साधना पूर्ण होऊन ते संत बनले. त्यांचा अधिकार ओळखून अनेकजण त्यांचे दर्शनास येऊन कृतार्थ होऊ लागले. त्यांचे अनेक लीलानुभव कित्येक भाविकांच्या प्रतितीस आले आहेत.

# किमयागार भोंदूचा स्वामींना विटाळ असे

पूर्वापार साधु संताच्या अवतारा प्रमाणेच वेळोवेळी दांभिक-कमिटी भोंदूही साधू वेषामधे लोकांना फसवित आले आहेत. हातचलाखी करुन लोकांना भूलवून चमत्काराचे थोतांड करणारे काही बुवा गांवोगावी प्रगटत असतातच. त्याप्रमाणेच श्रीस्वामींच्या वेळी असाच एक किमयागार बुवा कोल्हापूरी आला. त्याला गांजाचे भारी व्यसन होते. तो म्हणे चिलमीतून तांब्या पितळाचे चक्क सोने करुन टाकतो. त्याची सर्वत्र प्रसिद्दी होऊ लागली. अपार कष्ट उपसूनही रोज खाण्या पिण्याची आबाळ होणारे भोळेभाबडे लोक अशा बुवांच्या नादी ताबडतोब लागतात. खरा सन्मार्ग उपासना त्यांना नको असते. कमी कष्टातच नव्हे तर बिनकष्टातच काहींना पुरेपूर सुखसमृध्दीची हांव असते. खर्या साधुसंताचे कष्ट तपःश्चर्या पाहूनही त्यांना मात्र आयतेच सुख हवे असते. श्रीस्वामींच्या मठीत येणारे काही कच्चे भक्तही त्या बुवांची किर्ती ऐकून खरेच काही लाभ होतो का ते पहाण्यासाठी तिकडे गेले होते. तेथे जाताच त्या लबाड बुवाचे बिंग फुटले, खरी वस्तुस्थिती लक्षात येऊन त्या बुवाची चलाखी नजरेत आली. त्यामुळे ते मठीतील भक्त गुपचूप पणे परत फिरले. त्यांना पहाताच श्रीस्वामी जोराने कडाडले, “अरे, येथे शिवाशिव करु नका. तुमचे अमंगळ पाहिल्यांदा पंचगंगेत स्नान करुन धुवून या. आंतबाहेर शुद्ध झाल्याशिवाय येथे येऊ नका. मठीतील सदभक्तांनीही त्या लोकांकडे पाहून प्रथम त्वरीत पंचगंगेत स्नान करुन येण्यास बजावले. मग ते मुकाट्यानेच स्नान करुन मठीत आले. त्यांना पाहाताच श्रीस्वामी म्हणाले, “अरे, परत स्नान करुन या, अजून स्वच्छ झाले नाही. कांखेत घाण तशीच दिसते.” त्यावेळी ते लोक आपल्या लोभाचा विचार किती खोटा होता याचा मनोमन पश्चाताप करीत आपली चूक ध्यानी धरुन तळमळू लागले व मनःपूर्वक श्रीस्वामींची श्रमा याचना करु लागले. तेव्हा त्यांना यथायोग्य बोध झाल्याचे पाहून श्रीस्वामी हसू लागले व म्हणाले, “आता स्वच्छ स्नान झाले. परत जपून रहा बरे.” खोट्या लोभाचा विचार करुन खर्या संतांची सेवा सोडणे कधीही योग्य नाही. याची जाण या श्रीस्वामी लीलेतून सर्व सदभक्तांना नेहमीच होत राहिली.

# हिमालयातील दिव्य दिगंबर योग्याचे वैराग्यमठीत येणे

करवीर नगरीमध्ये अचानक कोणी योगीपुरुष एकदा आला होता. त्यांच्या अंगावर फक्त लंगोटीशिवाय काहीच नव्हते. तो तरुण तेजस्वी संन्याशी कोणाशीही बोलत नसे. कोणास काही मागत नसे. खाण्यापिण्याचीही त्याला शुद्द नव्हती. त्यांचे सुंदर, जटाधारी, वैराग्यतेजाने तळपणारे, कांतीमान स्वरुप पाहून साक्षात् कैलासपती श्री भोलेबाबा शिवशंकरच प्रगटल्याचे दिसत असे. त्या योगीपुरुषाचे चालणे वायुगतीचे होते. अचानकपणेच तो योगी महात्मा करवीर निवासीनी श्रीमहालक्ष्मी अंबामातेच्या राऊळी येऊन श्रीजगन्मातेचे दर्शन घेऊन थेट कुंभारगल्लीमध्ये वैराग्यमठीत पोहोचला. श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या सिंहासना जवळच त्या महापुरुषाने मौनमुद्रेने बैठक मारली. अगदी स्थिरपणे इकडे-तिकडे कुठेही न पहाता त्याच जागी तो तटस्थपणे निजून राहिला. बराच वेळ वाट पाहूनही तो तिथून हालेना. भक्तमंडळींना वाटले काही वेळाने तो श्रीस्वामींचे दर्शन घेईल, काही बोलेल. परंतु तसे काहीच चिन्ह दिसेना. तेव्हा भक्तमंडळीनी श्रीस्वामींना विचारले, “स्वामी, याबाबांना उठवून बाजूस निजवू का?” ते म्हणाले, “अरे, त्यांना कोणीच स्पर्शसुद्धा करु नका. त्यांच्यावेळेनुसार ते आपणहूनच जेव्हा उठतील तेव्हाच उठू द्या. त्यांना कोणीही त्रास देऊ नका. अरे तुमचे पुण्य मोठे आहे म्हणूनच त्यांचे दर्शन घडत आहे, हा विश्वास बाळगा” श्रीस्वामींचे बोलणे ऐकून भक्तमंडळींनी त्यांना जराही त्रास दिला नाही. आश्चर्य म्हणजे पूर्ण तीन दिवस ते त्याच जागी मुळीच हालचाल नं करतां, काहीही न खातापिता, काहीही न बोलता अगदी निश्चल मूर्तीप्रमाणेच शांत पडून होते. तिसर्या दिवशी मध्यरात्री नंतर श्रीस्वामी त्यांच्या कांनी काही सांकेतिक बोलू लागले. इतरांस त्याचा काही बोध होत नव्हता. ते श्रीस्वामींचे बोल ऐकताच तो योगी महात्मा उठून उभा राहिला. श्रीस्वामींनी त्यांस प्रेमाने घट्ट आलिंगन दिले. ते पाहून त्यासमयी जागे असणारे भाग्यवंत सदभक्त धन्य झाले. श्रीस्वामींना काहीसे अस्पष्ट शब्दात बोलत तो मौनी महात्मा मग त्वरीतच मठीतून बाहेर पडला आणि क्षणातच दिसेनासा झाल. श्रीस्वामी त्याविषयी म्हणाले, “हा पूर्णतः निष्काम पुरुष आहे. नव्हे, नव्हे हा पुरुषोत्तमच आहे. तो माझ्याप्रमाणेच सहजस्थितीत या भूतलावर विचरण करीत आहे. त्याच्यात व माझ्यात भेदबुद्धी बाळगू नका.” पूर्वीप्रमाणेच हा ही एक हिमालयवासी अपूर्व महात्मा श्रीस्वामी भेटीस येऊन गेला.

# उपटलेला पडवळ वेल पुन्हा नव्याने बहरला

कोल्हापूरात एक गरीब म्हातारी स्त्री रहात होती. तिच्या घरी परड्यामध्ये एक पडवळाचा वेल होता. ती बिचारी त्याची पडवळे भाजीबाजारामध्ये विकून आपले पैसे-दोनपैसे मिळवित असे. एके दिवशी श्रीस्वामींची स्वारी तिच्या दारी आली आणि त्यानी एकदम तो वेल पार मुळापासून उपटून काढून टाकून दिला. घरातून ती म्हतारी ते पाहून धांवतच बाहेर आली. श्रीस्वामींना मनसोक्त शिव्या देऊन त्यांचे पाठीस लागली. श्रीस्वामी हसत हसत पुढे पळू लागले. त्या म्हातारीचे शब्द ऐकून आजूबाजूचे लोक जमले. त्यांनी त्या म्हातारीस शांत केले. सर्व समजावून सांगू लागले की, सत्पुरुषांची लिला समजणे फार कठीण आहे. त्यांची प्रत्येक कृती वरुन आपणांस विचित्र भासत असली तरी त्यामध्येही काही गुप्त शुभसंकेतच लपलेला असतो. काही लोकांसोबत ती बिचारी म्हातारी कुंभारगल्लीत गेली. तिथे श्रीस्वामीं समोर तिने नमस्कार केला. सोबतच्या लोकांनी श्रीस्वामी पायी तिला क्षमा करावी अशी विनंती केली. त्यावेळी श्रीस्वामी त्या म्हातारीस उद्देशून म्हणाले, “अग वेल तुटला नाही. नवीन येतोय जा.” ती फार समाधानाने घरी परतली. ज्या जागी मुळासकट वेल उपटला होता त्याच जागी नवीन अंकुर फुटून नवीन वेल आला. तो वेल चांगलाच बहरला व त्याला चिक्कार पडवळे लागली. श्रीस्वामींच्या अजब लीलीने ती म्हातारी सुखात राहू लागली.

# अंतर्ज्ञानी स्वामींचा पतीसेवेचा उपदेश

पंचगंगा नदीच्या परिसरातील एक लग्न झालेली तरुणी संतप्रेमी होती. तिला श्रीस्वामींच्या बद्दल माहिती होती. त्यांच्या दर्शनाची तिला मनोमन ओढ होती. परंतु तिचा पती मात्र संतप्रेमी नव्हता. त्याला श्रीस्वामींचा महिमा काय माहिती असणार ? त्यामुळे त्या तरुणीच्या मनांत तीव्र इच्छा असूनही ती श्रीस्वामींच्या दर्शनास जाऊ शकली नाही. एकदा ती इतर बायकां सोबत पंचगंगेवर एका पर्वणीच्या निमित्य गंगास्नान करितां आली तिच्या मनी श्रीस्वामींच्या दर्शनाची तळमळ तर नित्यच चालू होती. तिची ती तळमळ पूर्ण करण्यासाठी श्रीस्वामीच त्यावेळी पंचगंगेतीरी गेले. अचानकपणेच त्या तरुणीला श्रीस्वामींचे तिथेच मनसोक्त दर्शन घडले. तिला प्रेमाने आशिर्वाद देत श्रीस्वामी म्हणाले “मुली तुझ्या पोटीही एक मुलगीच आहे. उगाचच इतरत्र भटकून फसू नको. समाधानाने रहा. आपल्या पतीवर मनापासून प्रेम कर. त्यालाच देव मान तुझे कल्याण होईल.” श्रीस्वामींचा हा बोध त्या अल्पवयाच्या तरुणीस मनःपूर्वक पटला. खोट्या संसारिक मोहाची आकांक्षा तिच्या मनी नव्हती. श्रीस्वामींचे मनोमन स्मरण करीत ती त्यांच्या बोधाप्रमाणेच आचरण करुन सुखी राहिली.

# सोंगी सांधूचा खरपूस समाचार

करवीर संस्थान श्रीछत्रपतींच्या नविन राजवाड्याच्या जवळच कसबा बावडा परिसरात काही राखीव भाग नगर रक्षकांकरिता ठेवला होता. तो विभाग लाईनबझार म्हणून प्रसिद्ध आहे. त्या परिसरातील लोकांना सोंगी भजनाची फार आवड होती. त्यांची समयोचित सोंगी भजने कोल्हापूरकरांना आकर्षिक करु लगाली होती. त्यामुळे त्यांची प्रसिद्धी चांगलीच झाली होती. श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची किर्तीही त्यांचे कानी गेली. त्यांना त्यांची परिक्षा घेण्याची बुद्धी सुचली. त्या सोंगी भजनवाल्यानी भल्या मोठ्या माळा, अंगास राख, भगव्या कफन्या व खोट्या दाढीजटा लावून सांधूंचे वेष घेऊन येऊन श्रीस्वामींची परिक्षा बघण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ते येऊ लागताच इकडे श्रीस्वामींनीही त्यांची खबर अंतर्ज्ञानाने जाणून आपल्या काही चांगल्या धडधाकड भक्तांना आधीच पूर्वसूचना देऊन येणार्या खोट्या सांधूचा खरपूस समाचार घेण्यास सांगून ठेवले होते. सायंकाळी आरती समयी ही सोंगी साधूंची टोळी मठीत आली. आरती संपताच श्रीस्वामींनी मोठ्याखुबीने त्यांना आतील भागात बोलविले. त्यांना वाटले श्रीस्वामींना पण आपण फसविले. ते सोंगी साधू खुषीमध्ये ऐटीत आंत गेले. ते सर्व आंत येताच श्रीस्वामींच्या इशा-यानुसार आंतून दरवाजे बंद करुन तयारीत असलेल्या भक्तांनी त्या सोंगी सांधूंचा चांगला खसपूस समाचार घेतला. ते सर्व रडकुंडीला आले. त्यांनी आपल्या खोट्या माळा तोडून टाकल्या, कफन्या उतरविल्या. त्यांच्या होत्या त्या खोट्या दाढीमिशी जटा तर केव्हाच त्यांच्या हाती दिल्या गेल्या होत्या. ते सर्वजन श्रीस्वामींच्या चरणी लोळू लागले. नम्रतेने क्षमा याचना करुन लागले. श्रीस्वामींनी त्यांची पश्चातापबुद्दी पाहून त्यांना माफ केले. पुढे ते सोंगी भजनवालेच श्रीस्वामींचे परम भक्त बनून त्यांची किर्ती आपल्या भजनातून गाऊ लागले.

# रामकृष्ण कामतांना मरताना वाचविले.

श्रीस्वामींचे परमभक्त श्री.कृष्णा लाड यांचे श्री. रामकृष्ण कामत व श्री. दत्तोबा करजगार असे दोन सन्मित्र होते. श्रीकृष्णा लाड श्रीस्वामीसेवेतच आपले जीवन कृतार्थ करु लागले होते. हे तिघेही पूर्वी एकत्र कथा किर्तनास जात असत. तिघानांही पक्के ध्यानी आले की, ‘सदगुरुशिवाय’ तरणोपाय नाही. तिघेही कुंभारस्वामींना ‘सदगुरु’ मानून विनम्र झाले. श्री. लाड यांचे चरित्र तर पूर्वी आले आहेच. श्री. रामकृष्ण कामत यांच्याकडे पाहून श्री स्वामी त्यांस आशिर्वाद देत म्हणाले, “तू व्यापार कर” व श्री. दत्तोबा करजगार यांस म्हणाले, “तू यंत्र कर” श्रीस्वामी चरणी विश्वास ठेवून श्री. रामकृष्ण कामत यांनी व्यापार सुरु केला. श्रीछत्रपती शाहू राजेंचे मोठे काम मिळाले. राधानगरीचा मक्ता मिळाला. त्यांची प्रगती होऊन बसावयास घोडागाडी दारी उभी राहिली. त्यांची पत्नी सौ. चंद्राबाई याही सात्विक रेणुकाभक्त होत्या. श्री रेणुकामातेची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. घरी श्रीदेवीची आंबील केल्यावर श्रीस्वामी प्रेमाने तेथे जाऊन प्राशन करीत. एकदा काही विशेष कामाकरितां सोळांकूरला जाऊन परत गैबी खिंडीच्याबाजूने श्री.रामकृष्ण कामत आपल्या भागीदारासह येत होते. त्या कामाची पैशाची बरीच मोठी रक्कम सोबत होती. त्यावेळी त्या भागीदाराच्या मनामध्ये लोभ उत्पन्न होऊन त्याने जांबिया शस्त्र उगारुन त्यांना लुटले. प्रणापेक्षा पैसा मोठा नाही. हे ओळखून वेळीच त्यांनी त्याला पैसे देऊन सुटका करुन घेतली. त्यावेळी श्रीस्वामी सायंकाळच्या वेळी फिरुन येत असताना त्यांच्यासमोर सौ. चंद्राबाई सरजच दर्शनास वाकल्या. तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, “चंद्रे तुझे मंगळसूत्र तुटतेय. बघ. ” त्यांचे हे शब्द ऐकून सौ. चंद्राबाई घाबरून भीतीने घामाझाकोळ झाल्या. त्यांनी काहीतरी अनर्थ घडणार हे समजून अत्यंत कळवळयाने श्रीस्वामींचे पाय घट्ट धरले. त्यांची करुणा प्रार्थना ऐकून श्रीस्वामी म्हणाले, “जा, सोडविला त्याला.” असे म्हणतच त्यांनी सौ. चंद्रबाईंच्या मस्तकी कुंकू लावून आशिर्वाद दिला. त्यानंतर श्री. कामत सुखरुप घरी परतल्यावर सर्व वृत्तांत त्यांनी सांगितला. श्रीस्वामीकृपेनेच आपले मंगळसूत्र शाबूत राहिल्याचे सौ. चंद्राबाईंना स्पष्ट समजले.

# रेणुकाभक्त सौ. चंद्राबाई व सुपुत्र श्रीधर यांचेवर कृपाछत्र

त्या प्रसंगानंतर दोघाही पतीपत्नींची श्रीस्वामीचरणी भक्ती वाढली. बरेच दिवस त्यांना अपत्य नव्हते. एकदा श्रीस्वामींनी एक कडदोर सौ. चंद्राबाईच्या हाती दिला. त्या संकेतानुसार त्यांना पुढे पुत्ररत्न लाभले. तो श्रीस्वामींचा प्रासादिक कडदोर तिने त्या आपल्या सुपुत्र श्रीधर बाळास कमरेस बांधला. पैसा-सत्ता मिळताच अनेकांचा तोल ढासळतो. त्याप्रमाणेत श्री. कामतही घसरले. त्यांनी सौ. चंद्रबाईसारख्या उत्तम पत्नीशिवाय दुसरे ठिकाणी मन गुंतविले. त्या दुसरीने द्वेष भावनेने त्यांना पहिला संसार मोडण्याच चंग बांधला. त्यासाठी वाममार्गी तांत्रिक प्रयोग सुरु केले. त्याचा विपरीत परिणाम लगेच दिसून येऊ लागला. श्रीधरसारखा निरोगी सुपुत्र तापाने त्रस्त झाला. त्यांचे चालणे-बोलणे, वागणे विक्षिप्त घडू लागले, सौ. चंद्राबाईने आपल्या श्रीसदगुरुचरणी त्याकरितां नम्र विनंती करताच श्रीस्वामी स्वतःच त्यांचे घरी आले. त्यांनी त्या श्रीधरला सोबत घेऊन पंचगंगानदीचा तीर गांठला. त्यांनी स्वतःच त्या श्रीधरला खाली डोके वर पाय करुन उलटेच आपल्या पाठकुळीस घेऊन तेथे नदीवर जाताच चक्क त्याला पंचगंगेच्या पाण्यामध्ये बुडवून बाहेर काढले. तेथून थेट घरी आणून त्याला सोडले आणि उंब-यावर खिळे ठोकून म्हणाले, “आत्ता रांड माघारी जाते, बघ” त्यानंतर श्रीधरास खूपच आराम पडला. पण किरकोळ त्रास जाणवत राहिला. तेव्ही श्रीस्वामींना सौ. चंद्राबाईने तसे सांगताच त्यांनी खिडकीमध्ये एक खिळा ठोकून त्या संपूर्ण त्रासाचा पुरताच बंदोबस्त करुन टाकला. सौ. चंद्राबाई व श्रीधर यांच्यावर श्रीस्वामीचे पूर्ण कृपाछत्र कायम राहिले. त्यांनीही श्रीस्वामींची अंखड भक्ती केली. पूर्वपूण्याईच्या योगे श्रीस्वामींच्या कृपाशिर्वादाने सीधर संसारात न पडता संन्याशी बनून कृतार्थ झाले.

# विशाळगडच्या जहागीरदारना कडदोर प्रसाद दिला

विशाळगडचा जहागीरदार श्रीमंत असूनही भाविक होता. तो श्रद्धेने देवाची षोडशोपचारे पूजा करीत असे. पूर्वी प्रयागक्षेत्रीहून श्रीस्वामी आपले परमभक्त श्री. लाड व दळवी या दोघांस घेऊन जेव्हा फिरत फिरत निघाले होते तेव्हा राजापुरी जाताना त्यांनी मलाकपूरला प्रथम त्यांना नेले. त्यावेळी रस्त्यातच या विशाळगडच्या जहागीरदाराकडेही श्रीस्वामी अचानक गेले. तो नेहमीप्रमाणे पूजा करुन आरती करीत असताना त्याला पाठीमागे प्रगट झालेल्या श्रीस्वामींचे दर्शन घडले. त्याने अत्यंत प्रेमभावनेने त्यांचे चरण वंदन केले. त्याची शुद्ध विनम्र प्रेमभक्ती पाहून त्याची व्यथा ओळखून श्रीस्वामींनी त्यास एक कडदोर प्रसाद म्हणून काढून दिला. त्यानेही त्याचे महत्त्व ओळखून देव्हा-यामध्ये पूजेत ठेवला. इतक्या मोठ्या संपत्तीला पुढे वारस नव्हता परंतु या श्रीस्वामीकृपेनेच त्यांना पुत्रलाभ होऊन वारसदार मिळाला. त्यांची श्रद्धा द्विगुणीत झाली. तो प्रसादी असलेला पूज्य श्रीस्वामींचा कडदोर आजही त्यांच्या घरी पूजेमध्ये श्रद्धा भावनेने जपून ठेवला गेला आहे.

# दत्तोबा करजगार यांना यंत्रव्यवसायी बनविले

श्री. दत्तोबा करजगार हे. श्री. लाड यांचे पूर्वीपासूनचे सन्मित्र होते. ते ज्यावेळी श्रीस्वामींना ‘श्रीसदगुरु’ मानून येऊ लागले तेव्हा त्यांना आशिर्वाद देताना श्रीस्वामी म्हणाले, “टूक टूक करशील तर भरभराट होईल जा. टूक टूक कर.” त्यांचा भावार्थ यंत्र काम कर हळू हळू तुझी प्रगती होईल, असा ध्यानी घेऊन श्री. करजगार यांनी मेहनतीने यंत्रव्यवसाय सरु केला. त्यांची कर्तबगारी पाहून यश किर्ती वाढू  लागली. त्यांचा नावलौकीक राजदरबारी पोहोचला. त्यावेळचे श्रीमंत छत्रपती शाहू राजेंनी त्यांची कामाची कुशलता पाहून बरेच सहाय्य केले. आवश्यक धन पुरविले, फाळा कर माफ केला. त्यांच बराच उत्कर्ष झाला. केवळ श्रीस्वामींच्या ‘टूक टूक कर.’ या शब्दाच्या जोरावरच त्यांनी ही प्रगीत झाल्याचे ते सर्वांना नम्रतेने सांगू लागले.

# राजापूरच्या श्री. केशव अप्पा गोखलेंकडून भक्तीमार्ग प्रसार

राजापूरचे श्री. केशवअप्पा गोखले हे सदगृहस्थ शिक्षक होते. ते मुळचेच भाविक, परंतु डोळसभक्ती करणारे सूज्ञ नागरिक होते. श्रीस्वामींना त्यांनी राजापूरी पाहिले तेव्हाच त्यांची ओळख पटून ते मनोभावे श्रीस्वामींना गुरुस्थानी मानू लागले. स्वतःतर ते श्रीस्वामीभक्तीमध्ये रंगून गेलेच होते पण इतरही अनेक सूज्ञ उच्चशिक्षितांना त्यांनी श्रीस्वामींची थोर अवधूत अवस्था समजावून सांगून त्यांचे भक्तीस लावले. कुठेही बदली झाली तरी श्री. गोखले नेहमीच कोल्हापूरला येऊन श्रीस्वामींचे श्रद्धेने दर्शन आशिर्वाद घेऊन जात असत. बढती मिळून ते मुख्याध्यापक बनले. त्यांची घरगुती स्वतःचे संसारामध्ये तितकीशी आसक्ती नव्हती पण समाजिक कामात, शाळेच्या कामकाजात पूर्ण दक्षता होती. अनेकांना त्यांनी मोलाचे मार्गदर्शन करुन सक्रीय सहाय्यता मिळवून दिली. आपले आप्तेष्ट, नातेवाईक व इतरही कोणी त्यांचेपाशी येईल त्यास त्यांनी प्रेमाने श्रीस्वामीभक्तीचा महिमा सांगून भक्तीमार्ग दाखविला. तसेच त्यांचे संसारीक कामातही मदत करुन मोठे बनविले. त्यांचे उपकारामुळे अनेक वकील, वैद्य, प्रशासक वगैरे बनले, ते सर्वजन श्री. केशव अप्पांचे नांव आवर्जून घेत. त्यांना श्री. केशव अप्पा श्रीस्वामी कृपेनेच हे सर्वघडल्याचे पटवून देत. त्यांचेकडे आलेल्या कित्येक अडीअडचणी ग्रस्तांचे प्रश्न श्रीस्वामी भक्तीमुळे सुटु लागले. श्री. गोखले यांच्यासारख्या सदभक्तामुळे श्रीस्वामींच्या भक्तीचा मार्ग अनेकांना लाभला. त्यांनी बरेचसे धार्मिक वाचन केले होते. काहीसे लिखाणही त्यांचेकडून घडले. त्यांचे बोलणे व वागणे आदर्श असल्याने अनेकांच्या आदरास ते पात्र झाले. हे सर्व श्रीसमर्थ श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची भक्ती केल्यानेच त्यांना लाभले.

# राधाबाईचे वैधव्य टाळले

कोल्हापूरातील राधाबाई नित्यनियमाने मठीत येत. श्रीस्वामींच्या कपाळी कुंकुमतिलक करुन मनोभावे दर्शन करीत. प्रपंचाचे कामाचे व्याप कितीही असो, त्यांचे येणे चुकत नसे. त्यांची श्रीस्वामींवर अपार श्रद्धा होती. दैवयोगाने त्यांचे पती आजारी पडले. घरातील कामकाज व पतीची सेवा सुश्रुषा करुन वेळ काढून त्या नियमाप्रमाणेच मठीत दर्शन घेऊन जात. एके समयी पतीचे दुखणे जास्तीच वाढले. त्यांची योग्य व्यवस्था पाहून, औषधपाणी करुन त्या नेहमीप्रमाणे मठीत आल्या. श्रीस्वामींच्या मस्तकी कुंकू लावू लागताच त्यासमयी श्रीस्वामी कुंकू लावूनच घेईनात. दररोजच्या पद्धती प्रमाणेच त्या कुंकू लावत होत्या. परंतु आजच श्रीस्वामींनी असा नकार दिला होता. तसेच ते गंभीर स्वरात राधाबाईंना सांगू लागले, “आलायं जा, आलयं जा.” त्यांना काहीच बोध झाला नाही. त्यांनी श्रद्धेने दर्शन घेतले. मठीतील तीर्थ अंगारा सोबत घरी आणला. घरी येताच पतीला अंगारा लावून तीर्थ पाजले. सर्व इतर कामे संपवून थकून रात्री त्या झोपल्या, झोपेमध्ये पहाटे त्यांच्या स्वप्नी श्रीस्वामी आले व म्हणाले, “अग मी तुझे मन पाहिले, मी पाठीराखा आहे भिऊ नकोस. सर्व ठिक होईल.” हे स्वप्न पाहून त्या जाग्या झाल्या. त्यावेळी पती त्यांना जवळ बोलावून सांगू लागला की, “माझा स्वप्नामध्ये यमदूता सारखी काळीकभिन्न माणसे येऊन मला पकडून घेऊन जात होती. त्यांनी मला वरवर ओढून नेत असतानाच एक दंडधारी संन्याशी प्रगटला त्याने त्या लोकांवर दंड उगारुन त्यांना मला सोडून देण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणेच त्या लोकांनी तत्काळ मला सोडून दिले. त्यांनी सोडताच मी वरु खाली पडलो व मला चटदिशी जाग आले.” राधाबाईंच्या ध्यानी सर्व प्रकार आला. तिने सकाळी लवकरच स्नान उरकून प्रथम मठीचा रस्ता पकडला. तिला पहातांच श्रीस्वामी म्हणाले, “आलं होत पण गेलं, गेलं,” त्यांच्या हसतमुखी मुद्रेकडे पाहून नेहमी प्रमाणेच राधाबाईंनी त्यांचे भाळू कुंकूमातिलक केला. श्रीस्वामींनी पण आशिर्वादपूर्वक त्यांचे कपाळी स्वहस्ते कुंकु लावून दिले. आपल्या त्या सौभाग्याचे रक्षण करणार्या श्रीसमर्थ गुरुमाऊलीच्या पायी राधाबाई डोळ्यातील आसवांनी अभिषेक करु लागल्या. राधाबाईंचे सौभाग्य टिकवून त्यांच्यापुढील पिढ्यान् पिढ्यांचे श्रीस्वामींनी कृपादृष्टीने पालन-पोषण केले आहे.

# कपडेकर - चोपडेंच्या मुक्ताताईंवर स्वामींची कृपा छाया

वैराग्यमठीत शेजारीच मिठारीगल्लीमध्ये जनाबाई चोपडे या सदभक्त महिला रहात होत्या. त्यांच्या सूनबाई मंजुळा याही सात्विक होत्या. श्रीस्वामींच्या चरणी त्यांची भक्ती होती. मंजुळाबाईस श्रीस्वामी 'बेटा, बेटा' म्हणत असत. पुढे त्यांना दत्तात्रय हा बेटा लाभला. श्रीस्वामीकृपेनेच हा पूत्रलाभ झाला होता. पूर्वीची त्यांची संतती जगली नव्हती. घरातील सर्वजनच श्रीस्वामींचे भक्त बनले होते. योग्यवेळी श्री. दत्तात्रय यांचा विवाह सुलक्षणी कन्या चि. मुक्ता कपडेकर हिच्याशी जुळविला गेला. या भाग्यशाली मुकाबाई संसारी जास्त रमत नसत त्यांचे सर्व चित्त श्रीस्वामी गुरुंच्या पायीच असे. त्यांना मूळ बाळ झाले नाही. श्रीस्वामींच्या मठीत पूजा-अर्चा करण्यातच त्या दंग रहात त्यांना सर्व भक्तजन 'ताई' म्हणून संबोधित बरीच वर्षे वयोवृद्ध असतानाही त्यांनी आपल्या श्रीसमर्थ श्रीकृष्ण सरस्वती स्वामी सदगुरु माऊलींच्या समाधीस्थानी पूजा भजनामध्येच रंगून आपले आयुष्य सार्थकी लावले.

# रखुमाई पुरेकरांचे स्वामींनी लावले जगावेगळे लग्न

रखुमाई पुरेकर या कुंभार गल्लीतल्या फक्त चार इयत्ता शिकलेल्या असूनही श्रीस्वामी कृपेनेच धार्मिक सदग्रंथाची उकल करुन सोप्या भाषेत सर्वांना सांगत असत. त्यांचेबाबतची श्रीस्वामी लीला अजबच आहे. त्या अकरा वर्षाच्या असताना आपल्या वडिलां बरोबर वैराग्यमठीत श्रीस्वामींच्या दर्शनासाठी आल्या होत्या. सोबतच त्यांचे कोणी पाहुणेही त्यांच्या तीन वर्षाच्या मुलाला कडेवर घेऊन त्यांच्याबरोबर तेथे आले होते. श्रीस्वामींचे सर्वांनी दर्शन घेतल्यावर श्रीस्वामी त्या तीन वर्षाच्या मुलाकडे पहात म्हणाले, “अरेच्या हा तर रखुमाईचा पती.” श्रीस्वामींनी त्या बाल नवरदेवास व रखुमाईस शेजारी उभे केले. त्यांच्या मस्तकी मंगल अक्षता उधळल्या आणि म्हणाले, “ झाले यांचे लग्न” रखुमाई पुरेकरांचे पिता व ते पाहुणे श्रीस्वामींचे भक्त होते. त्यांनी श्रीस्वामींच्या बोलण्या नुसारच हा विवाह कायम केला. रखुमाई आपल्या बाळ पतीस कडेवर घेऊन वागवू लागली. काळानुसार मोठे झाल्यावर त्यांना सर्व समजले. तांबवे या गावी त्यांच्या सुखाचा संसार झाला. त्यांना आठ मुलेही झाली. श्रीस्वामी भक्तीमध्ये त्यांचे घरातील वंशज अद्यापिही श्रद्धेने ही सत्य घटना सांगतात.

# तांबव्याच्या संत कुशाप्पांचा नमस्कार पोहोचला

'तांबवे' या गांवी श्री. कुशाप्पा नांवाचे थोर वारकरी संप्रदायिक संत महात्मा होते. ते अत्यंत श्रद्धेने पंढरीची वारी पायी करीत असत. मनोभावे श्रीविठ्ठलाची परमभक्ती करीत असत. त्यांची भक्ती पूर्ण स्थितीला पोहोचली होती. रखमाई पुरेकर या त्या गांवी रहाणा-या श्रीकृष्ण सरस्वती स्वामींच्या परमभक्त आहेत यांची त्या संत श्रीकुशाप्पा महाराज यांना कल्पना होती त्या नेहमी श्रीस्वामींच्या दर्शनास कोल्हापूर येत असत. एकदा असेच त्या कोल्हापूरी चालताना असताना वाटेतच भेटलेल्या संत श्री कुशाप्पा महाराजांनी त्यांना प्रेमाने सांगितले, “बाळ, माझाही नमस्कार श्रीस्वामींना सांग बरं का.” इकडे त्या रखुमाई मठीत येऊ लागताच मध्येच त्यांनी श्रीस्वामींनी गांठले व म्हणाले, “कुशाप्पाचा नमस्कार पोहोचला. कुशाप्पाचा नमस्कार पोहोचल. कुशाप्पाचा नमस्कार पोहोचला. त्याला कुशल सांग जा. आमचे.” त्यांची ही वाणी ऐकून रखुबाई चकितच झाल्या. संताचे परस्पर प्रेम पाहून त्यांचे अष्ट सात्विक भाव प्रकट झाले. त्यांनी श्रीस्वामींचे प्रेमभावे दर्शन करुन त्या परत तांबवे गांवी आल्या. श्रीकुशाप्पा महाराज त्यांचेकडे हसत पाहून कोल्हापूरातील समाचार विचारू लागले. श्रीस्वामी व कुशाप्पा महाराज एकच समजून त्यांनी पायावर डोके ठेवले. त्या थोर संत श्री कुशाप्पा महाराज यांची परमपवित्र पावन समाधी तांबवे गांवी अनेक सज्जनांना सन्मार्ग शांती, सुख, समाधान देत आहे.

# शुक्रवार पेठेतील स्वामींचे घर

पंचगंगानदीतीर - शुक्रवार पेठ ही श्री स्वामींची नेहमीची फिरण्याची प्रिय ठिकाणे होती. सोबत भक्तमंडळींना घेऊन श्रीस्वामी अवचितच एखाद्याच्या घरी जात. त्यांचे भाग्य निश्चितच खुलून जाई. एकदा असेच फिरत श्रीस्वामी शुक्रवार पेठेतील जैन मठाच्या गल्लीतील श्री. दौलती माने या सदगृहस्थाच्या घरी गेले. श्रीस्वामींना पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. त्यांनी मनोभावे दर्शन घेतले. श्रीस्वामी म्हणू लागले, “हे घर, आमचेच घर आहे.” घरातील सर्वजन भक्तीने श्रीस्वामींचे दर्शन घेऊ लागले. श्री. दौलती मानेंचा सुपुत्र परशराम याने दर्शन घेताच त्याच्याकडे पहात श्रीस्वामी त्यांचे पाठीवर हात फिरवित म्हणाले, “आमुचाच हा” त्यावेळी लहान असलेला परशराम श्रीस्वामींचा वरदहस्त मस्तकी फिरताच थोड्याच कालावधीत फार चांगला नामांकित पैलवान बनला. एका कुस्ती दंगलीमध्ये श्री छत्रपती शाहू राजांच्या पठ्ठ्यास या स्वामीभक्ताने चारी मुंड्या चीत केले. त्याला बक्षिसी म्हणून छान नोकरी मिळाली. या परशरामाचा विवाह होऊन त्याला सुंदर मुले-मुली झाल्या. छोट्याशा घरातच श्रीस्वामी भक्तीमुळे स्वर्गसुख अवतरले होते. कुंभारगल्लीतील सदभक्त ताराबाईचा नातू रामनाथ यांची प्रथम पत्नी लक्ष्मीबाई स्वर्गवासी झाल्यावर अनेक भक्तांनी त्याला दुसर्या विवाहसंबंधी तयार केले. रामनाथांचे मनी ते येईना. त्यासमयी प्रथम पत्नी लक्ष्मीबाई दुसर्या एका मुलीच्या रुपात त्यांना दूध देत असल्याचा स्वप्न दृष्टांत होऊन. ‘तो नदीकडील सुंदर साज पटवून आणा’ असा संकेत एका भक्तास मिळाला. दोघांचे परस्पर स्वप्न पाहून त्यांची चर्चा करुन रामनाथने दुसर्या विवाहास होकार दिला. त्यावेळी पूर्वीच स्वामी म्हणालेल्या ‘आमचे घर’ मधील श्री. परशराम मानेंची सुंदर कन्या हिरा हिचा रामनाथांशी विवाह झाला. त्या हिराबाई कुंभारगल्लीमध्ये येऊन सौ. सीताबाई रामनाथ शिर्के झाल्या. त्यांना सर्वभक्तमंडळी ‘माई’ या नांवानेच संबोधू लागले. श्रीस्वामींच्या समधी नंतरची मठीतील दीर्घकाळ सेवा या पूज्य श्री. माईंच्या हातून घडली. आज त्यांच्याच शिकवणीनुसार सेवा सुरु आहे.

# राऊत मामांची सुवर्णचंपक फुले स्विकारुन सांभाळले

कोल्हापूरातील सुप्रसिध्द रंकाळा तलावाच्या बाजूस फुलेवाडी विभाग आहे. त्या भागातून पाटपाण्याची सुविधा केली गेली होती. त्यामुळे सुंदर शेतीतून ऊस, भात, जोंधळा वगैरे धान्ये अनेक सुवासिक फुलांचे मळे फुलत असत. त्यापाणी सोडण्याच्या पाटाच्या कामावर श्री. रामा भैरु राऊत नांवाचे एक गृहस्थ मोठ्या जबाबदारीने चोख काम करीत असत. श्री रामभाऊचे घर होते रंकाळा तलावा समोरच्या संध्यामठ गल्लीत. ते नित्या प्रमाणे फुलेवाडीत जाऊन काम करीत असताना एका जागी शेतवडी मध्ये त्यांना एका अतृप्त आत्म्याने खवीसाने पछाडले. त्यामुळे श्री. रामभाऊ राऊत अगदी त्रासून गेले. त्यांना त्यातून सोडविणारा कोणीच भेटेना. नेमके त्याचवेळी त्यांच्या कानावर कुंभारस्वामींची महानता आली. त्यांनी आपल्या बागेतील सुवर्ण चंपकाची सुगंधी फुले हाती घेऊन वैराग्यमठीत मार्ग शोधला. श्रीस्वामी आपल्या सिहांसनावर विराजमान झालेले होते. श्री. रामभाऊंनी श्रद्धेने आणलेली सुवर्ण चंपकाची फुले श्रीस्वामींच्या चरणी अर्पण केली. आपले दुःख सांगून तो स्वामींना विनवू लागला, “स्वामी, या खवीसावर काहीतरी उतारा सांगा, बाबा.” त्याकडे करुणा दृष्टीने पहात श्रीस्वामी म्हणाले, “ तू माझ्या करिता अशीच फुले आणीत जा. मी त्या खवीसाचा पक्का बंदोबस्त करुन टाकतो. तू बिलकूल भिऊ नकोस. तुझ्या पाठीमागे पुण्याई आहे. अगदी निर्धाराने सेवा - भक्ती कर.” त्या श्रीस्वामींच्या उपदेशाचे तंतोतंत पालन करीत श्री. रामभाऊ राऊत दररोज श्रद्धा भक्तीने श्रीस्वामी पूजेस्तव सुवर्णचंपक व इतर रंगी बेरंगी सुगंधी फुले मठीत घेऊन येत. श्रीस्वामींचे मनोभावे दर्शन घेऊन यथाशक्य सेवा करीत. काही काळातच त्या खवीसाचा नायनाट होऊन श्री. राऊत ठणठणीत झाले. आता घरादारापेक्षा श्री. रामभाऊंना मठीच सर्वस्व होऊन बसली. हळूहळू त्यांनी घरातील. पूर्ण लक्ष काढून घेऊन ते मठीतच राहू लागले. सर्व भक्तमंडळी त्यांना ‘राऊतमामा’ नावाने ओळखू लागली. शिर्के कुटुंबातीलच एक व्यक्ती बनू त्यांनी त्यास प्रेम दिले. मठीतील प्रत्येक कार्यास सदैव सक्रीय सहकार्य दिले. रामनाथजी शिर्के यांचे लग्न ठरल्यापासून त्या घरातील प्रत्येक कामात ते हिरीरीने मदत करु लागले. आपला पगार श्री. सीताबाई शिर्के तथा माईंच्या हाती ते ठेवित. “माईंना” प्रेमाने ‘म्हातारी’ म्हणूनच ते हांका मारीत. सेवानिवृत्तीनंतर सर्वकाळ ते नित्य मठीतील कामामध्येच दंग रहात असत. यथासमय त्यांचे निधन झाले. फुलेवाडीतील सुप्रसिद्ध श्रीदत्त मंदिराच्या समोर चौथ-यावर त्यांच्य पवित्र अस्थी ठेवून त्यांची पावन स्मृती लोकांनी जतन करुन ठेवली आहे. कारण, त्या दत्त मंदिराच्या उभारणी कामातही श्री. राऊतमामांनी हातभार लावला आहे. एक देवमाणूस देवाघरी गेला तरी त्याची पुण्यदायी आठवण देवाप्रमाणेच नित्य केली जाते. श्रीस्वामी भक्तीमुळे व त्यांच्या कृपादृष्टीने श्री. राऊतमामा असेच एक देवमाणूस म्हणून नित्य स्मरणात रहातील.

# उत्तूरच्या बाळ घुमेंकडून गुरुद्वादशी उत्सव करवीरी केला.

'उत्तूर' हे कोल्हापूरजवळील एक छोटेसे खेडेगांव. त्या गांवी रहाणारा श्री. बाळ घुमे हा भाविक गृहस्थ होता. त्याची श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचे श्री. दत्तात्रेय व कोल्हापूरच्या वैराग्यमठीत श्रीकृष्ण सरस्वती स्वामी ही दोन प्रिय स्थाने होती. दत्तत्रक्तीमध्ये रंगलेला श्री. बाळ घुमे नित्यानियमाने वाडीक्षेत्री जाई. त्यावेळी प्रथम करवीर मठीमध्ये येऊन श्रीस्वामींचे मनोभावे दर्शन व आज्ञा घेऊनच तो तिकडे जात असे. वाडी क्षेत्री दरवर्षी गुरुद्वादशीचा मोठा उत्सव साजरा केला जातो. श्री. बाळ घुमे नेहमीप्रमाणेच त्या उत्सवाकरींता विशेष पूजा-अभिषेकाकरिता काही पैसे घेऊन जाताना नियमाप्रमाणेच श्रीस्वामींच्या मठीत करवीरी आला. श्रीस्वामींचे दर्शन घेऊ लागताच श्रीस्वामी त्यास म्हणाले, "आपण इथेच गुरुद्वादशी साजरी करुया." श्री. बाळ घुमे आनंदून गेले. ते म्हणाले, "साक्षात् श्रीगुरुरायांची जी आज्ञा तीच आम्हास मान्. जरुर आपण येथेच हा उत्सव छान रीतीने साजरा करु या." श्रीस्वामींची ही इच्छा समजताच सदभक्त ताराबाईचे सुपुत्र दत्तोबा यांनी पण आनंदाने याकरितां सर्व भक्तांना सांगून मदत केली. सर्वांनी मिळून अत्यंत हर्षाने उत्सवाची जय्यत तयारी सुरु केली. सरदार पाटणकर यांनी या उत्सवासाठी खास घोडा दिला. अबदागिरी-सनई, चौघडा वगैरे सारा सरंजाम जमला. सर्वांचे लक्ष मग त्या दिवसाकडेच लागून राहिले. गुरुद्वादशीच्या पवित्र दिनी भक्तांनी आदराने श्रीस्वामी श्रीकृष्ण गुरु महाराजांनी त्या घोड्यावर बसविले. त्यांच्यावर प्रेमाने छत्र धरले. सनई-चौघडा त्यामागे वीणा, टाळ, मृदुंग घेऊन भक्तजन भक्तीपूर्ण भजने, अंभग गाऊ लागले. वैराग्यमठीतून थाटाने मिरवित श्रीस्वामींना परमपवित्र श्रीपंचगंगेच्या नदीकाठी आणविले. तेथे सर्वांनी प्रेमभक्तीने श्रीस्वामींना प्रथम गंगास्ना करविले. मोठ्या नामगजरात पूजा अर्चा झाली व मग परत त्याच आनंदात सर्वजण श्रीस्वामींना घेऊन मठीत परतले. श्रीस्वामी महाराजांनी आपले सगुण साकार कार्य संपवून महासमाधी घेतल्यानंतरही त्याच थाटामाटाने दरवर्षी हा गुरुद्वादशीचा सोहळा त्यांच्या परम पावन पादुका मिरवत नेऊन संपन्न केला जातो. आजही आपण आश्विन वद्य द्वादशी या गुरुद्वादशीच्या पावन सोहळ्यात येऊन सहभागी होऊ शकता.

# ऐतवडेकर, नांदणीकर व कुन्नुरच्या भक्तांवर कृपा

श्री. व्यंकटेश ऐतवडेकर यांची श्रीस्वामींवर मनापासून श्रद्धाभक्ती. नेहमी ते मठीत श्रीस्वामींचे दर्शन घेऊन जात असत. एकदा त्यांची पत्नी आजारी असताना ते दर्शनास आले. श्रीस्वामींचे दर्शन घेऊन शेजारी बसताच श्रीस्वामींनी त्यांचे डोकीचा रुमाल उलटा सुलटा केला. घरी येऊन पहातात तर त्यांच्या पत्नीचे निधन झाले. उलटसुलट करुन श्रीस्वामींनी संकेत दिला होताच. आजाराच्या त्रासातुन ती पत्नी मुक्त होऊन गेली. पुढे श्रीकृपेने त्यांनी द्वितीय विवाह केला. श्रीस्वामींच्या भक्तीमुळे त्यांची कृपा लाभून त्यांचा वंशवेल फुलला. सुखी-समाधानी झाला. 'नांदणी' येथील श्री. गणपती व बापू हे दोघे कुलकर्णी बंदू आपल्या मातापित्या सोबत कोल्हापूर श्रीस्वामीं दर्शनास येत असत. थोरले बंधू गणपती यांनी एकदा दर्शन घेतेवेळी श्रीस्वामी म्हणाले, "विस्कटले, विस्कटले." त्यांचा या बोलण्याचा काहीच अर्थबोध होईना. थोडा वेळ सर्वजण शांत बसून राहिले. मग घरी परत जाताना पुन्हा गणपती व बापू दोघे बंधू दर्शन घेऊ लागताच श्रीस्वामी म्हणाले, "जुळले, जुळले" मघाप्रमाणेच याचाही काही अर्थबोध होईना. ते श्रद्धेने दर्शन घेऊन गांवी परतले. त्यावेळी नांदणीमध्ये त्यांच्या भाऊबंदामध्ये उत्पन्नाच्या संबंधीत वाटणीचा वादविवाद आपसात मिटला. भाऊबंदानी त्यांचे उत्पन्न त्यांना दिल्यावर श्रीस्वामींच्या त्या लाक्षणिक शब्दांचा अर्थबोध कळून आला. नांदणीचाच श्री. गोपाळ सोनार यांच्या चुलत बंधू काही आरोपामुळे बंदीवासात होता. लवकरच त्याबाबत निकाल सुनावणी होणार होती. त्याकरिता श्री. गोपाळ सोनार श्रद्धेने श्रीस्वामी पायी येऊन प्रार्थना करु लागले. तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, "साखळ्या काढून टाका." खरोखरीच निकाल देतांना ते आधिकारी म्हणाले, "हे सोनार निर्दोष आहेत. त्यांची सुटका करावी." 'कुन्नूर' गांवचे श्री. दत्तोबा मोकाशी आपल्या शेतीमध्ये विहीर खणत होते. बरेच खणले तरी पाणी लागेना. त्याकरीतांच ते कोल्हापूरी मठीत श्रीस्वामींच्याकडे जाऊन चरणी श्रीफळ अर्पण करीत मनातच प्रार्थना करु लागले. त्याचक्षणी श्रीस्वामी म्हणाले, "पाणी-पाणी आले वरती." भक्तांनी चौकशी करताच श्री. मोकाशी यांनी आपला प्रश्न सांगितला. सर्वांना उलगडा झाला. इकडे त्याचवेळी त्यांच्या विहीरीस पाणी लागले होते. त्यांनी त्या विहीरीचे पाणी आणून श्रीस्वामींचे चरण धुतले. त्यांची भक्ती वाढत चालली. आजही त्यांचे घराण्यातील लोक श्रद्धेने श्रीस्वामी भक्ती करीत आहेत.

# उत्तरेश्वर पेठेत पेंढारकरांचे घरी स्वामींनी पाणी भरले.

श्रीस्वामींचे सहजपणे कधु कुठे जाणे होईल व कोणावर कशी, केव्हा कृपा होईल. हे सांगता येत नसे. श्रीस्वामी त्यांच्या लहरीनुसार कोल्हापुरच्या उत्तरेश्वर पेठेतील एका गल्लीत शिरले. तिथे एका नळावर आजूबाजूच्या बायका पाणी भरत होत्या. श्रीस्वामी त्या बायकांमध्ये गेले आणि एका बाईच्या हातातील घागर हिसकावून घेतली. प्रथमतः त्याबाई घाबरल्या तेव्हा आजूबाजूच्यांनी त्यांना खुणेने शांत रहा म्हणून सांगितले. त्यापैकी कित्येकास श्रीस्वामींचा अधिकार व त्यांच्या वागण्या-बोलण्याच्या त-हा माहिती होत्या. त्यांनी त्याबाईस सांगितले. “आईसाहेब, काहीच बोलू नका. हे महाराज काय करतीय ते करु द्या. त्यात तुमचे भलेच होईल.” ते ऐकून त्याबाई अविचलपणे फक्त श्रीस्वामी काय करतात ते पाहू लागल्या आश्चर्य म्हणजे श्रीस्वामींनी स्वतःत्या घागरीने पाणी भरून त्या बाईंच्या घरातील चक्क पळी, पंचपात्रे, ताट-वाट्यांपर्यंत सर्व भांड्यामध्ये पाणी भरुन ठेवले. काही वेळातच या कृतीतून त्यांनी असा संकेत दिला की, “माझ्यासारखा देवच ज्या घरी पाणी भरतो त्या घरी काय कमी पडेल?” अगदी तसेच झाले. त्या बाईंचे मालक श्री. बळवंत धोंडो पेंढारकर हे प्रथम क्रमांकाने मट्रीक पास झाले असूनही जेलमध्ये वॉर्डर म्हणून साध्या कामावर रजू झाले होते. परंतु पोलीस बनले. सुप्रसिद्ध लेखक श्री. धनंजय कीर यांनी लिहीलेल्या राजर्षी शाहू या पुस्तकामध्ये पेंढारकर पोलीस अधिकारी म्हणून त्यांचाच नामोल्लेख झालेला आहे. श्रीस्वामींनी सहजच केलेल्या कृतीतून त्या घरी इतकी प्रगती घडली. त्यामुळेच श्रीस्वामींचे कायमचे स्मरण पूजन या घराण्यात होत राहिले. सध्या त्या श्री. बळवंतरावाचे नातू श्री. बी. एम. पेंढारकर नासिकला चांगले वकील म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांच्याकडेही आज श्रीस्वामींचे भक्ती भावनेने पूजन स्मरण केले जात आहे.

# वासुनाना लिंगनूरकरांना दिले 'दत्तात्रेय' पुत्ररत्न

कोल्हापुरातील वरुणतीर्थ परिसरामध्ये रहाणारे श्री. वासुनाना लिंगनूरकर यांचे लग्न होऊन ८-१० वर्षे झाली तरी त्यांना मूलबाल झाले नाही. श्रीस्वामींचा नावलौकिक त्यावेळी कोल्हापूरी सर्वत्र पसरला होताच. सश्रद्धमनाचे श्री. वासुनाना यांनी ठरविले की, आता आपणही कुंभारगल्लीतल्या श्रीस्वामींचे दररोज दर्शन घ्यायचे. त्याप्रमाणेच ते नित्य घरातील देवपूजा आटोपून मनोभावे श्रीस्वामींच्या दर्शनास जाऊ लागले. सुमारे दोन वर्षा नंतर एकदा अचानक ते दर्शन घेत असताना श्रीस्वामी त्यांना म्हणाले, "काय रे, मुलगा पाहिजे म्हणून येतोय होय? उद्या तुला मुलगा देतो. जा, उद्या बायकोला घेऊन ये. " श्रीवासुनांना या श्रीस्वामींच्या अचानक बोलण्याने खूष झाले. दुसर्या दिवशी त्यांनी आपल्या सोबत पत्नीलाही श्रीस्वामींच्या दर्शनासाठी नेले. श्रीस्वामींचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी, त्यांच्या जवळील एख श्रीफळ स्वतःच उचलून श्री. वासूनानांच्या पत्नीला म्हणू लागले, "घट्ट धर हं नीट. आता पुढच्यावर्षी बाळालाही दर्शनाला घेऊन ये. त्यांचे नांव 'दत्तात्रेय' ठेव बरं का." प्रेमपूर्वक असे बोलतच त्यांनी ते श्रीफळ त्यांच्या ओट्यातच टाकले. वर्षानंतर खरोखरीच बाळ दत्तात्रेयास घेऊन श्री. वासूनाना व त्यांच्या पत्नी आनंदाने मठीत श्रीस्वामींच्या दर्शनास गेल्या. त्यांनी श्रद्धेने बाळास कौतुकाने मांडीवर घेतले हे बाळ दत्तात्रेय पुढे मोठेपणी राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षक झाले. लहानपणी त्यांनी श्रीस्वामींचे दर्शन तर घेतलेच व पुढे श्रीस्वामी समाधिस्त झाल्यावर ते दर पोर्णिमेस वाडीक्षेत्री दर्शनास जाऊ लागले. ते नेहमीच श्रीगुरुचरित्राचे पारायण करीत रहात. श्रीस्वामींच्या या कृपाप्रसादाची आठवण आजही त्यांच्या घराण्यातील श्री. वासूनानांची नात व श्री. दत्तात्रेय मामांची भाची असलेल्या सौ. इंदुलकर कुलकर्णी मोठ्या श्रद्धा भक्तीने सर्व भक्तमंडळींना प्रेमाने सांगत असतात.

# इंदुलकरआईंना वाडीतून कुंभारगल्लीत जाण्याची आज्ञा

श्रीस्वामींच्या अनेक भक्तगणांमध्ये माईसाहेब पिशवीकर व त्यांच्या परिचित इंदूलकरबाई यापण होत्या. माईसाहेबांनी त्यांच्या या मैत्रीणीची इंदूलकर बाईंची कहाणी त्यांचे नातू बा. रा. शिंदे. राजारामपूरी, कोल्हापूर यांना सांगितली, ती त्यांनी लिहून ठेवली आहे. इंदूलकर बाई या दत्तभक्त होत्या. दर पौर्णिमेस त्या श्रीक्षेत्र नृसिंहवाडीची वारी करीत . त्याकाळी गोषाची पद्धती असल्याने त्या रात्रभर चालून पहाटे तेथे पोहोचत. इंदूलकर बाईंचे सुपुत्र श्रीपतराव दोन्ही पायाने तेव्हा अधु होते. त्यांनी आधारा शिवाय चालता येत नसे. त्यासाठी भरपूर औषधोपचार-उपाय केले. पण काहीच इलाच होईना. तेव्हा दत्तभक्तीमध्ये रंगलेल्या त्यांच्या आईने आता यापुढे आपल्या श्रीदत्तप्रभूनाच या श्रीपतीचे विषयी प्रार्थना करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्या श्रीपतीसह वाडीक्षेत्री गेल्या. अगदी लवकर भल्या पहाटेच सर्वाआधी उठून कृष्णा-पंचगंगा संगमावर स्नान करुन ओलेत्यानेच त्या श्रीदत्तप्रभूंच्या मंदिरी आल्या. आपल्या ओल्या पदराने त्यांनी मंदिराचा प्रदक्षिणा मार्ग पुसतच प्रदक्षिणा घातली. त्यांच्या मागोमाग श्रीपतीपण मोठ्या कष्टाने प्रदक्षिणा घालण्याचा प्रयत्न करु लागले. बरेच दिवस अशी त्या मायलेकांची सेवा सुरु होती. काही काळाने श्रीदत्तप्रभूंचा इंदूलकर आईंना दृष्टांत झाला की, "मी व श्रीकृष्ण सरस्वती स्वामी एकचत आहोत. यापुढे तुम्ही तेथे कुंभारगल्लीतच जाऊन सेवा करीत आनंदाने रहा." या दृष्टांतानुसार मायलेक रंगून गेले. श्रीपती यांना श्रीस्वामीविषयी अपार भक्ती असल्यामुळे त्यांनी त्यांची मनोभावे सेवा केली. ते उत्तम चित्रकार होते. त्यांच्यावर श्रीस्वामींची कृपादृष्टी होती. त्यामुळेच त्यांनी श्रीस्वामींचे अनेक चित्रे रेखाटली. ती बरेच ठिकाणी आहेत. त्यांचा हा श्रीस्वामीभक्तीचा वसा त्यांचे सुपुत्र श्री. माणिकराव इंदूलकर आपल्या भजन सेवेतून आजही जपताना दिसत आहेत.

# हावळांवरील स्वामी कृपाछत्र श्री गोंदवलेकरांनी जाणले

श्री. गणेश बळवंत हावळ हे कोल्हापूरी राजदरबारी सेवेत होते. ते सचोटीने काम करणारे होते. त्यांचा देवधर्म साधुसंत याविषयी ओढा होता. ते दर रविवारी ज्योतिबा डोंगरावर दर्शनास जात असत. त्यांच्या या नियमामुळे त्यांना कधी कधी कामावर येण्यास वेळ होई. त्यावेळी काही जनांनी त्याविरुद्ध तक्रार केली. श्रीमंत छत्रपती शाहू राजे यांना त्यांच्याविषयी पूर्ण माहिती होती. त्यामुळे त्यांनी स्वतःच त्या तक्रार करणा-यांना सांगितले की, "श्री. हावळ हे प्रामाणिक, कष्टाळू व नियमितपणे व्यवस्थित काम करीत असतात. त्यांचा स्वभाव देवभक्तीचा असल्याने ते दर रविवारी ज्योतिबास जात असतात. तेथून दर्शन घेऊन ते कामावर येण्यास वेळ झाला तरी त्यांना कोणी त्रास देऊ नये." कुंभारगल्लीमध्येही ते नेहमीच भक्तीने येऊन श्रीस्वामींचे दर्शन घेत. त्यांची शक्य ती सेवा करीत. सर्वजन त्यांना सन्मान देत. परंतु श्री.हावळ अंतःकरणातून मात्र दुःखी होते. बाहेर ते आपले दुःख कोणासमोरही प्रगट करीत नसत. इतकेच काय श्रीस्वामींना पण त्यांनी आपल्या दुःखाबाबत कधी सांगितले नाही. श्री. हावळ यांची आतापर्यंत तीन लग्ने होऊनही त्या तिन्ही पत्नी काही ना काही कारणाने अकालीच मरण पावल्या होत्या. त्यामुळे ते मनातून फारच दुःखी होते. आता यापुढे लग्नच करायचे नाही असे ठरवून ते शांतचित्ताने आपले काम पाहून उरलेला सर्व वेळ श्रीस्वामी सेवेतच घालवू लागले होते. त्यांची संसारिक ओढ कमी होऊन त्यांचे स्वतःच्या देहाकडेही लक्ष नसे. त्यांची केस, दाढी, नखे वाढली तरी त्यांचे त्यांना भान नसे. एके दिवशी श्रीस्वामी सेवेत असताना श्रीस्वामी त्यांना म्हणाले, "स्वामी, माझ्या नशिबात लग्नाचे सुख नाही. नाही तर आतापर्यंत तीन लग्ने होऊनही त्या बायका कशा मेल्या असत्या? तेव्हा आता लग्न नको. तुमची सेवा मनापासून घडो." परत श्रीस्वामी म्हणाले, "तू लग्न का करीत नाहीस?" श्री हावळ म्हणाले, "स्वामी, जर दिर्घायुष्यी-आरोग्यसंपन्न बायको लाभत नसेल तर कशाला लग्न करायचे? तुम्हीच सांगा." तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, "मी, तुला जर दिर्घायुष्यी आरोग्यसंपन्न बायको दिली तर तू लग्न करशील काय?" श्री हावळ म्हणाले, "आपली आज्ञा असेल तर करीन." त्यावर श्रीस्वामी म्हणाले, "जा, तर मग तुला तशी बायको मिळेल. तू लग्न कर." श्रीस्वामींच्या आशिर्वादामुळेच पुढे श्री. हावळ यांचे सरस्वतीबाई यांच्याशी लग्न घडून आले. तेव्हा श्रीस्वामी समाधिस्त झाले होते. लग्नानंतर प्रथम आपत्त्यांच्या वेळी सरस्वतीबाई अकाली प्रसूत झाल्या. तेव्हा पहिल्याप्रमाणेच प्रसंग पाहून श्री. हावळ मनोमन कासावीस झाले. ते मनोभावे श्रीस्वामींचे नामस्मरण करु लागले. सौ. सरस्वतीबाई तेव्हा दुःखाने तळमळू लागल्या असतानाच त्यांचे स्वप्नामध्ये श्रीस्वामी ख्रिश्चन मडमच्या रुपामध्ये येऊन सांगू लागले, "अग, अशी घाबरतेस कशाला? यापुढची तुझी मुले चांगली निघून तुला समाधानात, सुखामध्ये ठेवतील. तुम्ही बिलकुल चिंता करु नका."

श्रीस्वामींच्या कृपाशिर्वादाने हे सर्व खरे ठरले आहे. आज त्यांच्या मुले-मुली चांगल्या रितीने आनंदात असून त्यांचाही प्रेमाने सांभाळ करीत आहेत. मध्यंतरी श्री.हावळ यांचे निधन झाले. त्यानंतर दुःखी झालेल्या सरस्वतीबाईंना श्रीस्वामी वेळोवेळी दृष्टांतामध्ये दर्शन देऊन त्यांचे सांत्वन करुन समाधान देत आले आहेत. विशेषतः सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे श्री.हावळ यांचे पिताजी गोंदवल्याच्या सुप्रसिद्ध संत श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे अनुग्रहीत शिष्य होते. एकदा ते आपल्या सुनेला सरस्वतीबाईंना घेऊन गोंदवल्यास दर्शनासाठी गेले होते. तेव्हा सरस्वतीबाई दर्शन घेऊ लागताचय श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज त्यांना म्हणाले, "अगं, तुझ्यावर श्रीगुरुंचे फार मोठे छत्र

आहे जा.! माझे आशिर्वाद आहेत तुला." आज या श्री. हावळ यांचे सर्व कुटुंबाचे श्रीस्वामी म्हणजे एक प्रमुख कुलदैवतच बनून गेले आहे.

# रमाबाई व कन्या आनंदाबाईंवर स्वामींचे प्रेम

श्रीस्वामी भक्तीमुळे कृतार्थ झालेल्या अनेकांमध्ये रमाबाई व त्यांच्या कन्या आनंदीबाई याही अशाच भाग्यवंत होत्या रमाबाई श्रद्धेने कुंभारगल्लीत येऊन श्रीस्वामींचे भक्तीने दर्शन घेत असत. एकदा असेच त्या मठीत आल्या आपल्या हातातील कुंकवाचा करंडा पुढे करीत त्या श्रीस्वामींना कुंकु लावून दर्शन घेऊ लागल्या. तेव्हा श्रीस्वामींनी त्यांच्या हातातील तो करंडा स्वतःच काढून घेतला. रमाबाई अगदी घाबरून गेल्या. घरी गेल्यावर सासूबाई रागावतील या भीतीने त्यांच्या डोळ्यातून पाणी आले. तेव्हा श्रीस्वामींनी तो करंडा त्यांना परत दिला. परंतु मो करंडा देताना ते म्हणाले, “अगं, आता याचा तुला काही उपयोग नाही.” ते ऐकून रमाबाई जड अंतःकरणानेच घरी परतल्या पुढे लवकरच त्यांचे पती श्री. गोपाळराव प्लेगच्या साथीत अचानक निधन पावले. रमाबाई श्रीस्वामींच्या दर्शनासाठी नेहमीच येत त्यांचा सर्व आधार हेच श्रीस्वामी महाराज होते. त्यानियमाने कुंभारगल्लीमध्ये जाऊन दर्शन करुन येत असत. एकदा त्यांची कन्या आनंदीबाई या फार आजारी होत्या. रमाबाईंना आपल्या या कन्येचे सर्व सांभाळून दर्शनास जाण्याची ओढ होती. त्यांनी दुसर्या कोणास तिच्या सोबतीला ठेवून त्या नियमाप्रमाणे कुंभारगल्लीत गेल्या. श्रीस्वामींचे मनोभावे दर्शन घेऊन त्यंनी आपल्या जवळच्या दोन खारका श्रीस्वामी चरणी अर्पण केल्या. श्रीस्वामींनी त्या दोन खारका आपल्या हाती ठेवल्या काही वेळ त्या खारकांकडे न्याहळून पहात राहिले. मग त्यातील एक खारीक रमाबाईंच्या हाती देऊन म्हणाले, “ही एकच घे. ही तुझीच आहे.” श्रीस्वामींचा प्रसाद घेऊन रमाबाई घरी आल्या. आनंदीबाईपण श्रीस्वामीकृपेने लवकर ब-या झाल्या. मग श्रीस्वामींच्या त्या बोलण्याचा अर्थ त्यांच्या ध्यानी आला. श्रीस्वामीकृपेचे असे अनुभव मिळाल्यने त्यांच्या घराण्यामध्ये ही भक्तीपरंपरा कायम सुरु राहिली. त्या रमाबाईंचे पणतू व आनंदीबाईंचे नातू श्री. माधव श्रीपाद लाटकर यांनी भक्तीप्रेमाने श्रीस्वामींचे एक छोटेसे ‘गोष्टीरुप श्रीकृष्णसरस्वती चरित्र’ लिहुन आपले श्रद्धासुमन श्रीस्वामीचरणी वाहिले आहे.

# म्हादू सोनारास पुरणपोळीचा प्रसाद

श्री. महादेव विठ्ठल वैद्य हे मूळचे रत्नागिरीजवळच्या पावसचे रहाणारे. सोनारकामामुळे हे घराणे करवीरी आले आणि येथे पावसकर म्हणून प्रसिद्ध झाले. श्री. महादेवराव तेव्हा गंगावेशीकडून पंचगंगेकडे जाणार्या रस्त्यावरील स्वतःचे घरीच सोनारकाम करीत असत. परमभाग्याने पूज्य श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची नेहमीच या रस्त्याने पंचगंगेवर फेरी होत असे. बरेच वेळा पूज्यश्री स्वामी त्यांचे घरी येऊन बसत. श्रद्धेने सर्वजण त्यांच्या दर्शनाचा लाभ घेत. त्यांच्या घराशेजारीच पूज्यश्री स्वामींचे परमभक्त श्रीनामदेव महाराज चव्हाण आपल्या आत्याच्या घरी रहात होते. त्यामुळे बरेच वेळा पूज्य श्री. स्वामी व सदभक्त श्रीनामदेव महाराज यांच्यासोबत पंचगंगा स्नानासाठी जाण्याचा सुयोग श्री. महादेवरावांनाही प्राप्त होत असे. पूज्यश्री स्वामी श्री. महादेवरावांना 'म्हादू सोनार' म्हणून बोलवित असत. काही प्रसंगी येताना-जाताना पूज्यश्री स्वामी त्यांचे घरी येत व विविध लिला करीत असत. एकदा असेच घडले पूज्यश्री स्वामी घरी येऊन श्री. महादेवरावांच्या सोनार कामाच्या ठिकाणी बसून म्हणू लागले, “अरे, म्हादू मला फार भूक लागली.” तेव्हा घरातून दहीभात वगैरे आणण्याबाबत सांगूनही पूज्यश्री स्वामी काहीच ऐकेनात. “अरे म्हादू, तुझ्या पेटीतील पुरणपोळीच आज खाऊया.” असे म्हणत पूज्यश्री स्वामींनी तेथील सोनारकामाच्या पेटीचा कप्पा उघडून सहजच गरमागरम पुरणपोळी त्यातून बाहेर काढली. हसतच स्वतःच्या मुखी थोडी लावून तो प्रसाद प्रेमाने म्हादू सोनारास दिला. बरेत वेळा अशा अदभूतलीला त्यांचे घरी घडत. पूज्यश्री स्वामी त्यांना म्हणत. “अरे, म्हादू तुला काय पाहिजे ते मागून घे.” त्यावेळी नम्रतेने हात जोडून श्री. महादेवराव म्हणत, “स्वामी, आपली सेवा अखंड घडो. माझा वंश पुढे चालू दे.” त्यांच्या पाठीवर प्रेमाने हात ठेवून पूज्यश्री स्वामी आशिर्वाद देत असत. सदभक्त श्रीनामदेव महाराज यांच्या संगतीमध्ये राहण्यासही पूज्यश्री स्वामी त्यांना संकेत करीत असत पूज्यश्री स्वामी आज्ञेनुसार यथायोग्य सेवा-भक्ती करुन आपला संसार पार पाडणार्या श्री. महादेवरावांना लाभलेला पूर्ण आशिर्वाद पुढील पिढीत सफळ ठरला. एकुलते एक असणार्या श्री. महादेवरावांना पुढे पुज्यश्री स्वामी कृपेने पुत्र-पौत्रादी लाभून वंशविस्तार होत गेला. या श्री. पावसकर कुटुंबाची पूज्यश्री स्वामी व त्यांचे एकनिष्ठ सतूशिष्य श्री नामदेव महाराज चव्हाण यांच्या चरणावरील श्रद्धाभक्ती अद्यापिही दिसून येते. श्री. अण्णा व बाबा पावसकर बंधुकडून ही माहिती मिळाली. पूज्यश्री स्वामी व श्री. नामदेव महाराज यांच्या दुर्लभ सहवासाची कितीतरी हृदयंगम स्मरणचित्रे त्यांच्या भेटीतून आपणासं ऐकण्यास मिळतात.

# धनगररुपात येऊन स्वामींनी दर्शन दिले

गंगावेस परिसरातील डॉ. सौ. पुष्पाताई बेर्डे यांनी आपल्या आजोबांना आलेला पूज्य श्री स्वामींचा एक वेगळाच अनुभव भक्तांना ऐकविला आहे. त्यांचे आजोबा परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती स्वामींची अगदी मनापासून भक्ती करीत असत. त्यावेळच्या करवीर संस्थानमध्ये छत्रपती श्रीमंत शाहू महाराजांकडे ते वैद्यकीय सेवेत कामकाज पहात असत. आपले कर्तव्यकर्म चोख बजावत असतानाही त्यांची पूज्य श्री स्वामींची भक्तीही तितक्याच निष्ठेने अव्याहत सुरु असे. दररोज पूज्य श्री. स्वामींच्या चरणांचे दर्शन घेतल्याशिवाय त्यांना अन्नपाणीही गोड लागत नसे. तसा त्यांनी नित्यनियमच केला होता की. प्रथम दर्शन आणि मगच भोजन करायचे. एकदा कोल्हापूरात प्लेगची भयंकर साथ पसरली. सर्वत्र मरणाचे भय थैमान घालू लागले. त्यामुळे जनतेच्या सुरक्षेसाठी श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर शहराबाहेर जनतेसाठी खास कॉम्प उभारुन रहण्याची सुविधा केली. दाजीपूर परिसरामध्ये अशा छावन्या मुद्दाम उभ्या केल्या गेल्या. सर्वच जनतेला शहरातून बाहेरील नियोजित स्थानी सुरक्षित रहाण्याचे आवाहन केले गले. हळू हळू शहरात सर्वत्र सामसूम होऊ लागली. परंतु पूज्यश्री स्वामींच्या दर्शनामध्ये खंड पडू नये म्हणून हे स्वामीभक्त मात्र बाहेर जाण्यास राजी होईनात. तेव्हा स्वतःपूज्य श्री. स्वामींनीच त्यांना आज्ञा केली. की. “अरे, अशावेळी जनरीतीप्रमाणे वागावे, तू ‘जेथे’ जाशील तेथे मीच तुला दर्शन देण्यास येईल. तू खुशाल जा.” अखेरीस ही आज्ञा शिरसावंद्य मान्य करुन हे सदभक्त राजदरबारी दाजीपूर कम्पमध्ये सेवेत हजर झाले. तिथे दुसरे दिवशीच त्यांना नित्य नियमाचे वेळी एक भले मोठे पागोटे गुंडाळलेल्या धनगरचे रुपामध्ये प्रगत होऊन पूज्य श्रीस्वामींनी दर्शन दिले. तरी पण त्यांच्या मनामध्ये नेहमीच्या दर्शनाची तळमळ राहून गेली. त्यावेळी रात्री स्वप्न दृष्टांतामध्ये पूज्यश्री स्वामींनी त्यांना दर्शन देऊन सांगितले की, “अरे, धनगर रुपामध्ये मीच आलो होतो.” अशा प्रकारे स्वामी आपल्या भक्तांची तळमळ नेहमीच शांत करीत असत. आजोबांचा हा पूज्यश्री स्वामी भक्तीचा वारसा जपण्या-या डॉ. सौ. पुष्पाताई बेर्डे यांनी म्हणूनच आपल्या गंगावेसामधील दवाखान्यास ‘श्रीकृष्ण सरस्वती क्लिनिक’ असे नांव श्रद्धेने च ठेवले आहे.

# दळवीविषयी जनन्मातेची स्वामीकडे तक्रार

श्रीकृष्ण सरस्वती स्वामी जरी विदेही अवस्थेत वावरत असले तरी भक्तांकरीता अगदी साफ शब्दांत बोध करीत. कधी प्रेमाने तर कधी नाटकी रागाने त आपल्या भक्तांच्या चुका सुधाराव्या म्हणून हरत-हाने प्रयत्न करीत असत. इतर सर्वसामान्य जनांस त्यांच्या कृतीचा-बोलण्याच संदर्भ लगेचच ध्यानी येत नसला तरीही कालांतराने त्याची प्रचिती आल्याशिवाय रहात नसे. श्रीस्वामींचे परमभक्त श्री. वासुदेव दळवी घरसंसार सोडून संन्यासी बनून मठीतच राहिले होते. दररोज उदरनिर्वाहार्थ भिक्षा मागून आणून तिच्यावरच आपला दिनक्रम चालवित असत. एकदा सकाळी सकाळीच भिक्षे समयी घडणार्या त्रासामुळे त्यांचे चित्त अतिशय क्रोधी झाले. ते मनोमन अन्नपूर्णा-महालक्ष्मीविषयी रागावून नको ते शब्द वापरून आपला राग व्यक्त करुन लागले. तेव्हा काही वेळाने एक सात्विक महिला श्रीस्वामीसमोर येऊन मठीत उभी राहिली आणि श्रीदेवीच्या अविर्भावामध्ये रागाने डोळे मोठे करीत म्हणन लागली, “अहो स्वामी, तुमची मुले मला नको तशी बोलतात. त्यांना तुम्ही फार लाडावून ठेवले आहे. वेळीच त्यांना समज देऊन शहाणे करा. नाही तर वाया जातील.” श्रीस्वामींनी मोठ्या कौतुकाने प्रेमाने त्या श्रीदेवीचे समाधान करीत म्हटले, “अग माते, मूल कितीही व्रात्य असले तरी आई त्याचा राग मानते काय? अगदी मांडीवर हागले-मुतले तरी तीच साफसूफ करुन त्याचे मुके घेतेच नां? मी सांगेन बरं. त्या मुलांना समजावून. तू काही रागावू नकोस, बरं. ” श्रीस्वामीचे हे लाघवी स्नेहार्द्र भाषण ऐकून ती श्रीदेवी मग क्षणातच हसू लागली. श्रीदेवी प्रसन्नपणे म्हणाली, “अहो स्वामी, खरोखरत तुमच्या दयाळूपणाला अंत नाही. आईपेक्षाही मायाळू आहात तुम्ही. आपल्या भक्तांकरिता स्वतः कमीपणा घेऊन. त्रास सोसून तुम्ही त्याचे भलेच करीत रहाता. आता त्यायोगाने आपल्या दर्शनाचा लाभा घडला. येते, मी आता.” श्रीदेवीचा अविर्भाव नाहिसा होऊन ती सात्विक महिला श्रीस्वामी चरणी नम्रभावे वंदन करुन निघून गेली. मग समोरच बसलेल्या श्री. वासुदेव दळवींकडे पाहून श्रीस्वामी क्रोधाचा अविर्भाव आणून म्हणू लागले, “घरदार सोडले, भगवे घातले, पण क्रोध नाही सोडला अजून मग काय फायदा? अजूनही खाण्याची वासना नाही संपली मग काय फायदा? अशाने सर्वव्यर्थ जाईल. आता तरी क्रोध सोडा. खाण्यापिण्याचे चोचले बिलकुल करु नका. फक्त डाळ भिजवून खा आणि सुखाने भजन करीत रहा. तरच होईल काही फायदा. जन्माचे सार्थक होईल, समजले.” अशाप्रकारे लीला नाटकी श्रीस्वामींनी दळवींचे निमित्ताने सर्वच भक्तांना यथार्थ बोध करुन दिला.

# ताराबाईंची अपूर्व स्वामीभक्ती

सदभक्त ताराबाई एक सामान्य संसारी स्त्री असूनही पूर्वपूण्याईच्या योगाने तिने केवढी कमाई केली. असह्या पोटदुखीच्या प्रसंगी परम भक्तीने आर्ततेने दत्तभक्ती साधली. संसारी विषयी जनांचे मोहात न पडता श्री. दत्तप्रभूंच्या वचनावर निष्ठा ठेवून श्रीस्वामींच्या चरणी दृढभाव अर्पण केला. अगदी लहान मुलाप्रमाणेच नित्य श्रीस्वामींना आंघोळ घालण्यापासून ते खाऊ पिऊ घालून निवांत निजविण्या पर्यंत तिने प्रेमाने सेवा केली. स्वतःच्या मातेलाही प्रसंगी जुमानले नाही. तिचा विरोध-छळ सहन केला. व अखेरीस तिच्याच उद्धारासाठी झटली. श्रीस्वामी महाराजांचे वैभव वाढवावे, त्यांचा सर्वत्र जयजयकार व्हावा, त्यांची नित्य पांचवेळा थाटात पूजा-आरती घडावी, अशीच तिची नेहमीत तळमळ असे. श्रीस्वामींना कोणताही त्रासजरासुध्दा होऊ नये. म्हणून ती नित्य प्रयत्नशील असे. श्रीस्वामींच्या अंगी चांगले पोशाख चढवावे, त्यांना वेळच्या वेळी पोटभर खाऊ पिऊ घालून त्यांना जराही कष्ट पडू न देता अगदी राजेशीही सुखात पहुडलेले पहावे असेच तिचे विचार असत. त्यामुळेच श्रीस्वामींचे वेळी-अवेळी फिरणे, खाण्यापिण्याची पर्वा न करणे, विश्रांतीचा विचारही नसणे या गोष्टीमुळे ती नेहमी कष्टी होत असे. श्रीस्वामींचा विरह तर थोडसाही तिला सहन होत नसे. ते बाहेर फिरावयास गेल्यावर मठीत परत येईपर्यंत तिला चैन नसे, त्यांना थोडेसेही बरे वाटत नसले तर तिचा जीव अगदी कासावीस होत असे. प्रसंगी ती त्यांच्याकरिता रडत राही, उपोषण करी, अगदी सामान्य माणसांप्रमाणेच त्यांच्यासाठी औषधोपचार-देवधर्म-तीर्थ-अंगारा करण्याइतपत ती त्यांचेशी एकरुप झाली होती. कधी मधी चुका घडल्यास श्रीस्वामी तिला सावध करीत. कधीतरी इतरांनी तिच्या विषयी गैरसमजूत - दुजेपणा केल्यावर श्रीस्वामी तिची थोर पूर्वपुण्याई-सेवा भक्तीचे कौतुक करुन इतरांस शहाणे करीत. तर कधी तिला गर्व चढल्यास तिच्याही लक्षात आणून देत. पैशाचा मोह तिला जरा त्रास देई. मठीत श्रीस्वामींच्या दर्शनार्थीची गर्दी नेहमी सुरुच असे. कधी कधी नेहमीपेक्षा फारच अधिक लोकांचे खाणे-पिणे करावे लागे. तेव्हा त्रासून कधीमधी ती इतरांस उणेदुणे बोलत असे. तेव्ही श्रीस्वामी तिला समजावून सांगून शांत करीत. पण कधीतरी इतरांकडून द्रव्यार्जनाची अपेक्षा तिच्या मनात लोभ निर्माण करु लागली तर श्रीस्वामी तिला स्पष्टपणे खडसावून सांगत, “आई, तुझ्या घरी प्रत्यक्ष देवच असताना इतर लोभ काय कसतेस? बाह्य गोष्टी वैभव व्यर्थ आहे. फक्त मनःपूर्वक भक्तीच खरी श्रेष्ठ आहे. इतरत्र मन घालू नकोस.” तिलाही त्यांचे हे बोलणे पटे. ती चुकीचा लोभ सोडून पुन्हा आपले चित्त भक्तीमध्ये रमवी. खरोखरीच सदभक्त ताराबाईंची पूर्वपुण्याई व या जमीचीही सेवा-भक्ती फारच थोर होती. तिच्याइतकी तळमळीची भक्तीसेवा दिनरात घडणे इतर संसारी जीवांना तसे मुष्कीलच होते. परंतु या भक्तीमार्गाची सर्व वाटचाल फारच कठीण असते. भलेभलेही कुठे ना कुठे वाट चुकतात. मध्येच थबकतात तर काही वाटच सोडून देतात. श्रीताराबाईंना आपल्या डोळ्यासमोरुन श्रीस्वामीचे इतरत्र जाणे सोसवत नसे. त्यांचा विरह तिला वेडे करुन टाकी, अंती या विचारामुळेच भावनेच्या आहारी जाऊन तिने विचार केला की, जर यदाकदाचित् जेव्हा केव्हा श्रीस्वामी आपला देह सोडतील तेव्हा त्यांची समाधीही आपल्या घरीच झाली पाहीजे. यादृष्टीने तिने घरातीलच एका स्थानी समाधीस्थळाची बांधाकामाची योजना आखली. तिचा हा भावनिक वेडेपणा श्रीस्वामींच्या ध्यानी येताच ते तिला उद्देशून म्हणाले, “हिच चित्त आता चाळले आहे. हिलाच पुढे पाठवून द्यावे लागेल. धनाची आशा संपली नाही, मग भोगा पुढील जन्मी” श्रीस्वामींचे हे बोलणे एकून ताराबाई मनोमन वरमल्या. इतरही आजूबाजूच्या भक्तांस त्यामुळे खेद वाटू लागला. तेव्हा त्या क्षमापूर्वक प्रार्थना करुन हिरमुसल्या मुद्रेने सेवा करु लागल्या. अक्कलकोट निवांसी

श्रीस्वामी समर्थांचे परमभक्त श्री. चोळाप्पा यांनी बरेच वर्षे दिवसरात्र श्रीस्वामीसमर्था सोबत राहून त्यांची मनोभावे सेवा केली. अखेरीस त्यांनाही असा मोह आला की, श्रीस्वामी समर्थांच्या अवतार कार्य समाप्ती नंतर त्यांची समाधी आपल्याच घरी रहावी. त्या हेतूने त्यांनी श्रीस्वामी समर्थ हयात असतानाच आपल्या घरातील जागेत त्यांच्या नियोजित समाधी स्थळाचे बांधकाम चालविले, श्रीस्वामी समर्थानी हे जाणले व त्यांस म्हणाले, चोळ्या, माझी समाधी बांधतोय. पण मीच आधी त्याला समाधीत ठेवीन. मगच मी जाईन.'' श्रीस्वामी समर्थांची ही वाणी अक्षरशः सत्य ठरली. प्रथमतः सदभक्त श्री. चोळाप्पा यांचे देहावसान झाले आणि त्यानंतर मागून श्रीस्वामी समर्थांनी आपले सगुण साकार लीला संपविली. अर्थातच श्रीस्वामी समर्थांची पावन समाधी त्या श्रीचोळाप्पाने पूर्व नियोजित केलेल्या जागीच केली गेली. अखिल ब्राम्हांडाचा नायक भक्तीसाठी असा विकला जातो. पूर्वापार हीच रीती त्याने बाळगली. परम भक्ताभिमानी श्रीस्वामी समर्थांनीही त्याचेच उदाहरण दाखवून दिले. आता त्याचेच अंशावतार असलेल्या श्रीकृष्णसरस्वती स्वामींच्या बाबतीतही अगदी तसेच घडल्याचे दिसून येते . श्रीस्वामी व ताराबाई यांच्यामधील हे प्रेमभक्तीचे देणे घेणे तंतोतंत तसेच झाले.

# ‘तारासदनी’ समाधीचे वचन व ताराबाईंचे देहावसान

काही काळाने ताराबाईंना आपल्या जीवनाचे अखेर होत असल्याचा संकेत मिळू लागला. तिचे चित्त तळमळीने श्रीस्वामींचे चरणांचे ध्यान करण्याचा प्रयत्न करु लागले. तिची तळमळ जाणून श्रीस्वामी एकदा मायेने तिच्याजवळ जाऊन तिची चौकशी करु लागले. त्यांनी तिला तिची इच्छा विचारताच ती म्हणाली, “स्वामी, तुमची वस्ती आमचे घरीच नित्य राहो. वंशपरंपरागत तुमची सेवी-चाकरी आमच्या घरात होत राहो. हीच माझी मागणी आहे.” श्रीस्वामींनी तिचे मनोगत जाणून तिला ‘तथास्तु’ म्हणून आशिर्वाद दिला. श्रीस्वामी त्यांच्या मर्जीनुरुप फिरत फिरत श्री. राशिवडेकरांच्या घरी गेले होते. इकते त्याच समयी मठीमध्ये सदभक्त ताराबाई अनंतामध्ये विलीन झाल्या भक्तांनी श्रीस्वामींना तेथून मठीत परत आणले. श्रीस्वामींनी विदेहीपणा सोडून क्षणभर तिच्या भक्तीसेवेस भुलून ‘आई-आई’ म्हणून डोळ्यातून अश्रू गाळले. श्रीस्वामींचे ते भक्तप्रेम पाहून इतरांचेही चित्त पार गलबलून गेले. ताराबाईंची अखेरची आरती स्वतः श्रीस्वामींनी ओवाळली. तिच्या हाती खडीसारखेचा खडा ठेवला. श्रीस्वामी तिच्या मस्तकी कुंकूम लावताना जणू काही तिने देहात परत प्राण आणून त्यांचे डोळे भरून अखेरचे दर्शन घेतल्याचे भक्तमंडळींना जाणवू लागले. नामस्मरणामध्ये ताराबाईंची अंत्ययात्रा असंख्य भक्तांच्या गर्दीत पंचगंगेकाठी निघाली. श्रीस्वामी ताराबाईंचे सुपुत्र दत्तोबा यांचे सात्वंन करीत स्वतः पुढे पुढे चालू लागले. स्मशानी गेल्यावर आपल्या खांद्यावरील वस्त्राने एका जागी साफसूफ करीत श्रीस्वामींनी तिथे सदभक्त ताराबाईंच्या देहास अग्निसंस्कार करण्याची आज्ञा केली. “त्याजागी एक दीप प्रज्वलित करुन ठेवा” असे सांगून श्रीस्वामीं त्या उजळलेल्या दिपाकडे पाहून डोळ्यातील आंसवे गाळीत, परत परत ‘आई-आई’ असे म्हणत म्हणत त्याकडे पहात मठीत परतले. काही काळाने तिच्या आठवणीने भारावून जाऊन श्रीस्वामी सांगू लागले, “आई गेली, आता मी ही जाणार. पण आईची धनाशी राहिली. तिला राजा म्हणून जन्मास घातले आहे.” श्रीस्वामींच्या दयाप्रेमाला अंतच नाही हेच त्रिवार सत्य आहे. भक्तांची ते जन्मभर काळजी वाहतातच, परंतु पुढेही त्याला अंतिम मुक्ती मिळेपर्यंत त्याच्या जन्मो जन्मीची व्यवस्थाही सुखरुप पणे लावून देतात. धन्य श्रीसदगुरु लीला.

# स्वामीरायांचा भक्तांवर अखेरचा बोधवर्षाव

आषाढ मासाचा पावसाळा सुरु झाला. मधूनमधून ढगाळ वातावरणांमध्ये वीजा चमकू लागल्या. नेहमीचे चैतन्य हरवून थोडासा उदासपणाच सर्वत्र भासू लागला. अखिल ब्रह्मांड नायक परब्रह्म परमात्मा ज्या श्रीकृष्ण सरस्वती स्वामी रुपाने या भूतलावर प्रगटला होता. त्याने आता आपली सगुण साकार रुपातील अवतार कार्याची सांगता करण्याचे ठरविले. “हा देह भूतांचे उसणे घेणे, ते आता योग्यकाळी ज्याचे त्याला परत करावेच लागणार.” असे गंभीर उदगार स्थित शांत चित्ताने श्रीस्वामी आता वारंवार काढू लागले. नेहमीचा पंचगंगा नदी तीरावरचा फेरफटका थांबाल श्रीस्वामी मठीतच हिंडत-फिरत रहात. बाहेर जाणे सोडले. पलंगावर वा सिंहासनी बसणे-निजणे कमीत. बहुधा मठीतल्या मठीतच आंतबाहेर औदुंबरा खाली दिवस रात्र फे-या घालू लागले. त्यांचे बोलणे नेहमीच फार कमी, संक्षिप्त, मोजके व गूढ होते. अधूनमधून अंगामध्ये ताप असे. शरीरही थकल्या प्रमाणे भासे. परंतु तरीही ते एका जागी सिंहासनी बसत नसत. आपल्या पलंगावर पडून रहात नसत. भक्त मंडळीची वर्दळ तर कायम सुरुच असे. ते प्रत्येकाशी प्रेमाने संवाद साधत रहात. धो-धो कोसळणा-या पावसांकडे पहात श्रीस्वामी सांगत, “पहा रे, असा धो-धो पाऊस कोसळूनही ते डोंगर-पर्वत कसे शांतपणे सहन करीत रहातात. आपणही जगातील सुखदुःखे त्या प्रमाणेच अविचल पणे शांत पणे सहन करीत रहावे.” मध्येच जोराता एखादी वीज कडाडून गेल्यास ते म्हणते, “इकडून-तिकडे उगाचच गडबड करीत स्वैर धांवणे बरे नव्हें. आपले मन स्थिर ठेवून रहाणेच हिताचे आहे.” ढगाळ वातावरणा मध्ये नित्याचा चंद्र थोडा काळ दिसेनासा झाला तेव्हा श्रीस्वामी म्हणाले, “अरे बाबांनो, साधकाने गुरुभक्ताने त्या चंद्रासारखे काही काळ संसारी-विषयी दुर्जन लोकांच्या संगती पासून दूर राहून असाच काही काळ एकांतात घालवावा बरे.” बाहेरच्या गडद अंधार्या रात्रीकडे पहात ते सांगत, “खरोखरच, बाहरे असे सर्वजण मोह मायेच्या गडद अंधारात, दिशाहीन होऊन, भ्रांत चित्ताने, स्वहिताचा पथ न सापडून या दुर्लक्ष नरदेहाचा व्यर्थ दुरुपयोग करीत आहेत.” जोराच्या पावसामुळे आजूबाजूला मोठ्या मोठ्याने खळखळ करीत वहाणारे गल्ली बोळातील नाले पाहून श्रीस्वामी म्हणत, “जोवर तो मोठा पाऊस आहे तोवरच यांची ही खळवळ ऐकू येणार. नेहमीच्या इतक्याशा लहान नाल्यांचा हा क्षणिक खळखळाट काय कामाचा ? आपणही उगाचच लहान तोंडी मोठा घांस घेऊ नये. करणे कमी आणि बोलणे मात्र फार हे काही उपयोगाचे नाही रे, बाब.” श्रीस्वामींची होत असलेली नाजूक प्रकृती, खाण्या पिण्याची बिलकुल नावड, झोप तर सोडाच पण निदान एका जागी गादीवर पडू विश्रांती घेण्याचेही नांव नाही. या प्रकारामुळे सारे भक्तजन वाकुळ होऊन त्यांना विश्रांतीसाठी खाण्यापिण्यासाठी सारखे विनवित रहात. त्यांचे सध्याचे सारखे मठीभर फिरत रहाणे व बोलत रहाणे सुरुच होते. क्षणातच मागील दारी औदुंबरा खाली येऊन त्याच्याकडे पहात श्रीस्वामी म्हणत, “बा, औदुंबरा, आजपर्यंत तुझ्या शीतल छायेखाली या कृष्णाला फारच समाधान झाले. पण आता आपली संगत काही फार काळ नाही. बरं.” वरती आकाशाकडे पहाच चंद्रबिंबाकडे पहात म्हणत, “अरे वा, चांदोबा तर छान वाटतो. पण त्या सूर्य नारायणाचे तेज कुठे आहे याकडे !” मध्येच थांबून आत मध्ये परत जाताना ते सांगू लागले, “असे निस्तेज होऊन दुसर्याच्या दारी जाण्यापेक्षा आपल्या जागीत निवांत बसून रहाणे बरे. नाही कां?” श्रीस्वामी असे बोलत रहात आणि आजूबाजूचे सदभक्त आपल्या जीवाचे कान करुन ते ऐकण्यासाठी त्यांच्या मागून-मागून फिरत असत. आता भक्तांच्या आग्रहा खातर श्रीस्वामी थोडावेळ शयन गृहातील त्यांच्या पलंगावर येऊन बसले. समोरच शांतपणे तेवत असलेला दिपक रात्रीच्या त्या समयी हलकासा प्रकाश देत होता. त्या दिपक कडे पहात श्रीस्वामी शांता

हळुवार स्वरात प्रेमभराने सांगू लागले, “अरे, हा दिपकच खरा खुरा सत्पुरुष आहे. तो शांत पणे प्रकाश देत रहातो. त्याच्या उजेडा मध्ये काही जन भक्ती भावनेने सुंदर सुंदर वेद, उपनिषदे, रामायण, भागवत, गीता, संतचरित्रे वगैरे सद्ग्रंथाची मनःपूर्वक पारायणे करतात. तर काही बिचारे चो-यामा-या वगैरे पाप कृत्यासाठी त्या उजेडाचा दुरुपयोग करतात. तो दिपक मात्र स्थिर वृत्तीने एकसारखा प्रकाश दोघांनाही देत रहातो. तो त्यांच्या कोणत्याही कृत्याचा पुरस्कार वा तिरस्कार करीत नाही. दोघांनाही समानतेने प्रकाश देणे हेच त्याचे काम. मग जो सत्कृत्य करील तो समाधानी राहिल व दुष्कृत्य करेल तो दुःखी होईल. त्याला, कारण त्यांचीच सत्कर्मे वा दुष्कर्मे असणार. त्या दिपकाचा त्यांमध्ये काहीच दुजेपणा नसतो. तो सर्वांना समानच प्रकाश देतो.” असे सांगत सांगत श्रीस्वामींनी त्या दिपकाकडे पहात दोन्ही हात जोडून नमस्कार करीत म्हटले, “हे दिपका, तुच खराखुरा सत्पुरुष आहेस. तू कोणत्याही कृत्यात अलिप्तच रहातोस. तू प्रामाणिक निर्दोष संतच आहेस. तुला माझा नमस्कार” श्रीस्वामींचे सततच सुरु असलेले अशाच प्रकारचे नित्य बोलणे सदभक्तांच्या हृदयाशी जाऊन भिजत असे. त्यांच्या या बोलण्या वागण्यातून काहीतरी वेगळीच हुरहुर प्रत्येकाच्या चित्तास लागून रहात असे.

# “राम गेले, कृष्ण गेले आता आम्हीही जाणार”

आता तर श्रीस्वामींच्या अंगातील ताप फारच वाढू लागला भक्त मंडळींनी घाबरून नाना उपाय सुरु केले. श्रीस्वामींना पहाण्यास वैद्य- डॉक्टर येऊ लागले. श्रीस्वामींचे ज्वराने फण फणणारे अंग तपासून ते औषधयोजना करु लागले. काहींनी त्यांना तपासून संग्रहणी आजार झाल्याने निदान केले. श्रीस्वामींची शरीरा तील शक्ती कमी होत असल्याने त्यांनी गादीवर पडून रहाणे मान्य केले. त्यांची शरीराची अशक्तता, जीवघेणा खोकला, तापाने भाजून निघणारे अंग या गोष्टी पाहून सारेच भक्तजन काळजी करु लागले. त्यात मध्येच श्रीस्वामींचे निरवानिरवीचे संभाषण ऐकून तर सर्वांच्या काळजाचे अगदी पाणी-पाणीच होई. श्रीस्वामी सांगत, “अरे राम गेले, कृष्ण गेले मग इतरांची काय कथा? प्रत्यक्ष भगवंतच जातो तर मग इतरांनी तरे कसे रहावे बरे? आमचे प्राण प्रिय सदगुरु तात्यासाहेब ही अक्कलकोटी समाधिस्त झालेच नां? मग आता आम्हाला ही जावेच लागणार. ज्याचा जन्म त्याचा मृत्यु ठरलेलाच आहे. हे शरीर पाच महाभूतांचे उसणे घेणे मग वेळीच ज्याचे त्याला परत करावे लागणार नाही क? आप, पृथ्वी, वायू, अग्नी, प्रकाश या पाच महाभूतांचे हे देणे आता मलाही परत करावेच लागणार. अरे-माझी ताराआई होती ती दररोज प्रेमाने दहीभात-दूधभात प्रेमाने भरवीत असे. ती आई ही मला सोडून निघून गेली तर मी तरी कशाला राहू?” श्रीस्वामींचे हे अंतःकरणाचा ठांव घेणारे शब्द ऐकून सदभक्त श्री.लाड, दळवी, म्हादबा पटकर, वेणीमाधव, रामदास ब्रह्मचारी, व्यास, रामजीपुजारी, मुरगुडकर, परांडेकर, दत्तोबा, शिऊबाई, बायजाई, मुक्ताबाई, वगैरे वगैरे अनेकानेक सदभक्तांच्या हृदयाचे जणू ठोकेट चुकू लागले. ते सर्वजण म्हणत, “स्वामी, तुमच्या बरोबरच आम्हाला ही न्या. तुमच्या वाचून जगणे आम्हाला अगदी असह्य आहे.” श्रीस्वामी मग धीराने त्यांना सांगत, “अरे, बाबांनो, देह हा नश्वरच आहे. पण आत्मा अमरच रहाणार. इतके दिवस आमच्या संगतीत राहून मग तुम्ही काय शिकलात? जो कोणी शुद्ध अंतःकरणाने इतर सर्व व्यापर सोडून केवळ माझीच आठवण करील त्याला मी हा देह सोडून गेल्यावरही अगदी आतासारखाच सदेह होऊन पुनःपुन्हा जरुन भेटीन. जो जो सदभक्ती, सदाचार, सत्कर्मामध्ये राहून आपापले कर्तव्यकर्म करीत राहिल त्याच्या हृदयाच्या पवित्र वैराग्य मठीतच माझे वास्तव्य आता कायम राहील. व्यर्थ शोक करुन दुःखी होऊ नका. सदैव नामस्मरण करुन आनंदी व्हा.” श्रीस्वामी असे सांगत असले तरी त्यांच्या सगुण लीलांनी वेडे झालेले सदभक्त त्यांच्या विरहाची कल्पनाही सहन करु शकेनात.

# डॉक्टर, वैद्यांशी विनोद व भक्तांना बोध

काहीनी वैद्य बोलावून आणताच श्रीस्वामी त्या वैद्यांना म्हणत, “या वैद्यराज, तुम्ही कोणते चूर्ण देणार की, आले, मधातून मात्रा उगाळून देणार? सांगा बरे? परंतु आधी छान तपासून निदान तरी करा बरं!” जमलेले वैद्य त्यांच्या ज्ञाना नुसार नाडी पहात, जीभ-डोळे, शरीराची हालचाल पाहून निदान करुन औषध योजना ठरवित. तेव्हा तत्काळ हसत हसत श्रीस्वामी ठणठणीत पणे उठून बसत म्हणत, “पहा बरं, आता नाडी काय म्हणते ते? तापबीप काही नाही नां?” खरोखरीच जमलेले वैद्य आश्चर्याने परत तपासणी करु लागताच आजारी पणाचे कोणतेही साधेसुद्धा लक्षण दिसत नसे. मग काय करणार, निमुटपणे श्रीस्वामींचे चरणी वंदन करुन म्हणत, “स्वामी, तुम्हीच तर जगाला बरे करता. मग आम्ही काय तुम्हास बरे करणार? तुमच्या मनांत जे असेल तेच घडणार.” त्यावेळाचे वैद्यराज घाटे यांनी पण श्रीस्वामींना तपासून बरे करु शकू, अशी आशआ बाळगली. ते श्रीस्वामींचे भक्तपण होते. त्यांच्या मनी किंचित अहंभावही निर्माण झाला होता. परंतु श्री स्वामींच्या अशा प्रकारच्या लीलांनी त्यांचाही अहंभाव नष्ट झाला. तेही अखेर विनम्रतेने शरण येऊन श्रीस्वामींना आदराने नमस्कार करु लागले. कोणी वैद्य जवळ येताच श्रीस्वामी मजेने त्यांस म्हणत, “काहो, अशी कोणती मात्रा, चुर्ण आहे की ज्यामुळे मुत्युच येत नाही? तुम्हा वैद्यराजांना तो यमराज पण घाबरतो काय?” कोणी डॉक्टर इंग्लिश पध्दतीने उपचार करण्याच्या हेतूने येताच श्रीस्वामी त्याला हसून म्हणत, “काहो, तुमची तर छातीला नळी लावून जणू काही तो मृत्युराज यमबळी धुळीत मिसळणार की काय? दंडात इंजेक्शनची टोचणी करुन खरोखरीच यमाची जांचणी तुम्ही चुकवू शकता वाटते! अहो, आम्हाला काहीच झाले नाही. तुम्ही काय तपासता? आम्हाला औषधपाणी काही नको.” बळेच औषधपाणी देऊ लागताच श्रीस्वामी पूर्णपणे निरोगी दिसत. परंतु आता १०-१५ दिवस त्यांनी गादीवरुन उठून हिंडणे-फिरणे सोडून दिले होते. त्यांच्या छातीचे ठोके ऐकू येईनात. सर्वजन अगदी घाबरुन गेले. परुंत त्याही अवस्थेत श्रीस्वामी निवांतपणे गादीवर उठून बसले. भक्तजनांची व्यथा ओळखून म्हणू लागले, “अरे, असे भीता कशाला? आम्ही कायमच आहोत. आम्हाला हा काळ काहीच करु शकत नाही. हे शरीर काळाचे खाद्य आहे. ते त्याला दिले तरी आम्ही मात्र अखंड भक्तांसोबतच राहू आम्ही अंखड आहोतच, विश्वास बाळगा.” इतक्या गंभीर प्रसंगीही अगदी प्रसन्न चित्ताने, स्वच्छ आवाजात श्रीस्वामींचे हे सांगणे एकूण सर्व भक्तगण सांवरले. त्यांना थोडा धीर आला.

# कृष्णजन्मापूर्वीच फुले उधळली व महासमाधी प्रसंग

आषाढानंतर श्रावणातील पंधरवडाही संपून गेला. श्री भगवान् कृष्णजन्माची गोकुळअष्टमी आली. नेहमी मठीत श्रीस्वामींच्या सहवासामध्ये हा श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा मोठ्या थाटामाटात भजन-पूजन करुन संपन्न केला जात असे. याही वेळेस नेहमी प्रमाणे सर्व भक्त जनांनी उत्साहाने एकत्र येऊन हा उत्सव सुरु केला. श्रीस्वामींची प्रकृती ठीक  नसतानाही त्याप्रसंगी काही काळ ते आपल्या सिंहासनावर येऊन बसले. नेहमीचे श्रीकृष्णजन्माचे भजन चालू होते. भगवान् श्रीकृष्णांच्या जन्माची वेळ जवळ येऊ लागताच सर्वांना गुलाल-फुले उधळण्यासाठी वाटील गेली. परंतु यावेळी श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या वेळेपूर्वीच श्रीस्वामींनी फुले गुलाल उधळून दिला व ते आपल्या सिंहासनावरुन उठून त्वरीत आंत पलंगावर जाऊन निजले. श्रीस्वामींची ही कृती सर्वांच्याच चर्चेचा विषय बनली. श्रीस्वामींना सोडून इतरत्र जाणेच भक्त मंडळीना सुचेना. दिवस रात्र भक्त मंडळी सोबतच राहू लागली. श्रीस्वामींचा परमभक्त श्री नामदेव श्रीक्षेत्री गाणगापूरी गेला होता. तिकडे त्याच्या स्वप्नांमध्ये जाऊन त्यांस श्रीस्वामींनी अगदी लवकरात लवकर करवीर मठीत येण्यास सांगितले. त्या आज्ञेनुसार श्रीनामदेवही तेथून श्रीदत्तप्रभूंच्या निर्गुण पादुकांचे पवित्र स्थानातून दर्शन नामस्मरण करीतच त्वरीत थेट श्रीस्वामींच्या सगुण दर्शनाच्या ओढीने करवीर नगरीत आला. धावत पळतच कुंभारगल्लीतील वैराग्यमठी त्यांने गांठली तेथे श्रीस्वामींचे दर्शन घडताच त्याचे समाधान झाले. एकंदरीत सर्व समाचार ऐकून परमभक्त श्रीनामदेवांना श्रीस्वामींनी दृष्टांत देऊन गांणगापूरातून त्यांचे चरणी बोलावून घेतल्या बद्दल मनोमन धन्यता वाटली. त्यांनी कृतज्ञेने श्रीस्वामींचे चरणी वंदन केले. इतके दिवस दिवसरात्र श्रीस्वामी सोबत राहून थकलेल्या भक्तजनांनी त्या दिवशी श्रीनामदेवांनाच श्रीस्वामींन जवळ रात्री बसण्यास सांगितले होते. ते ही आनंदाने श्रीस्वामी सेवत नामस्मरण करीत त्यांचे गादी शेजारीच बसून राहिले. इतर भक्तजन थकून गेल्यामुळे गाढ नीद्राधीन झाले. श्रीस्वामी व सदभक्त श्रीनामदेव दोघेच मठीत जागे होते. हळू हळू रात्रीचा समय संपून, मध्यरात्रही उलटून गेली. ब्राम्हमुहुर्तांची पहाट उगवी लागली. श्रावण वद्य दशमी शके १८२२ सोमवार दि. २० ऑगस्ट१९०० रोजीची ही पहात होती. हलक्या आवाजा मध्येच परमपूज्य श्रीकृष्ण सरस्वती स्वामी महाराजांनी आपल्या लाडक्या शिष्यास 'नामा' म्हणून हांक मारली, शेजारीच बसलेले श्रीनामदेव अगदी तत्परतेने उठून श्रीस्वामींना अत्यंत आर्जवाने होकार देत विचारु लागले. "स्वामी, काय आज्ञा आहे?" त्याच समयी जगत् जननी श्रीमहालक्ष्मी अंबामातेच्या मंदिरातील पहाचे चारचा कांकड आरतीचा परम मंगल घंटानाद श्रीक्षेत्र दक्षिण काशी करवीर नगरीमध्ये सर्वत्र निनादू लागला. नेमके त्याच वेळी श्रीस्वामींनी परमभक्त नामदेवास कापूर लावण्याची आज्ञा केली. स्वतःस त्यांनी त्या कापूर आरतीने ओवाळून घेत आपली सगुण साकार अवतार लीला संपन्न केली.

# असंख्य जन सागराच्या उपस्थितीत समाधी सोहळा संपन्न

श्रीस्वामींची जीवनज्योत त्या पहाटेच्या कापूर आरतीतील ज्योती प्रमाणेच आपल्या चरित्र कार्याचा सुंदर सुंगध सर्वत्र पसरवित बघता बघता अदृश्य झाली. श्री. नामदेवानी हे पाहून करुण अंतःकरणाने जोराचा हंबरडाच फोडला. त्याचा आवाज ऐकून सर्व भक्तजन धांवतच तेथे आले. आपल्या प्राणप्रिय श्रीस्वामींची जीवन ज्योत मालवल्याचे पाहून सर्वजन विरह व्यथेने व्याकुळ झाले. सर्वांचाच आधार नाहिसा झाल्यामुळे जो तो दुःखाने आक्रंदू लागला. कोणी, कोणाचे सांत्वन करावे? हाच मोठा प्रश्न होता. मठीतील हे वृत्त हळूहळू सर्वत्र करवीर नगरी व आजू बाजूस दूर पर्यंत पोहचले. ज्याला समजेल तो तो अगदी धांवत पळत आपली सर्व कामे सोडून मठीत श्रीस्वामींच्या दर्शनासाठी येऊ लागला. आलेला प्रत्येक जन लहान-थोर, स्त्री-पुरूष, श्रीस्वामींच्या सहवासाला आता आपण मुकलो या भावनेने डोळ्यातून अश्रू गाळू लागला. सारे भक्तजन विरह दुःखाने शोक सागरी जणू बुडून गेल्या प्रमाणेच दिसू लागले.  सदभक्त ताराबाईस दिलेल्या वचना नुसार श्रीस्वामींनी आपल्या समाधीसाठी कुंभारगल्लीतल्या त्या वैराग्यमठीत पुढील व्यवस्था करण्याची प्रेरणा सर्व भक्तजंनांना दिली. त्यानुसार त्यावेळचे कोल्हापूरचे लोकप्रिय सहृदयी व सर्व लोहितैषी राजे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनीही श्रीस्वामींचा महिमा जाणून सर्व भक्तजनांच्या इच्छेनुसार त्यास्थानी समाधी देण्याची परवानगी दिली. पूर्व नियोजित स्थळी भूगर्भामध्ये व्यवस्थित जागा करुन परमपूज्य श्रीस्वामींचा परमपवित्र देह यथाविषयी त्याजागी आसनस्थ केला. वेदमंत्र घोषामध्ये-नाम संकीर्तनाच्या जल्लोषामध्ये अत्यंत सदभावनेने अखेरची पूजा अर्चा केली गेली. श्रीस्वामींचा पुण्यदायी पावन देह मीठ-कापूर अर्पण करुन त्याजागीच्या गाभार्यामध्ये समाधिस्त केला गेला. त्यावर सुंदर सिहांसन बनवून श्रींची प्रतिमा सर्व विधीयुक्त भावभक्तीने स्वयंप्रेरीत होऊन फारच सुंदर भजन-पूजन-अन्नदानादी यथासांग संपन्न झाले. श्रीस्वामींच्या पूर्वीच्या स्पष्ट शब्द संकेतानुसार श्रीस्वामी देहाने नसूनही त्यांच्या समक्ष अस्तितत्वाची प्रचिती भक्तजनांना येऊ लागली. विरह दुःखाने व्याकुळ झालेल्या भक्तजनांना त्यांच्या अखंड असणाचा अनुभव वेळोवेळी विविध घटनांतून येऊ लागला. त्यामुळे सर्व भक्तजन श्रीस्वामींच्या समाधीस्थानी दर्शन घेऊन पूर्ववत् भक्तीप्रेमात रंगून त्यांचे नामस्मरण करीत आपापले कर्तव्यकर्म पार पाडू लागले.

# स्वामी सेवा - उत्सव व भक्तानुभव

श्रीस्वामींच्या समाधीस्थानी वैराग्यमठीत व गंगावेसच्या निजबोधमठीत दररोजची श्रीस्वामींची नित्य प्रातःकालीन काकड आरती भूपाळी पासून रात्रौ शेजारती पर्यंतची सर्व सेवा भक्तमंडळी श्रद्धेने करीत आली आहेत. कोल्हापुरातील एक धनिक काळे सावकार यांना घरची काहीच कमी नव्हती सर्व सुखसंपन्नता श्रीस्वामीकृपेनेच लाभली होती. मुलेबाळे आनंदात नांदत होती. पण अचानक एकदा त्यांना समंधबाधा झाली. त्या त्रासाने ते अगदी हताश झाले. श्रीस्वामींच्या समाधीस्थानी दर्शन घेताना त्यांनी नवस केला की, "जर श्रीस्वामीकृपेने ही समंध बाधा दूर झाली तर एक सुंदर पालखी तयार करवून त्यामधून श्रीस्वामींची प्रतिमा मी मिरविन." श्रीस्वामीकृपेने त्यांची समंधबाधा तत्काळ नाहीशी झाली. त्यांनी आपला नवस श्री. रामनाथजी शिर्के यांना सांगताच त्यांनीही आनंदाने मान्यता दिली. त्यानुसार तेव्हापासून दर पौर्णिमेस पूज्यश्री स्वामींचा पालखीसोहळा वैराग्यमठीतून संपन्न केला जातो. उत्तूर येथील सतभक्त श्री. बाळ घुमे यांच्या निमित्ताने सुरु झालेला गुरुद्वादाशीचा उत्सवही पूज्यश्री स्वामींच्या समाधी नंतरही तसाच अखंडीतपणे दरवर्षी आश्विन वद्य द्वादशी रोजी थाटामटात संपन्न केला जाता. श्रीस्वामंच्या नित्य धुपारती समयी कित्येकांच्या बाह्य शारिरीक बाधा-पीडा आज रोजीही कुंभारगल्लीमधील वैराग्यमठीतील समाधीस्थानी येताच नष्ट होतात. तेथील तीर्थ व अंगा-याचे महात्म्यही असाधारण असेच आहे. सदभाविकांनी अत्यंत शुद्ध अंतःकरणाने श्रीस्वामींचे स्मरण करावे, त्यांचे पायी सर्वभावे शरण जावे, त्यांच्या पूजा-आरती-भजन-उत्सवामध्ये सेवा करावी आणि मनोभावे तीर्थ-अंगारा सेवन करुन स्वतःच अनुभव घेऊन शांती, सुख, समाधान प्राप्त करुन घ्यावे. आपण आनंदी बनावे व इतरांसही त्यायोगे आनंदी बनवावे. श्रीस्वामी अखंड-अजर-अमर-नित्यशाश्वत-हांक मारतांच ओ देणारे-स्मर्तृगामी-स्मरण केल्याबरोबर तत्काळ समोर उभे रहाणारे आहेत हे अगदी निःसंशय खरे आहे.

# सदभक्त ताराबाईंच्या वंशपरंपरेकडून सेवाकार्य

कुंभार गल्लीतल्या वैराग्य मठीतील पूज्यश्री स्वामींच्या परम पवित्र समाधी स्थानाची यथा शक्य सेवा-पूजन-उत्सव वगैरेंचे मनःपूर्वक व्यवस्थापन सदभक्त ताराबाई शिर्के यांच्या घराण्यातील श्री. दत्तोबा व श्री. रामनाथजी यांच्यानंतर श्रीमती सीताबाई रामनाथजी शिर्के उर्फ माई यांनी अत्यंत श्रद्धा भावनेने पुढे चालविले. पुढे माईंचे सुपुत्र श्री. बाळासाहेब यांनी ही परंपरा सांभाळली. त्यांचे नित्यांचे श्री समोरील भजन मोठ्या अवीट गोडीचे असे. भक्तीरस पूर्ण गायनामुळे श्रीकृपेने त्यांना 'दत्तगंधर्व' अशी पदवी प्राप्त झाली होती. त्यांनी पूज्यश्री स्वामींचे ओवीबद्ध 'श्रीकृष्ण सरस्वती चरित्र' फारच सोप्या भाषेत लिहून प्रकाशित केले आहे. पूज्यश्रींचे हे रसाळ, संक्षिप्त व सारगर्भ चरित्र आज कित्येकांच्या नित्य पाठामध्ये आहे. श्री. बाळासाहेब यांनी पत्नी सौ. विजयाबाई व सुपुत्र श्री. बबनराव, शिवाजी, यांच्यासह काही काळ येथील सेवा संपन्न केली. त्यानंतर सध्या श्री. बाळासाहेब यांचे सुपुत्र श्री. महेश शिर्के आपले पुतणे श्री. रामनाथ, कृष्णनाथा, इंद्रजित यांच्या सोबत येथील सेवा कार्याची देखभाल करीत आहेत. आजही शिर्के कुटुंबियाकडून याच भक्तीभावने ही सेवा पुढे चालवली आहे. आजही या मठीतील भजन व किर्तन श्रींच्या समोर त्याच आवीट गोडीने सादर केल्या जातात आज ही भक्तांच्या सोबत शिर्के कुटुंबीही मठीतील प्रमुख वार्षिक उत्सव येथील स्थानी मोठ्या भक्तीभावने संपन्न करतात.

# शिष्यप्रेमाचा उत्कट अविष्कार अक्कलकोटी स्वामींची अतिप्रिती श्री कृष्णसरस्वती महाराजांवरची

श्री स्वामींचे हे नाम म्हणजे सदगुरुंच्या आपल्या अत्यंत लाडक्या व प्रिय शिष्यावरील प्रेमाचा उत्कट व उदात्त अविष्कार आहे. श्री. स्वामींचे श्रीकृष्णसरस्वती हे प्रथम शिष्य. या गुरुशिष्याची जोडी अनुपमेय होती. आपण अलौकिक गुरुशिष्यांच्या पुष्कळ कथा ऐकलेल्या आहेत. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाला तरी श्रीनिवृत्त ज्ञानदेव, श्रीजनार्दनस्वामी-एकनाथ, श्रीसमर्थ रामदासकल्याण, श्रीकृष्णदेव (पुसेसावळी) व गोविंदमहाराज उपळेकर, श्रीतुकाराम महाराज व श्री गोंदवलेकर महाराज अशा अलौकिक विभूतींची नावे सहज डोळ्यासमोर येतात. अशीच ही श्री स्वामी समर्थ श्रीकृष्णसरस्वती या गुरशिष्यांची अनुपमेय जोडी आहे. ही जोडी कशी तर श्री स्वामी प्रत्यक्ष ब्रह्मांडनायक तर त्यांचा हा शिष्य दत्तावतार. म्हणजे त्यांच्याच तेजाने प्रतिरुप, म्हणूनच या सदगुरुला आपल्या शिष्याची अनावर ओढ होती. जेवढी शिष्याला आपल्या सदगुरुला आर्त ओढ असते तेवढीच सदगुरुलाही शिष्याला भेटण्याची तळमळ असते. आपल्या शिष्याला आपल्या अनुरुप बनवण्याचे कार्य सदगुरु अखंडपणे करीत असतात. आपले तेज प्रवर्तित करुन त्याला अंतर्बाह्य तेजोमय करतात. त्याला ज्ञानामृताचे घोट पाजून ज्ञानी करतात. योगमार्गाची दीक्षा देऊन योगसामर्थ्याची ओळख करुन देतात आणि त्याच्याकडून जे कार्य करुन घ्यावयाचे आहे. त्यासाठी सर्वार्थाने तयार करतात.

माझे सदगुरु म्हणतात, ‘सदगुरुचा एकच हेतू असतो. साधकाला चालायला शिकवायचे व नंतर स्वतंत्र चालायला लावून दूरदूर जायला लावायचे. संकटापासून वाचवायचे तसेच संकटे सोसण्यासाठी समर्थही करायचे. सहज बोलायचे, पण अमृत पाजायचे. व्याकुळतेने हंबरडा फोडायला लावाये व नंतर साक्षात जगन्माता बनून सदासर्वदा तृप्तीही द्यायची.’ शिष्याने आपल्यापेक्षा जास्त यश मिळवावे ही सदगुरुंची इच्छा तर सदगुरंची किर्ती दिवंगत करावी ही शिष्याची तळमळ असते. सदगुरु आपल्या शिष्याच्या लहान लहान कृतींने भरभरुन कौतुक करतात. अशा सदगुरुंच्या प्रेमाला आणि शिष्याच्या निष्ठेला तोड नाही.

श्रीकृष्णसरस्वती आणि श्री समर्थ यांच्या प्रथम लौकिक भेटीचे जे वर्णन माझ्या सदगुरंनी लिहिलेले आहे त्यात त्यांचे आपल्या परम गुरुवर असणारे अलोट प्रेम, वाटणारा आदरमिश्रित जिव्हाळा आणि आजोबांबद्दल त्यांच्या नातवाला वाटणारी लडिवाळ जवळीक या सगळ्यांचा मनोरम संगम झाला आहे.

श्रीकृष्णसरस्वींचा जन्म नरसोबाची वाडीजवळी नांदणी या गावी माघ वद्य ५ सन १८३२ ला झाला. त्यांचे वडली श्री. अप्पाशास्त्री जोशी हे उपासनामार्गी, षट्शास्त्रनिपुण, व्यासंगी व विद्वान होते. या नांदणी खेळण्याच्या जागा, मारुती मंदिर, चवाडी इ. स्थाने पाहावयास मिळाली. साधारण वयाच्या १४-१५ व्या वर्षी श्री महाराज आपल्या कुलदैवताच्या-श्रीखंडोबाच्या दर्शनास मंगसोळी येथे गेले होते. तेथे त्यांना श्रीखंडोबारायांनी प्रत्यक्ष दर्शन देऊन

अक्कलकोट येथे आपल्या सदगुरुंच्या दर्शनास जाण्यास सांगितले. त्या आदेशाप्रमाणे ते १७-१८ व्या वर्षी सदगुरुंच्या दर्शनास जाण्यास निघाले. ते येत आहेत हे श्री स्वामींनी जाणले व ते तेथे पोहोचण्यापूर्वीच श्री स्वामी आजूबाजूंच्या साधकांना "कृष्णा येणार, कृष्णा येणार" असे सांगू लागले. अक्कलकोट गाववेशीवर श्री महाराज येताच श्री स्वामींनी पुढे होऊन त्यांना गाढ अलिंगन दिले. या विभूतींच्या भेटी जन्मजन्मांतरीच्या पूर्वसंकेतानुसारच ठरलेल्या असतात. श्री.स्वामी नंतर श्री महाराजांना घेऊन जवळच्याच घोर अरण्यात गेले. त्या ठिकाणी त्या उभयतांचा आठ दिवस निवास झाळा नंतर "कृष्णा येणार, कृष्णा येणार" असे म्हणत आपल्या लाडक्या लेकाकरिता श्री स्वामींनी चुरम्याच्या लाडवाचे गावजेवन घातले. निरोपाच्या वेळी आत्मलिंग देऊन त्यांचे नांव 'कृष्ण सरस्वती' ठेवले. तसेच यापुढे माझे सर्व कार्य तुलाच करावयाचे आहे असे सांगून करवीर येथे जाण्यास सांगितले.

या ठिकाणी मला एक साम्य सहज आठवले. श्री नृसिंहसरस्वींचे कौटुंबिक नाव नरहरी होते. श्री महाराजांचेही नांव नरहरीच होते. श्री. नृसिंहसरस्वतींच्या संन्यास आश्रमातील सदगुरुंचे नांव 'कृष्ण सरस्वती' होते तर श्री महाराजांचेही संन्यास आश्रमातील नांव तेच होते. दोघांनीही ब्रह्मचर्याश्रमातूनच संन्यास आश्रमाची दिक्षा घेतली.

श्री स्वांमीचा महाराजांवर परम लोभ होता. हळूहळू त्यांच्यावर काही जबाबदा-या सोपविल्या जाऊ लागल्या. श्री. स्वामींनी केलेल नवस फेडण्यासाठी त्या भक्तांना करवीर क्षेत्री जाण्याचे आदेश मिळू लागले. करवीरक्षेत्री महाराजांचे वास्तव्य ताराबाई शिर्के यांच्या घरी आहे. बाहेरचेही अने सिद्ध त्यांना मिळालेल्या आदेशाप्रमाणे आपापली अधिकारवतने घेण्यासाठी श्रीकृष्णसरस्वती महाराजांकडे कोल्हापूर येत. त्या सर्वांना महाराजांनी त्यांच्या त्यांच्या उपास्या देवतेच्या स्वरुपात दर्शन दिले. श्री.स्वामी विवेकानंद परदेशगमनापूर्वी कोल्हापूर येथेच श्री महाराजांनी वाचासिद्धीचा प्रसाद दिल्याची नोंद आहे.

श्रीस्वामींची व श्री महाराजांची जीवाला शिवरुप देणारी भेट ज्या माझ्या सदगुरुंनी शब्दबद्ध केली त्यांनी तर ती पाहिलीच असेल, पण एका साधकाने या भेटीचे चिंतन दर्शन घेण्याचा ध्यास घेतला तेव्हा त्याच्या सदगुरुकृपेने ते जीवशिव एकात्म दर्शन त्याच्या अंतर्दृष्टीपुढे उभे राहिले.

असे हे श्री स्वामींचे परमशिष्य आमचे महाराज. श्री. स्वामींना अतिप्रिय. आनंद संप्रदायातील हे दोन तेजस्वी दीपस्तंभ. अशा आपल्या अतिप्रिय शिष्यावर अखंड प्रेमवर्षाव करणार्या श्री स्वामींना वंदन.

।। श्रीकृष्णार्पणमस्तू ।।